।।शीलं परम् भूषणम् ।।

राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी द्वारा संचालित



# समर्थ महाविद्यालय, लाखनी

जि.भंडारा



# अर्चना वार्षिकांक

## २०२४-२५



✻ ज्ञानपीठ रत्न ✻

## अभिजात मराठी विशेषांक

(कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर)

नॅक मानांकन B+ (कला, वाणिज्य आणि विज्ञान)

अर्चना वार्षिकांक २०२४-२५ अभिजात मराठी विशेषांक



शिक्षणमहर्षी बापूसाहेब लाखनीकर पुतळा अनावरण सोहळयात उद्बोधन करतांना सद्गुरुदास महाराज



मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३५व्या अधिवेशनातील शोधनिबंधाचे प्रकाशन करतांना मान्यवर



स्नेहसंमेलन सोहळयात उत्कृष्ट राष्ट्रीय छात्रसैनिकाचे सत्कार करतांना



विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ.विजय खंडाल विद्यार्थ्यांच्या कल्याणकारी योजनाविषयी सांगतांना



समर्थ महाविद्यालय व विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी



कायदेविषयक मार्गदर्शन करतांना अॅड.भारत गभणे

ISBN
9 789334 098884
Archana Warshikank

।।शीलं परम् भूषणम् ।।

राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी द्वारा संचालित



# समर्थ महाविद्यालय, लाखनी

## जि.भंडारा

# अर्चना वार्षिकांक

## २०२४-२५

(कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर)

नॅक मानांकन B+ (कला, वाणिज्य आणि विज्ञान)

ISBN

9 789334 098884

Archana Warshikank अर्चना वार्षिकांक 2024–25

# ★★ अर्चना वार्षिकांक ★★

## ❖❖❖ संपादक मंडळ ❖❖❖
## 2024-25



❖ प्राचार्य ❖
डॉ.दिगांबर कापसे



❖ संपादक ❖
डॉ.बंडू चौधरी



❖ सहसंपादक ❖
प्रा.अजिंक्य भांडारकर



❖ सहसंपादक❖
प्रा.रुपाली खेडीकर



अध्यक्ष
विनय रोकडे



सचिव
राजश्री देशमुख



सदस्य
सोनाली खेडीकर



सदस्य
आकांक्षा नागदेवे



सदस्य
लीना कातोरे



सदस्य
गरदीपसिंग गिल



सदस्य
प्रज्ञा दिघोरे



सदस्य
तृप्ती पारधी



सदस्य
ट्विंकल चानोरे



# डॉ.दिगांबर कापसे

## प्राचार्य

समर्थ महाविद्यालय, लाखनी





शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे।
वशिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे।
कवी वाल्मिकासारखा मान्य ऐसा।
नमस्कार माझा सद्गुरू रामदासा ॥

## प्रेरणास्थान



शिक्षणमहर्षी

# स्व. बापूसाहेब लाखनीकर

संस्थापक, राष्ट्रीय शिक्षण संस्था, लाखनी

# संपादकीय

संपादकीय

काही थोडेसे,

सुहृदांनो,

शैक्षणिक सत्र २०२४-२५ हे आपल्या महाविद्यालयाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद पर्व ठरले आहे. यावर्षी महाविद्यालयाने यशस्वीपणे ६० वर्षांचा (हीरक महोत्सवी) टप्पा पूर्ण केला आहे. सहा दशकांची ही यशस्वी वाटचाल म्हणजे केवळ कालगणना नसून गुणवत्तापूर्ण शिक्षण, सांस्कृतिक जपणूक आणि सामाजिक बांधिलकी यांचा समृद्ध वारसा आहे. या सुवर्णक्षणाचे स्मरण म्हणून 'अर्चना' वार्षिकांक प्रकाशित करताना आम्हाला विशेष आनंद व अभिमान वाटत आहे.

या वार्षिकांकामध्ये वर्षभरातील विविध विभागांचे संक्षिप्त अहवाल, महत्त्वपूर्ण घटना, प्रेरणादायी सुविचार तसेच मराठी, इंग्रजी, संस्कृत या भाषांमधून विद्यार्थ्यांनी साकारलेले लेख, कविता आणि विविध साहित्यप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. वर्षभरात पार पडलेल्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे प्रतिबिंब या अंकातून उमटते. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा आणि विचारप्रगल्भतेचा हा सुंदर आविष्कार आहे.

दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला. ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची घटना ठरली. त्याच पार्श्वभूमीवर महाविद्यालयात मराठी प्राध्यापक परिषदेचे ३६ वे अधिवेशन मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडले. या ऐतिहासिक घडामोडींचे प्रतिबिंबही वार्षिकांकातील अनेक लेख व कवितांमधून आणि मुखपृष्ठावर प्रभावीपणे उमटलेले दिसून येते.

'अर्चना' वार्षिकांकाच्या संपादन प्रक्रियेत महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विशेषतः महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन आम्हाला सातत्याने लाभले, त्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. तसेच सर्व प्राध्यापकवृंद आणि सहकाऱ्यांचे सहकार्य या कार्यात प्रेरणादायी ठरले.

संपादक मंडळ

# प्राचार्यांचे मनोगत

समर्थ महाविद्यालयाची समृद्ध वाङ्मयीन परंपरा आणि विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रेरणा देणारा सत्र २०२४-२५ चा 'अर्चना' वार्षिकांक प्रकाशित होत असताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी वर्षात प्रकाशित केलेल्या वार्षिकांकास विद्यापीठस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यानंतर हा अंक विशेष महत्त्वाचा आणि अभिमानाचा ठरत आहे. गेली साठ वर्षे ज्ञान, संस्कार आणि संस्कृतीची परंपरा जपत असलेल्या आपल्या महाविद्यालयाच्या वाटचालीतील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. वार्षिकांक हे केवळ लेखनसंग्रह नसून विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाचे, कल्पनाशक्तीचे आणि संवेदनशीलतेचे प्रतिबिंब असते. या माध्यमातून विद्यार्थी आपल्या बुद्धिमत्तेला चालना देतात, सृजनशीलतेची कक्षा विस्तारतात आणि साहित्यरूपी बीजे पेरतात. त्या बीजांचे साकार रूप म्हणजे 'अर्चना' वार्षिकांक होय.

"प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता तनुनप्राणनिजावद् वर्णनानिपुणः कवि" या उक्तीप्रमाणे प्रतिभा म्हणजे तेजस्वी, नवनवीन उन्मेषांनी झळाळणारी बुद्धी. त्या प्रतिभेचा स्पर्श ज्याला होतो, त्याच्या लेखणीतून उमटणारे शब्दही सजीव भासतात. कवी किंवा लेखक हा केवळ शब्दांचा कारागीर नसतो, तर तो आपल्या संवेदनशील मनातून समाजजीवनाचे प्रतिबिंब साकार करणारा कलाकार असतो. या संपादन प्रक्रियेच्या निमित्ताने उद्याचे नवे साहित्यिक घडावेत, विद्यार्थ्यांच्या मनातील सृजनशक्तीला योग्य दिशा मिळावी आणि त्यांच्या जागृत संवेदनशीलतेचे कलात्मक दर्शन या अंकातून घडावे, ही आमची मनापासून अपेक्षा आहे. महाविद्यालयीन स्तरावर साहित्यनिर्मितीची प्रक्रिया अधिक गतिमान व्हावी आणि विद्यार्थ्यांमध्ये अभिव्यक्तीची सवय वृद्धिंगत व्हावी, यासाठी 'अर्चना' हा एक प्रभावी मंच ठरत आहे.

२०२४-२५ या वर्षात प्रकाशित होणाऱ्या 'अर्चना' वार्षिकांकासाठी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि माजी विद्यार्थी यांना मनःपूर्वक शुभेच्छा ...!
या अंकाच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन.

धन्यवाद!

डॉ. दिगांबर कापसे
प्राचार्य,
समर्थ महाविद्यालय, लाखनी

# अनुक्रमणिका


| क्र. | अंतरंग | अंतरंगाचे शिल्पकार | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| | **❖❖ माय मराठी ❖❖** | | |
| १. | अभिजात भाषा मराठी २०२५ | पुजा कान्हेकर | १९ |
| २. | अभिजात मराठी २०२५ | दिव्या निकोसे | २० |
| ३. | अभिजात मराठी भाषा व मराठी माणूस | स्नेहल दखने | २२ |
| ४. | अभिजात मराठी भाषा आणि मशिन अनुवादात संदिग्धतेची समस्या | विधी चाचेरे | २३ |
| ५. | अभिजात मराठी : आनंदानंतरची जबाबदारी | अनामिका दिघोरे | २४ |
| ६. | अभिजात मराठी भाषा आणि लीळाचरित्र ग्रंथाचे महात्म्य | वैशाली हजारे | २५ |
| ७. | नातं मैत्रीचं | आकांक्षा नागदेवे | २६ |
| ८. | स्त्री अबला नव्हे सबला | साक्षी अतकरी | २७ |
| ९. | डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम | थितेश हटनागर | २८ |
| १०. | उद्योजक काळाची गरज | रागिनी कामथे | २९ |
| | **❖❖ काव्यकुंज ❖❖** | | |
| १. | माझी माय मराठी भाषा | प्रणाली बोकडे | ३१ |
| २. | भाषेची महती | गरदिपसिंग गिल | ३१ |
| ३. | माझ्या मराठीचा बोल | शुभांगी बोकडे | ३२ |
| ४. | भूगोलाचा मराठीत गोडवा | अमित डोंगरे | ३२ |
| ५. | कृषक | श्रेया काडगाये | ३३ |
| ६. | आईची ममता | सोनाली खेडीकर | ३३ |
| ७. | गुरुपौर्णिमा | अमित डोंगरे | ३४ |
| ८. | शरण | गायत्री रेहपाडे | ३४ |
| ९. | रेंगेपार गावा माझा | वैभवी राऊत | ३५ |
| १०. | निसर्ग | आरती शिडामे | ३५ |
| ११. | संवाद रायगडाशी | विनय रोकडे | ३६ |
| १२. | गृहअर्थशास्त्राचे ज्ञान महान | अंकिता मेश्राम | ३६ |
| १३. | आयुष्य | साक्षी मते | ३७ |
| | **❖❖ English ❖❖** | | |
| 1. | Astronomy | Janhavi Chetule | 39 |
| 2. | Sunita Williams | Trupti Pardhi | 39 |
| 3. | Algebra and Arithmetic | Pranali Wanjari | 40 |
| 4. | Water Conservation | Rajashri Tembhare | 40 |
| 5. | Chemistry | Pranali Wanjari | 41 |
| 6. | Water Management Importance | Raj Kalchuri | 41 |
| | **❖❖ देववाणी संस्कृतम् ❖❖** | | |
| १. | विश्वसंस्कृत - दिवस | योगेश्री मेश्राम | ४३ |
| २. | विद्यार्थी जीवनम् | आदिती गिऱ्हेपुंजे | ४३ |
| ३. | महिला सशक्तिकरण | योगेश्री मेश्राम | ४४ |

# अनुक्रमणिका


| क्र. | अंतरंग | अंतरंगाचे शिल्पकार | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| ४. | योग: आध्यात्मिक एवं भौतिक विज्ञान | रिया मोटघरे | ४४ |
| ५. | ज्योतिषशास्त्रम् | साक्षी अतकारी | ४५ |
| ६. | सुभाषित संकलन | रिया मोटघरे | ४५ |
| | ❖❖ प्राध्यापकांच्या लेखणीतून ❖❖ | | |
| १. | अभिजात मराठी आणि मराठी | डॉ.बंडू चौधरी | ४६ |
| २. | अभिजात मराठीला भंडारा जिल्हयाचे योगदान | प्रा.अजिंक्य भांडारकर | ४८ |
| ३. | अभिजात मराठी भाषा संकल्पना | प्रा.मिलिंद कांबळे | ५० |
| ४. | अमेरिका-इजराईल आणि इराण युध्दाचे भारतावर होणारे परिणाम | प्रा.युवराज जांभुळकर | ५२ |
| ५. | Work-Life Balance and its Effect on Employee Productivity in Human Resource Managment | Prof. Rambhau Kotangale | ५३ |
| ६. | Big Bang Theory of Economic Development | Prof. Kaivailya Gabhane | ५४ |
| | ❖❖ विभागांचे अहवाल ❖❖ | | |
| १. | मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशनाचा अहवाल | डॉ.बंडू चौधरी | ५६ |
| २. | इंग्रजी विभाग | प्रा.रामभाऊ कोटांगले | ५७ |
| ३. | मराठी विभाग | डॉ.बंडू चौधरी | ५७ |
| ४. | संस्कृत विभाग | प्रा.रुपाली खेडीकर | ५८ |
| ५. | गृहअर्थशास्त्र विभाग | डॉ.स्मिता गजभिये | ५९ |
| ६. | इतिहास विभाग | डॉ.दिगांबर कापसे | ६० |
| ७. | भूगोल विभाग | प्रा.स्वाती नवले | ६० |
| ८. | अर्थशास्त्र विभाग | प्रा.युवराज जांभुळकर | ६१ |
| ९. | राज्यशास्त्र विभाग | प्रा.लालचंद मेश्राम | ६२ |
| १०. | समाजशास्त्र विभाग | प्रा.बाळकृष्ण रामटेके | ६२ |
| ११. | संगीत विभाग | प्रा.राखी बावनकुळे | ६२ |
| १२. | वाणिज्य विभाग | डॉ.सुनंदा देशपांडे | ६३ |
| १३. | विज्ञान विभाग | डॉ.भाष्कर पर्वते | ६४ |
| १४. | सांस्कृतिक विभाग अहवाल | डॉ.संगिता हाडगे | ६५ |
| १५. | ग्रंथालय विभाग | डॉ.धनंजय गभणे | ६६ |
| १६. | राष्ट्रीय सेवा योजना | डॉ.धनंजय गिऱ्हेपुंजे | ६६ |
| १७. | राष्ट्रीय छात्रसेना विभाग | कॅप्टन बाळकृष्ण रामटेके | ६७ |
| १८. | महिला तक्रार निवारण समिती | डॉ.संगिता हाडगे | ६८ |
| १९. | करिअर गाईडन्स सेल व करिअर कट्टा | डॉ.संदिपकुमार सरैय्या | ६९ |
| २०. | स्वयं विभाग अहवाल | डॉ.संदिपकुमार सरैय्या | ७० |
| २१. | प्रार्थना योग आणि ध्यान साधना विभाग | डॉ.संदिपकुमार सरैय्या | ७० |
| २२. | रक्तदान आणि मरणोत्तर नेत्रदान जनजागृती अभियान | प्रा.बाळकृष्ण रामटेके | ७१ |
| २३. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यावीठ, नाशिक अभ्यास केंद्र | प्रा.अजिंक्य भांडारकर | ७१ |
| २४. | क्रीडा विभाग | डॉ.धनंजय गिऱ्हेपुंजे | ७२ |
| २५. | शिक्षकेत्तर कर्मचारी विभागाची कार्यगाथा | डॉ.शामराव पंचवटे | ७२ |

# अर्चना वार्षिकांकाला विद्यापीठाचा पुरस्कार




५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून गुरुनानक भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या सोहळयात समर्थ महाविद्यालय, लाखनी येथील अर्चना वार्षिकांकाला विद्यापीठस्तरीय पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. यात राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (NEERI), नागपूर चे माजी संचालक डॉ. सतीश वटे, प्र.कुलगुरू डॉ. सुभाष कोंडावार, कुलसचिव राजू हिवसे तसेच डॉ. हरीश पालीवाल यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे, वार्षिकांक संपादक डॉ. बंडू चौधरी व प्रा. अजिंक्य भांडारकर यांना प्रमाणपत्र, धनादेश, विशेष सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

## रा.तु.म. नागपूर विद्यापीठ आंतरमहाविद्यालय मैदानी स्पर्धा २०२४-२५

### गुणवंत खेळाडू



**स्वाती उईके**
सुवर्ण पदक प्राप्त खेळाडू

## छात्रसंघ



**करिना बोंदरे**
छात्रसंघ अध्यक्ष



**विशाखा भुसारी**
छात्रसंघ सचिव

## सैन्यात रुजू झालेले छात्रसैनिक



**तुषार गिऱ्हेपुंजे**
सीमा सुरक्षा दल, त्रिपुरा



**वैभव हंबरे**
अग्निवीर, राजस्थान



**पुजा नान्हे**
महाराष्ट्र पोलीस



**ज्ञानेश ढेंगे**
सीमा सुरक्षा दल, उत्तर बंगाल



**अक्षय तितिरमारे**
राज्य राखीव पोलीस बल



**रोहित देशमुख**
राज्य राखीव पोलीस बल



**अमन बावनकुळे**
महाराष्ट्र कारागृह पोलीस

# सोनेरी क्षणचित्रे

## इव्होनिथ व्हॅल्यू स्टील प्रायव्हेट लिमिटेड, भुगाव (जि.वर्धा)

या नामांकित कंपनीतर्फे कॅम्पस प्लेसमेंटचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पस प्लेसमेंट प्रक्रियेत कंपनीच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा तसेच वैयक्तिक मुलाखतीच्या माध्यमातून निवड प्रक्रिया पार पडली. या निवड प्रक्रियेत बी.एस्सी. तृतीय वर्षातील एकूण बारा विद्यार्थ्यांची यशस्वीरित्या निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर ही संधी मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालयासाठी हा निश्चितच अभिमानास्पद आणि सोनेरी क्षण ठरला आहे.


शैलेश हटवार


विनय रोकडे


मार्शल हजारे


गायत्री निखारे


प्राची पटले


सेजल भोयर


काजल मुटकुरे


पुर्वा लांडगे


काजल कुंभारे


भाग्यश्री सार्वे


स्मिता निखाडे


अस्मिता ईश्वरकर

# बापू स्मृती मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा










**दि.२१ ऑगस्ट २०२४ रोजी हीरक महोत्सवी वर्षात महाविद्यालय परिसरात शिक्षणमहर्षी बापूसाहेब लाखनीकर यांचा अर्धकृती पुतळा धर्मभाष्कर सद्‌गुरुदास महाराजांच्या हस्ते स्थापन करण्यात आला.**

# मराठी प्राध्यापक परिषद










दि.१७ व १८ जानेवारी २०२५ रोजी मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते, त्यातील काही क्षणचित्रे..

# स्नेहसंमेलन













**दि.२५,२६ जानेवारी २०२५ रोजी आयोजित स्नेहसंमेलनातील आठवणी**

# समर्थ परिवार











# विद्यांगण



















# माय मराठी

पुजा कान्हेकर
बी.कॉम भाग २

नोव्हेंबर १९९१ मध्ये यूनेस्को येथे आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. कारण २१ फेब्रुवारी १९५२ मध्ये ढाका युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी तत्कालीन पाकिस्तान सरकारच्या भाषा नितीचा विरोध केला होता. कारण त्यांना आपल्या मातृभाषेचे अस्तित्व टिकवून ठेवायचे होते. प्रदर्शनकारी विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी होती की, बांग्ला भाषेला अधिकाधिक दर्जा मिळावा. परंतु अशा परिस्थितीत पाकिस्तान पोलीसांनी प्रदर्शनकारी विद्यार्थावर बंदुकीच्या गोळयांचा वर्षाव केला.परंतु विरोध थांबला नाही. अंततः पाकिस्तान सरकारला बांग्ला भाषेला अधिकाधिक दर्जा द्यावा लागला. मातृभाषेच्या आंदोलनादरम्यान शहीद झालेल्या युवकांना श्रद्धांजली देण्यासाठी युनिस्कोने नोव्हेंबर १९९९ ला सार्वजनिक परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला व २१ फेब्रुवारी ही तारीख ठरविण्यात आली. तेव्हापासून संपूर्ण जगात २१ फेब्रुवारी हा आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस साजरा केला जावू लागला. संयुक्त राष्ट्रानुसार जगात बोलल्या जाणाऱ्या १० भाषेमध्ये इंग्रजी, मंदार, हिंदी जपानी, रुसी, बांग्ला, पुर्तगाली, अरबी, पंजाबी आणि स्पॅनिश इत्यादी आहेत. भारताचा विचार केला तर भाषेला आगळेवेगळे महत्त्व दिसून येते.

४० किलो मीटर नंतर आपल्याला भाषा बदलतांना दिसते. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी जरी असली तरी प्रत्येक ४० किलोमीटर नंतर लोकांच्या राहणीमानासह भाषेमध्ये व संस्कृतीमध्ये आपल्याला वेगवेगळया प्रकारचा गोडवा पहायला मिळतो. भाषेचा विचार केला तर भारताची भाषा व संस्कृती जगावेगळी असल्याचे दिसून येते.

भारतात अनेक जातींचे, पंथाचे, धर्माचे लोकं राहतात. भारतात २८ राज्य ८ केंद्रशासित प्रदेश आहेत. त्यामुळे भारतातील प्रत्येक राज्याची मातृभाषा वेगळी आहे. त्यातही प्रत्येक राज्यामध्ये प्रत्येक ४० किलोमीटरच्या अंतरावर भाषेचा वेगळा गोडवा दिसून येतो. भारतात ''हिंदी दिल की धड़कन तो मातृभाषा दिल की आवाज'' या विचाराने मातृभाषेचा व राष्ट्रीय भाषेचा सन्मान केला जातो. लँग्वेज डेटाबेसनुसार २२ व्या संस्करण इथोनोलॉजच्या नुसार जगातील २० सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषेमध्ये हिंदी ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची भाषा मानली जाते. ज्याप्रमाणे मातृत्व आणि पितृत्व महत्त्वाचे आहे, त्याचप्रमाणे प्रत्येक देशाची मातृभाषा आणि राष्ट्रीय भाषा महत्त्वाची आहे.

दिव्या निकोसे
बी.कॉम भाग २

अभिजात मराठी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे आज महाराष्ट्रात आणि मराठी भाषिक लोकांसाठी आनंदाचा दिवस आहे. या निमित्ताने आपल्या मातृभाषेला असा दर्जा मिळणे म्हणजे सुवर्ण क्षणच.

मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा मिळणे ही मराठीजनांसाठी अभिमानाची बाब आहे. ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी सन्मान दिन भाषा म्हणून साजरा केला जाणार असल्याची घोषणा अजित पवारांनी केली आहे.

''माय मराठी, साद मराठी
भाषांचा भावार्थ मराठी
बात मराठी, साथ मराठी
जगण्याला या अर्थ मराठी''

मराठी भाषा ही एक प्राचीन आणि समृध्द भाषा आहे. तिची उत्पत्ती संस्कृत आणि प्राकृत या भाषांमधून झाली आहे. महाराष्ट्रात मराठी भाषेचा विकास अनेक वर्षापासून होत आला आहे, आणि अनेक कलावंतांनी, अनेक साहित्यिक विचारवंतांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. संत ज्ञानेश्वर संत तुकाराम, संत एकनाथ, महात्मा फुले, लोकमान्य टिळक यांसारख्या अनेक थोर व्यक्तींनी मराठी भाषा समृध्द करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. अभिजात भाषा जी भाषा प्राचीन असून ज्यामध्ये समृध्द साहित्य आणि संस्कृती आहे, ती भाषा. अभिजात भाषेचा दर्जा मिळणे म्हणजे त्या भाषेला एक विशेष गौरव मिळतो. या दर्जामुळे त्या भाषेच्या संवर्धनासाठी आणि प्रसारासाठी मदत होते.

''साधी भोळी सरळ आमची भाषा
आहे संस्काराची खान,
तिच्यासमोर आम्ही आहोत नतमस्तक
माय मराठीचे गोडवे आहेत अनेक
माय मराठी आमुची ''

११ कोटी लोकांची बोलीभाषा असणारी मराठी ही जगातील १० व्या ते १५ व्या क्रमांकाची भाषा आहे. याशिवाय देशातील ती महत्वाची राष्ट्रीय भाषा आहे. तिच्या ऐतिहासिक प्रवासाचे संदर्भ देत आणि विविध शतकांमध्ये विविध साहित्यिकांनी दिलेला योगदान स्वयंसिद्ध आहे. असेही या अहवालात नमूद करण्यात आले होते. त्यानुसार केंद्राने आता मराठी भाषेला अभिजात भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यारी अधिसूचना काढली आहे. आता भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे अनेक लोकांना मराठी भाषा शिकण्याची प्रेरणा मिळेल असा मला विश्वास वाटतो.

''महाराष्ट्र मातीत मराठी जन्मली मराठी मनाच्या अंगी भिनली अशी आमची भाषा रसाळ बोली मराठी माणसाच्या हृदयात वसली.'' केंद्रीय सांस्कृतिक मंत्रलयाकडे कोणत्याही भाषेला अभिजात दर्जा देण्याचे अधिकार आहे. यासाठी अटी म्हणजे भाषेचा नोंदवलेला इतिहास हा अतिशय प्राचीन स्वरूपाचा म्हणजे किमान १५००-२००० असायला हवा.

भाषेत मौल्यवान प्राचीन साहित्य असावे.भाषा दुस-या भाषासमुहाकडून उसनी घेतली अस्सल साहित्यिक असायला हवी. अभिजात भाषा ही आजच्या भाषेपेक्षा निराळी हवी.

''मराठी म्हणजे गोडवा,
मराठी म्हणजे प्रेम,
मराठी म्हणजे संस्कार,
मराठी म्हणजे 'आपुलकी'
आणि मराठी म्हणजे महाराष्ट्र''

अभिजात भाषांचे संवर्धन करण्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला जातो. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणं. या भाषांचा अभ्यास करण्यासाठी केंद्रिय विद्यापिठामध्ये अध्यासनांची स्थापना करणं. प्राचीन ग्रंथ अनुवादित करणं ज्याने ग्रंथालयांना पाठबळ मिळतं. महाराष्ट्रातील या सर्व भाषांचा अभ्यास १२००० ग्रंथालयांना सशक्त करता येईल. मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था व्यक्ती, विद्यार्थी अश्या सर्वांना भरीव मदत मिळेल. अभिजात भाषेतील दोन अभ्यासकांना दरवर्षी आंतरराष्ट्रीय पुरस्कार दिला जातो. केंद्र सरकारने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं होतं की मराठीलाआणि अन्य भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यान नोकरीच्या संधीत वाढ होईल. विशेषतः सांस्कृतिक आणि संशोधन क्षेत्रत अनेक संधी उपलब्ध होतील. त्याचबरोबर संवर्धन, माहिती गोळा करणं भाषांमधील पुरातन साहित्याचे डिजिटलॉयझेशन यामुळे भाषांतर, नोंद विविध साहित्याचं प्रकाशन तसंच डिजिटल माध्यमात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

परभाषेतही व्हा पारंगत
ज्ञानसाधना करा तरी
माय मराठी मरते इकडे
परकीचे पद चेतन नका
भाषा मरता देशही मरतो
संस्कृतिचाही दिवा विझे
गुलाम भाषिक होऊनी
आपुल्या प्रगतिचे शिर कापू नका

आज मराठी भाषा ज्या रुपात जिवंत आहे, त्या रूपात तिला ठेवण्यामागे फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचे योगदान आहे. शिवरायांमुळे महाराष्ट्र व मराठी भाषा टिकून आहे. मध्ययुगात अनेक विदेशी आक्रमकांनी भारतावर आक्रमण केले, शिवरायांनी मोठ्या शौर्यानं यांच्याशी लढत महाराष्ट्र व मराठी भाषेचे रक्षण केले. मराठी ही आपल्यासाठी केवळ एक भाषा नसून ममतेचे, वात्सल्याचे आणि प्रेमळ संस्काराचे बोल आहेत. जसे आईचे बोल लेकरासाठी हळुवार आणि प्रेमळ असतात व वेळप्रसंगी जी आई मुलाच्या चांगल्यासाठी कठोर शब्दही बोलते तशीच आपली मराठी आहे. जागतिकीकरणाच्या या स्पर्धेत आपण आपली मराठी भाषा विसरू नये अशी माझी इच्छा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या भाषेचे आणि संस्कृतीचे रक्षण केले होते.

# अभिजात मराठी भाषा व मराठी माणूस

कु.स्नेहल दखने
बी.ए. भाग १

भाषा हे एक संप्रेषणाचे साधन आहे. आपल्या भाषेविषयी अभिमान असतो. मराठी भाषा सुंदर भाषा आहे. त्यातही तिला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. ही मराठी माणसासाठी गौरवाची बाब आहे. मराठी माणूस म्हणजे एक अशी व्यक्ती जी मराठी भाषिक आहे. आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीशी, परंपरांशी आणि सामाजिक जाणीवेशी एकरूप आहे. ही ओळख केवळ भाषेपुरती मर्यादित नसून ती जीवनशैली विचार आणि अभिमानाशी निगडित आहे.

अभिजात मराठी भाषा म्हणजे, शुध्द, सुसंस्कृत आणि समृध्द मराठी जी व्याकरणदृष्ट्या योग्य आहे. आणि मराठी साहित्याच्या परंपरेशी नातं सांगते. ही भाषा संत साहित्य, शाहिरी आणि आधुनिक मराठी लेखकांच्या सृजनात्मक कलेतून विकसित झालेली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे म्हणजे मराठी भाषेच्या समृध्द इतिहासाला, साहित्याला आणि संस्कृतीला मान्यता मिळणे होय. ज्यामुळे मराठी भाषेची ओळख आणि महत्व भारतात वाढेल.

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचे फायदे:-** अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेतील साहित्य, कला आणि संस्कृतीला अधिक मान्यता मिळेल. व जेणेकरून तिचे जतन होईल. अभिजात भाषांच्या यादीत समावेश झाल्यामुळे मराठी भाषेची ओळख जागतिक स्तरावर वाढेल. मराठी, भाषा, तज्ञ आणि साहित्यिकांना अधिक संशोधनासाठी प्रोत्साहन मिळेल. अभिजात भाषेच्या दर्जामुळे मराठी भाषेसाठीही देशभरातील विद्यापीठांमध्ये अभ्यास केंद्र स्थापन केली जातील. मराठी भाषेतील साहित्यावर विशेष ग्रंथालय स्थापन केली जाऊ शकतील. ज्यामुळे मराठी भषेच्या अभ्यासाला चालना मिळेल व मराठी माणसासाठी सांस्कृतिक आणि संशोधन क्षेत्रत नोकरीच्या संधी वाढतील. मराठी भाषेतील प्राचीन आणि महत्वपूर्ण साहित्य आता अन्य भारतीय तसेच जागतिक भाषांमध्ये अनुवाद करण्याची प्रक्रिया वेगवान होणार आहे. यामुळे मराठी साहित्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक प्रसिद्धी मिळेल आणि त्याचे महत्व जागतिक स्तरावर पोहोचल. मराठी भाषिचा गौरव वाढेल आणि मराठी माणूस म्हणून अभिमान वाटेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा, दर्जा मिळणे हे मराठी भाषेसाठी आणि मराठी माणसांसाठी खूप महत्वाचे आहे. यामुळे मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन होईल तसेच मराठी भाषेला जागतिक स्तरावर अधिक ओळख मिळेल.



# अभिजात मराठी भाषा आणि मशिन अनुवादात संदिग्धतेची समस्या

कु.विधी चाचेरे
बी.ए. भाग ३

आजचे युग हे कृत्रिम बुद्धीमत्तेचे युग आहे. आज संगणकाला सुद्धा मनुष्यासारखी बुद्धी प्राप्त झाली आहे. एवढेच नव्हे तर आज आपण मनुष्यासारखे दिसणारे रोबोट हॉटेल, रेस्टॉरंट्स, दवाखाने आणि घरांमध्ये काम करताना पाहतो. आणखी दुसरी गोष्ट म्हणजे आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. तंत्रज्ञानामुळे जग खरेच जवळ आले आहे. एका क्लिकवर आपल्याला विभिन्न विषयातील माहिती उपलब्ध होते. परंतू आपली भाषा वेगळी आणि भारताबाहेरील देशातील भाषा वेगळी,भारतासारख्या विभिन्न भाषा असणाऱ्या देशात प्रत्येक व्यक्ती बहुभाषिक असू शकत नाही मग अशावेळी त्याला अनुवाद मदत करते. अनुवाद म्हणजे काय? तर मूळ भाषेतील (स्त्रोतभाषा) मजकूर अथवा आशय आपल्याला अपेक्षित असलेल्या दुसऱ्या म्हणजे लक्ष्य भाषेत व्यक्त करण्याची कला म्हणजे भाषांतर किंवा अनुवाद होय. भिन्न भाषा आणि भिन्न भाषिक यांच्या संपर्कासाठी अनुवादाची सामाजिक आणि सांस्कृतिक आवश्यकता स्पष्ट झाली आहे. भावना, विचार व अनुभव यांच्या आदान-प्रदानासाठी अनुवाद हे मध्यवर्ती सूत्र बनले आहे. अनुवादाद्वारे एक संस्कृती ही दुसऱ्या संस्कृतीला विकसित करत असते. भाषाही समृद्ध होत असते. या कारणाने जगभरातील साहित्य हे स्वभाषेत अनुवाद करण्याची मोठी परंपरा निर्माण झाली आहे. 'अनुवाद' करणे ही एक कला आहे. ती कला अवगत करण्यासाठी तुम्हाला त्या स्रोत भाषेसोबतच लक्ष्य भाषेची, बोली, संबंधित रूढी, परंपरा इत्यादींची उत्तम जाण असणे आवश्यक असते. परंतू अनुवाद करणे हे परिश्रमाचे कार्य आहे, त्यामध्ये सातत्य असणे आवश्यक असते. तरच तुम्ही चांगले अनुवाद करू शकता आणि चांगले अनुवादक बनू शकता. प्रत्येक क्षेत्रात संगणकाने हस्तक्षेप केला आहे, तर मग भाषा जी मानवाला प्राप्त झालेली दैवी देणगी आहे, जिच्या मदतीने मनुष्याने विकासाचे शिखर गाठले ती भाषा वेगळी कशी राहू शकेल. ती मानव भाषासुद्धा संगणकाशी संवाद साधू लागली.

अनुवाद जे मनुष्याला स्वतः करणे परिश्रमाचे कार्य होते ते काम आता तो मशीनीकडून करवून घेऊ लागला. आणि यालाच मशिनी अनुवाद म्हणतात. मशीन अनुवाद ही एक कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान आहे ज्याद्वारे एका भाषेतील वाक्य किंवा मजकूर दुसऱ्या भाषेत स्वयंचलितपणे रूपांतरित केले जाते. मशीन अनुवाद केवळ शब्दांचे भाषांतर करतो, पण अर्थ आणि संदर्भ समजून घेण्यात अक्षम असतो. यामुळे अनेकदा चुकीचे भाषांतर होण्याची शक्यता असते. दुसऱ्या वाक्यात मान शब्द नाम स्त्रीलिंग आहे तर दुसऱ्या वाक्यात नाम पुल्लिंग म्हणून आला आहे पण संदर्भानुसार दोन्ही वाक्यामध्ये अर्थ बदलत आहे. मानव भाषा जी मानवाच्या विचाराचे आदान-प्रदान करण्याचे एक साधन आहे.

संगणक जी एक मशीन आहे, ती तोच अर्थ घेऊ शकते जे तिच्या मेमोरीमध्ये टाकण्यात आला आहे. परंतू एका शब्दाचे एका पेक्षा जास्त अर्थ असल्यामुळे मशीन योग्य संदर्भानुसार योग्य अर्थ ग्रहण करू शकत नाही आणि तिथे अर्थाचा अनर्थ होतो. भाषेमध्ये असणारी अस्पष्टता, संदिग्धता ही संगणकाकरिता एक मोठी समस्या आहे.

भारतीय पंतप्रधान राजीव गांधी यांनी स्वत: वैयक्तिक विनंती करून देखील अमेरिकेचे राष्ट्रपती रोनाल्ड रेगेन यांनी भारताला सुपर कॉम्प्यूटर देण्यास स्पष्ट नकार दिला होता. अमेरिकेने केलेल्या अपमानामुळे भारताचा पहिला सुपर संगणक, परम ८००० बनविणारे, पद्मश्री व पद्मभूषण प्राप्त मराठी माणूस आदरणीय डॉ. विजय भाटकर, फादर ऑफ इंडियास सुपर कॉम्प्यूटर होते. त्यामुळे आशावादी बनून, आपण मशीन अनुवाद ही मराठी भाषेच्या विकासासाठी एक मोठी संधी आहे असे मानून या तंत्रज्ञानाच्या मर्यादांचा विचार करूनच  काम करणे आवश्यक आहे. मशीन अनुवादाद्वारे मराठी साहित्याचे इतर भाषांमध्ये भाषांतर करणे सोपे होईल, ज्यामुळे जगभरातील वाचक मराठी साहित्य वाचू शकतील. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि प्रसारासाठी नवीन दालन उघडले आहे. मशीन अनुवाद ही कृत्रिम बुद्धीमत्तेच्या तंत्रज्ञानाची शाखा मराठी भाषेच्या भवितव्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

# अभिजात मराठी : आनंदानंतरची जबाबदारी

कु.अनामिका दिघोरे
बी.ए. भाग ३

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आणि मराठी माणसाच्या मनात स्वाभाविकच विलक्षण आनंद निर्माण झाला. कारण ज्या भाषेवर आपण जन्मदात्या आईप्रमाणे प्रेम केले, संवेदनांचे संस्कार घेतले, जगण्याचा अर्थ शोधला, त्या मातृभाषेला राजमान्यता मिळणे ही अभिमानाची बाब आहे. ही भाषा आपल्याला केवळ संवाद साधायला शिकवत नाही, तर ती आपले भावविश्व घडवते, जगण्याचा आनंद देते. म्हणूनच तिच्या अभिजाततेचा गौरव हा प्रत्येक मराठी माणसाचा आत्मसन्मान वाढवणारा आहे. परंतु या आनंदाच्या पहिल्या पर्वानंतर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. अभिजात दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषिकांची जबाबदारी नेमकी काय आहे? मराठी भाषेने आपल्याला लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, ओव्या, स्त्रीगीते, आरती असे अफाट साहित्यधन दिले आहे. खेड्यापाड्यातील जात्यावरच्या ओव्यातून आईची माया, श्रमांचे सौंदर्य आणि जीवनाचे तत्त्वज्ञान ओसंडून वाहते. कोणतीही शैक्षणिक पदवी नसतानाही या अभिजात कवयित्रींनी जीवनाचे संगीत शब्दांत बांधले, हेच मराठीच्या अभिजाततेचे खरे स्वरूप आहे. आजही मराठीच्या असंख्य बोलीभाषांमध्ये अमूल्य साहित्य दडलेले आहे. विविध बोली, त्यांतील शब्दसंपदा, समाजजीवन, काव्य, गीते मुख्य प्रवाहात आणणे हीच आजची खरी जबाबदारी आहे.

# अभिजात मराठी भाषा आणि लीळाचरित्र ग्रंथाचे महात्म्य

कु.वैशाली हजारे
बी.ए. भाग ३

भाषा हे मानवी मनाच्या भावभावनांचे, विचारांचे व अनुभवांचे अभिव्यक्तीमाध्यम आहे. संवाद, संप्रेषण आणि संस्कृतीचे संवर्धन या दृष्टीने भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'महाराष्ट्र' म्हणून ओळखला जाणारा भूभाग गोदावरी, तापी, कृष्णा, कोयना, पूर्णा इत्यादी नद्यांनी सुजलामदृसुफलाम झालेला आहे. या नद्यांच्या काठावर प्राचीन काळापासून मराठी संस्कृती नांदत आली असून, या संस्कृतीने 'मराठी' या भाषेला आपली मातृभाषा म्हणून स्वीकारले आहे. मराठी भाषेने आपल्या प्रारंभकाळापासूनच आपले अस्तित्व व स्वत्व टिकवून ठेवण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रावर विविध काळात अनेक आक्रमणे झाली. विविध भाषिक सत्तांचा प्रभाव असूनही मराठी भाषा आणि मराठी माणूस यांनी आपले वेगळेपण, सांस्कृतिक अस्मिता व भाषिक ओळख जपली. हीच मराठी भाषेची ताकद आणि तिच्या अभिजाततेची खरी खूण आहे. भारतीय भाषांपैकी तामिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगू, मल्याळम आणि ओडिया या भाषांना मराठीपूर्वी अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला होता. सर्वप्रथम तामिळ भाषेला २००४ साली अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. मराठी भाषेला मात्र हा मान मिळण्यासाठी २०२४ हे वर्ष उजाडावे लागले. सुमारे वीस वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. आज जगभरात सुमारे ११ कोटी लोक मराठी भाषा बोलतात. जागतिक भाषिक क्रमवारीत मराठी भाषा पहिल्या पंधरामध्ये स्थान मिळवून आहे. मराठीबरोबरच पाली, प्राकृत, असामी आणि बंगाली या भाषांनाही अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. मराठी भाषेच्या अभिजाततेचा विचार करताना लीळाचरित्र या ग्रंथाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. लीळाचरित्र हा मराठीतील पहिला गद्यग्रंथ मानला जातो. महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांच्या जीवनातील लीळांचे वर्णन या ग्रंथात आढळते. या ग्रंथाचा इतिहास पाहता लीळाचरित्र्याच्या अनेक आवृत्त्या अस्तित्वात असल्याचे दिसून येते.

**लीळाचरित्र ग्रंथाचे आतापर्यंत झालेले प्रमुख अवतार पुढीलप्रमाणे आहेत :**

१) म्हाइंभटांनी लिहिलेला मूळ चरित्रग्रंथ (शके १२०५)

२) परशरामबासांनी हिराइसेच्या साहाय्याने तयार केलेला पिढीपाठ (शके १२३५)

३) शिवबासांनी 'शोधनी' करून पिढीपाठावर आधारित तयार केलेली नवीन संहिता (शके १३२५)

४) नागनाथबासांनी तयार केलेला पाठ (शके १३२५)

५) दत्तोबास तळेगावकर यांनी तयार केलेला पाठ (शके १३५०)

६) वाइंदेशकर यांनी तयार केलेला पाठ

या सर्व आवृत्त्यांपैकी म्हाइंभटांचे मूळ हस्तलिखित आज उपलब्ध नाही. दुसरी, तिसरी व चौथी आवृत्ती महानुभाव पंथात प्रमाण मानल्या जातात. उर्वरित आवृत्त्या

मागाहून भर घालून तयार केल्यासारख्या वाटतातय त्यामुळे त्यांना विशेष प्रामाण्य दिले जात नाही. लीळाचरित्र हा ग्रंथ इतिहासातील 'राघव' नावाच्या कवीने आपल्या चरित्राबाबद या काव्यग्रंथात स्पष्टपणे मांडलेला आहे.

प्रथम आरंभी लीळांचे शोधनः केलें पूर्वजानें माहीभटीं ॥
दुसरी शोधनीः परशुरामबासांनीः लीळांची करूनि बंद केला ॥
मग तिसऱ्याने सीवाची शोधनीः मुरारीमल्लानी चवथेन ॥

लीळाचरित्र या ग्रंथाविषयी व. दि. कुलकर्णी यांनी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, लीळाचरित्र ही साहित्यनिर्मिती पारंपरिक कलाकृतीच्या चौकटीत बसणारी नाही. भक्तिरसाने ओथंबलेले हे एक सरळ, प्रांजळ आणि 'जसे घडले तसे लिहिले' या स्वरूपाचे प्रत्यक्ष कथन आहे. कोणताही काव्य हेतू किंवा कलाहेतू न बाळगता लिहिलेला हा ग्रंथ इतिहासाची प्रकृती धारण करतो. या ग्रंथाने मराठी भाषेला स्वतःची स्वतंत्र कथनशैली, वर्णनपद्धती व संवादरचना दिली. कोणतेही लेखनादर्श समोर नसताना असे अलौकिक शब्दशिल्प मराठीत निर्माण होणे ही एक आश्चर्यकारक व अभिमानास्पद बाब आहे. अशा प्रकारे लीळाचरित्र हा ग्रंथ केवळ धार्मिक वा भक्तीपर साहित्य न राहता तो अभिजाततेचा एक ठोस पुरावा ठरतो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यामागे अशा प्राचीन, समृद्ध व वैशिष्ट्यपूर्ण साहित्यपरंपरेचे मोठे योगदान आहे.

## नातं मैत्रीचं

आकांक्षा नागदेवे
बी.एस्सी भाग २

मला वाटलेली नात्याची ओढ आपल नातं हे फूल आणि त्यावर वावरणाऱ्या भोवऱ्यांसारख आहे. अर्थात भोवरा आणि फुलांत असलेले अप्रत्यक्ष नाळ बहुतेक तु एक प्रकारचा फूल आणि मी फुलपाखरू तु मधमाशी तर मी फुल ।

जसे फूल आणि मधमाशी या दोघांमध्ये रक्ताचं जरी नात नसले तरी अटूट असते.जसे मधमाशीचे जीवन हे फुलाविना अधुरे आहे कारण मधमाशी फुलांमधला मध घेणार नाही तर तीचं आयुष्य मरेल!

तसेच फुलपाखरे हे फुलांमधील रंग घेतल्याशिवाय रंगहीन असतात. त्याप्रमाने आपल नात आहे.

जसे मधमाशी, फुलपाखरु फुलाकडे आकर्षित होतात व त्यांना फुलांमधील मध फुलांमधील रंग, त्यातील सुंगध आवडतात तसेच आपल्या नात्याचं आकर्षण आहे. आपल्या मैत्रिमध्ये जे काही सुगंध, रंग ,आठवणी त्या सुध्दा तशाच आहेत.



# स्त्री अबला नव्हे तर सबला

साक्षी ईस्तारी मते
बी.कॉम भाग १

स्त्री अबला की सबला एकच मध्यबिंदू असलेल्या एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत. आकाशाला गवसणी घालण्यासाठी गेलेली आणि गतप्राण आताच झालेली सुनिता विल्यम्स एक महिलाच ना, आपल्या देशाच्या माझी पंतप्रधानमंत्री इंदिरा गांधी, माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, किरण बेदी व सध्या पद सांभाळत असणारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आपल्या बुद्धीच्या आणि आपल्या पराक्रमाच्या जोरांवर आपलं अस्तित्व सिद्ध केलं. आदिशक्ती नवदुर्गा माता अशी अनेक रूप स्त्री मध्ये पाहणाऱ्या समाजाला स्त्री अबला की सबला हा प्रश्न पडावा हे नवलच. स्त्री विषयाला कुठून सुरुवात करू हेच मलाच समजत नाही कारण ज्या स्त्रीने नऊ महिने आपल्या गर्भात आपल्या बाळाला सांभाळलं त्या बाईपासून करू की, ज्या बहिनेने हाताला राखी बांधून माझ्या भावाचं रक्षण कर असे म्हणणाऱ्या माझ्या बहिणी पासून करूं? एकतर्फी प्रेमातून बळी गेलेल्या अमृता देशपांडे पासुन करु, की दहावीच्या परिक्षेला जाताना जिला ॲसिड टाकून जाळलं त्या रेणुका चौधरी पासुन करु की,त्या दिल्लीत शिक्षण घेणाऱ्या निर्भयापासून करू की, जिच्या आयुष्याची समाजातील नराधमांनी जीवनाची राखरांगोळी केली, त्या निर्भयापासून करु की, क्रांतीज्योती व स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्ते सावित्रीबाई फुले पासून की, ज्या स्त्रीने आपले संपुर्ण आयुष्य या स्त्री जातीला सक्षम व शिक्षण देण्यासाठी आपल्या आयुष्याला समाजातून विविध चटके काय? आजही जीवनाच्या प्रत्येक वळणावर पुरुषांनी महिलेला साथ द्यावी. पुरुषांनी महिलेला बळ दयावा आणि महिलेचे रक्षण' करावे हे मला कुठेतरी खटकत आहे. स्त्री म्हणजे केवळ 'उपयोगाची वस्तू', स्त्री म्हणजे केवळ 'अश्रूंचा बाण', स्त्री म्हणजे पुरुषांच्या तालावर नाचणारी कळसूत्री बाहुली आणि स्त्री म्हणजे पुरुषांच्या पायातील 'चप्पल' ही विशेषणे आज कुठेतरी फिकी पडत आहे. स्त्रियांनी आपल्या ध्येयनिष्ठ पराक्रमाच्या कर्तृत्वाच्या जोरावर ही विशेषणे मागे पाडलेली आहे. आज आपल्या कुटुंबाला आपल्या समाजाला पर्यायाने राष्ट्राला सामर्थ्य देण्याचं काम हे स्त्री करत आहे. स्त्री जन्मां तुझी कहाणी हृदयी अमृत नयनी पाणी अशी म्हणण्याची वेळ स्त्रीवर यावी? काय कारण असू शकतो स्त्रीवर होणारे अन्याय, अत्याचार, बलात्कार, तिला मिळणारी अमानुष वागणूक आजही तिच्या प्रगतीला बांध घालत आहे. आज राजकारण, समाजकारण, बँक संघटन, वकील, वैद्यकीय, पोलिस, शिक्षण सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांदयाला खांदा लावुन कार्य करीत आहे. आपलं वर्चस्व अस्तित्व सिद्ध करित आहे. नेतृत्व करतांना देखील कुठलीही स्त्री कमी पडली नाही. अहो पारतंत्र्याच्या काळात झाशीची राणी, सावित्रीबाई फुले, ॲनी बेझंट, रजिया सुल्तान, राजमाता जिजाबाई, राणी येसुबाई इत्यादी या स्त्रिया कमी पडल्या नाही, तर या संगणकाच्या युगात त्या का

नक्कीच नाही तर ,स्त्री म्हणजे महिला महान शक्ती हे लोकांना पटवून दिलं पाहिजे, आज स्वातंत्र्याचा उपयोग घेत असतांना स्त्रियांनो जीवन मुक्तीचा मार्ग दाखवावा लागतो. एकतर्फी प्रेमाला नकार दिल्यानंतर तिच्यावर जीवघेणा हल्ला होतो. आज कामाच्या ठिकाणी सुध्दा महिला सुरक्षित नाही हे दुदैव म्हणावं लागेल हो ती डगमगते, ती कोलमडते, ती रडते, ती थकते, पण तरीसुद्धा ती ताठ उभी राहते, स्त्रीला समजून घेणं फार सोपं आहे, पणे तिला ओळखणे हे फार कठीण आहे. आजच्या या महिलांना मी सांगु इच्छिते की, कोणा एका कृष्णासाठी अमृत म्हणून विषाचा घोट नाही घ्यायचा, कारण त्याग हा निरर्थक ठरतो, एक वचनी रामासाठी काट्याकुटयांचा वनवास सीतेसारखा नाही भोगायचा, कारण विश्वास आता पायदळी तुडवला जातोय. कोणी एका धृतराष्ट्रासाठी डोळयांवर पट्टी बांधून अंधारात नाही राहायचं, कारण निस्वार्थी भावना आता शून्यात विरत चालल्यात, कोणा एका पांडवाच्या आग्रहासाठी द्रौपदी सारखं महाभारत नाही घडवायचं, आता लढा स्वबळावर दिला जातोय कोणालातरी सबळ करण्यासाठी स्वतःला अबला म्हणून नाही घ्यायचं, कारण जगाला सामर्थ्य देण्याचं बळ तुझ्यात असतांना तू असं अबला म्हणून विरत नाही जगायचं.

चाँद अधुरा है सितारों के बिना,
गुलशन अधूरा है बहारों के बिना,
समंदर अधूरा है किनारों के बिना,
संसार अधुरा है एक नारी के बिना.

# डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम

यितेश हटनागर
बी.ए.भाग २

जेव्हा शिलाँगमध्ये डॉ. अब्दुल कलाम यांनी अखेरचा श्वास घेतला, तेव्हा संपूर्ण जग हळहळले. पण खरा थक्क करणारा प्रसंग तर दुसऱ्या दिवशी दिल्लीत घडला. ज्या माणसाने ४० वर्षे सरकारमध्ये उच्च पदांवर काम केले आणि ५ वर्षे रायसीना हिल्सच्या (राष्ट्रपती भवन) राजवाड्यावर अधिराज्य गाजवले, त्या महान शास्त्रज्ञाकडे नक्की किती संपत्ती असेल, हे पाहण्यासाठी लोक त्यांच्या खोलीचे टाळे उघडायला गेले. पण जेव्हा खोली उघडली गेली. तेव्हा तिथे एक शांतता पसरली. तिथे कोणतीही तिजोरी नव्हती, कोणत्याही लक्झरी कारची चावी नव्हती की परदेशी बँकेचे पासबुक नव्हते. त्या खोलीच्या कोपऱ्यात असलेल्या एका छोट्याशा पेटीत फक्त एवढ्याच गोष्टी सापडल्या: ६ जुने शर्ट आणि ४ ट्राउझर्स (जे ते स्वतः धुवायचे). ३ जुने सूट (त्यातील एक तर राष्ट्रपती पदाच्या शपथविधीच्या वेळी शिवलेला होता, जो ५ वर्षे चालला), ' १ मनगटी घड्याळ (जे वेळेचे पक्के होते, पण दिखाव्यापासून कोसो दूर).' १ जुना लॅपटॉप आणि १ वीणा आणि सर्वात मौल्यवान गोष्ट, २५०० पुस्तके! बस! भारताला अण्वस्त्रशक्ती बनवणाऱ्या माणसाची हीच एकूण जमापुंजी होती. नवल वाटणारी गोष्ट! तुम्हाला माहीत आहे का, डॉ. कलाम यांनी आपल्या आयुष्याचा संपूर्ण पगार आणि निवृत्तीवेतन (पेन्शन) नावाच्या संस्थेला गुपचूप दान केले होते. ज्या माणसाच्या एका स्वाक्षरीवर देशाचे अब्जावधीचे बजेट ठरत असे, त्याने स्वतःसाठी एक इंच जमीनही खरेदी केली नाही. कलाम साहेबांनी जाता जाता आपल्या सर्वांना एक आरसा दाखवला आहे.

# उद्योजक काळाची गरज

रागिनी कामथे
बी.कॉम भाग ३

आज देशातील तरुण पिढी ही नोकरीपेक्षा व्यवसायावर जास्त भर देत आहेत. आणि याचे कारण म्हणजे नोकरीची होणारी कमतरता. आपल्या जीवनात सातत्याने घडत असणारी गोष्ट म्हणजे बदल आणि या बदलानुसार जे स्वत:मध्ये बदल घडवतात तेच यशस्वी होतात हा निसर्गाचा नियम. ज्यांनी काळाप्रमाणे स्वत:ला बदलले नाही ते संपुष्टात आले. साक्षरता एवढी वाढली आहे की, पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्यांची संख्या वाढत आहे. आपल्याकडे असलेल्या शासकीय आणि खाजगी नोकऱ्यांची संख्या कमी आहे. आपली व्यवस्था इतक्या सर्वांना नोकऱ्या देऊ शकत नाही म्हणून सुशिक्षीत बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. काही दिवसांपूर्वी आपण वर्तमानपत्रातुन वाचले असेलच की,सरकारी नोकऱ्या कमी होणार आहेत. खाजगी कंपन्या यांत्रिकीकरण व ऑटोमेशनवर भर देत आहेत. त्यामुळे नोकऱ्यांची संख्या कमी होत चालली आहे. म्हणून तरुणांनी नोकरी करण्यापेक्षा आता नोकरी देणारे बनण्याची गरज आहे, यावर एकच उपाय तो म्हणजे 'उद्योजक' बनणे. परंतु कोणताही व्यवसाय सुरू करण्याआधी व्यवसायाची परिपूर्ण माहिती असणे खूप आवश्यक असते. आज व्यवसाय करण्यासाठी आपल्याला हवे असतील त्यापेक्षा जास्त पर्याय उपलब्ध आहेत आणि त्यासाठी लागणारी आवश्यक आणि पुरक वस्तु देखील आरामात उपलब्ध होऊन जातात.

परंतु तो व्यवसाय कसा करावा आणि त्यात कशाप्रकारे यशस्वी व्हावे याविषयीची माहिती कोणताही व्यापारी सहजा सहजी देत नाही. आज सर्वात जास्त मागणीत असणारा आणि कायम स्वरूपी चालणारा व्यवसाय जर कोणता असेल तर तो म्हणजे कापड व्यवसाय. आज कापडासाठी सर्वात उत्कृष्ट जर कोणती जागा असेल तर ती आहे सुरत. सुरत आज फक्त देशातच नाही तर संपूर्ण जगात नामवंत आहे. इथे कपड्यांचे खूप मोठे मोठे निर्माते आहेत. यातुनच एक आहे अजमेरा फॅशन ,यांनी आज पर्यंत ८००० पेक्षा जास्त नवीन व्यापाऱ्यांना त्यांचा व्यवसाय सुरु करण्यात मदत केली आहे. इतकेच नव्हे तर संपूर्ण देशात ८५,००० पेक्षा जास्त व्यापारी त्यांच्याकडून माल खरेदी करून उद्योग करण्यात यशस्वी झाले आहेत. उद्योगांसाठी योग्य प्रशिक्षण देऊन त्यांच्यामधील कौशल्य विकासावर भर देऊ, ज्यामुळे व्यावसायिक शिक्षणामुळे कुटुंबाच्या व देशाच्या प्रगतीला हातभार लागतो. व्यावसायिक शिक्षणामुळे अनेकांना त्या व्यवसायात रोजगार निर्मिती होण्यास मदत मिळेल. उदा., रिलायन्स उद्योग हा भारतातील महत्त्वाचा उद्योग समूह आहे. त्यातून अनेक लोकांना रोजगार मिळाला आहे . अशाप्रकारे उद्योगात यशस्वी होण्यासाठी जर व्यावसायिक शिक्षण शाळा, महाविद्यालय स्तरावर मिळाले तर देशाची प्रगती होण्यासाठी खूप मदत होईल.

मराठी

लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी ।जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।
धर्म,पंथ,जात एक जाणतो मराठी । एवढ्या जगात माय मानतो मराठी ॥

# काव्यकुंज

मराठी

लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी ।जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।
धर्म,पंथ,जात एक जाणतो मराठी । एवढ्या जगात माय मानतो मराठी ॥

## माझी माय मराठी भाषा

काय सांगू महती माझ्या मराठी भाषेची,
माय मराठी आमची आहे खूप लाडाची


कुसुमाग्रजांनी वसा आहे दिला कोंकणी वऱ्हाडी
ध्या भाषांनी जन्म घेतला
संस्कृतभाषा असे हिची मायमाऊली माझ्या
मराठी भाषेत आहे गोडवा

ज्ञान देई अगणित
अलंकरात ती सजुनी,
शब्दांना करी मोत्याचे मणी
अशी भाषा ही माझी माय मराठी...

मराठीत जन्मली माझ्या ज्ञानेश्वरांची ओवी
कुसुमाग्रज पाडगावकरां सारखे कवी,
बाबासाहेबांसारखे प्रकाशमान रवी अशी आहे
माझ्या माय  मराठीची थोरवी...

शान महाराष्ट्रीय मनाची
आहे आमची ती राजभाषा,
मराठी माणसांची ती अस्मिता
तिला मिळाला दर्जा अभिजात भाषेचा..

**प्रणाली बोकडे**
एम.ए. भाग १




## भाषेची महती

मराठी भाषेची काय सांगावी कौतुके
भल्याभल्यांचे मन नुसत्या शब्दांनी जिंके
मराठी - मराठी महाराष्ट्राची शान,
मराठी माणसाचा आहे तोच मानधन
माझी मराठी भाषा हिऱ्यामोत्यांची खान,
तिचा एक-एक शब्द खूप आहे मौल्यवान,
लहान -थोर सांगे भाषेची कौतुके
तुकाराम चोखा आणि बहिणाबाई ,
मराठी अभंग -ओवी जात्यावर गायी,
लावणी - काटणी जेव्हा शेतात होते,
आया नि बाया गाती मराठी गीते,
या भाषेचा मन आनंदित होते
उभी शाहीर मंडळी, डफ - तुणतुणे बोली,
मजुरांची मानकरी 'वीरांची मायबोली,
मराठी माय आहे, साधी न भोळी,
अख्या महाराष्ट्राची माय माझी मराठी झाली,
म्हणून कविताकार, मराठी कविता करते

**गरदिपसिंग दिलबागसिंग गिल**
बी.ए. भाग २



## माझ्या मराठीचा बोल

नदीच्या किनारी नदीला म्हणावे
तुझे पूर माझ्या नसातून यावे
अभंगात गोडी तुझ्या भाकरीची तहानेत
माझ्या तुला ओळखावे

माझ्या मराठीचा बोल
वाजे काळजात खोल
ओवीमधून पाझरे
निळ्या अमृताची ओल

माझी मराठी माऊली
तिची विठोबा साऊली
ज्ञाना, नामा, तुका, एका उभे कैवल्य
राऊळी

माझा मराठी गुलाल
त्याला अबीराचा वास
माझ्यासाठी चंद्रभागा
उरी कालवते घास

माझ्या मराठी मातीची
खोलवर रुजे नाळ
सळसळता आतून
माझ्या रक्तात पिंपळ

**शुभांगी सेवकराम बोकडे**
**एम.ए. भाग १**

## भूगोलाचा मराठीत गोडवा

संबंध फार पूर्वीचे
भूगोल आणि मराठीचे.

एक भाषा एक शास्त्र.
पुस्तक भूगोलाचे पण भाषा मराठीची
शास्त्र भूगोलाचे पण शब्द मराठीचे.

भूगोलाची संकल्पना
वाटते मराठीचे अभंग.
भूगोलानं प्रांताची विभागणी
होते भाषेच्या संग.

मराठी भाषेच्या आधारावर
झाली महाराष्ट्राच्या भूगोलाची रचना
मराठीच्या प्रादेशिक भागावर झाली
प्रादेशिक विभागांची संरचना.

**अमित प्रकाश डोंगरे**
**बी.ए. भाग ३**



## कृषक

बाप माझा शेतकरी व माय
उना तानात कष्ट करी व माय
बायकोच्या अंगावर
नाही आली भर जरी व माय
बाप आहे तो कष्ट करी व माय...

त्याच्या कष्टाले नाही किंमत
तरी एकट्याने बांधली हिम्मत
साऱ्या जगाचे तो पोट भरी
बाप आहे तो कष्ट करी व माय...

शेती पिकवतो हिमतीवर
त्याचे जीवन आहे सार
बाजारपेठेच्या किमतीवर
श्रेया सांगते गोष्ट हो तुम्हा खरी
बाप आहे तो कष्ट करी व माय...

**श्रेया काडगाये**
बी.ए. भाग ३



## आईची ममता

आईची ममता अमूल्य आहे,
जे हृदयाला स्पर्श करते
आईचे प्रेम खरे आहे
जे जीवन सजवते.
आईच्या नजरेत एक जग असते
आईच्या हृदयात एक प्रेम लपलेले असते ,
आईच्या प्रेमाची तुलना नाहीय
आईचे प्रेम हेच खरी जीवनाची संपत्ती असते
.
आई शिवाय जग अपूर्ण वाटते
फक्त आईचेच प्रेम जीवनाला अर्थपूर्ण
बनवते ,
आई शिवाय जीवन अंधारमय आहे,
आई सोबत चे जीवन प्रकाशमय आहे,
आईच्या प्रेमाला अंत नाही ,
आईचे प्रेम हीच खरी जीवनाची ताकद
आहे.
आईची ममता अनंत आहे
ती जीवनाचा पाया आहे
आईचे प्रेम खरे आहे
ते हृदयाचे ठोके आहे
आईच्या ममतेला पर्याय नाहीय
ते खरे जीवनाचे भांडवल असते.

**सोनाली खेडीकर**
बी.कॉम. भाग १

## गुरु पौर्णिमा

वर्गाहूनही नगरी न्यारी,
ज्ञानदात्याची औषध गुणकारी
जाशील विसरून दुनिया सारी,
माझ्या गुरुची महिमा न्यारी...
समर्थ कॉलेज संस्कार करी,
गुरूंची शिकवण जगात भारी
बापूसाहेबांची संस्था सारी,
आहे पसरली ती दूरवरी
या संस्थेचे शिक्षण खरे,
यामुळेच घडले सारे
जाशील विसरून दुनिया सारी,
माझ्या गुरुची महिमा न्यारी...
एन एस एस पथक आहे महान,
त्याच्यामुळे आम्हा आहे हो शान
विद्यारूपी असे मिळाले ज्ञान,
समाजात आहे आम्हा सन्मान
सांगतो गोष्ट तुम्हा खरी,
अशी शिकवण जगात भारी
जाशील विसरून दुनिया सारी,
माझ्या गुरुची महिमा न्यारी...
खरं सांगावं प्रत्येकानं,
कसं मिळालं आम्हाला ज्ञान
कशी आहे हो शिकवण सारी,
माझ्या गुरुची हो गुणकारी
जाशील विसरून दुनिया सारी,
माझ्या गुरुची महिमा न्यारी...

**अमित प्रकाश डोंगरे**
बी.ए. भाग ३

## शरण

जातीचं डोम आम्ही
रेचतो स्मशानात शरण
येतो लोकांना मरण
तेव्हा मिळते आमच्या पोटाले
दोन वेडचं भरण..

लाकड तोडून प्रेत जाडतु
इतभर पोटासाठी राब राब राबतु
जातीच काय हाय
भीकाऱ्याला भिक मागूनबी भीक नाय
माणसाला माणूस म्हणून वागवत नाय
ह्या माझ्या जातीच काय माणसा
ह्या माझ्या जातीच काय...

नको मला पैका पाणी
नको मला तूप लोणी
फकस्त वागव हया जातीच्या माणसाले
माणसा, माणसा वानी
माणसा, माणसा वाणी...

ऐकून घे रे भल्या माणसा
ऐका डोमाची कहाणी
गोड होवूनी तुझी वाणी
अन पळूदे माझ्या कानी.

**गायत्री रेहपाडे**
बी.ए. भाग २

## रेंगेपार गाव माझा

गाडी चालली घुंगराची
न वाट बाई रेंगेपार गावाची
वेड करपली बाराची
न वाट बाई रेंगेपार गावाची
पहिल्यांदा गाडीत बसले मी आज
रेंगेपारात माहेर माझ
आई बाप माझ शेतकरी राज
मला सवयी शेतीची
न वाट बाई रेंगेपार गावाची
गाडी चालली घुंगराची
न वाट बाई रेंगेपार गावाची...
दणक्यावर दणका बसतो ग बाई
धंद्यानं मला घाम लय येई
मे महिन्यात रोजगार नाही
हातात पैसा येतच नाही
वाट बाई रेंगेपार गावाची...
गाडी चालली घुंगराची
न वाट बाई रेंगेपार गावाची...
गावातील लोक आहेत बेरोजगार
हवा मिळेल त्यांना सांगा रोजगार
न वाट बाई रेंगेपार गावाची...
समोर दिसतंय नव्हं तलाव
मे महिन्यात पाणी त्यांनी द्यावं
रेंगेपार गाव फुलून यावं
डबल फसलीचे धान मला व्हावं
न वाट बाई रेंगेपार गावाची...

**वैभवी राऊत**
**बी.ए. भाग २**

## संवाद रायगडाशी

हिंदवी स्वराज्याची राजधानी तू नशीबवान तरी किती,
'तुझ्या डोळ्यांनी पाहिले तू राजांना होता छत्रपती
वात्सल्याची जाण ठेवून हिरकणीला बळ
तूच दिले ना, तिचा हात पकडून सुखरूप खाली
तूच उतरवले ना
स्वराज्याशी गद् दारी करणाऱ्याला दाखवायचे तुझे टकमक टोक,
याच भितीने स्वराज्याशी इमान राखायचे काही लोक
भव्य तुझा आकार आणि दिव्य तुझी महती,
याच वेगळेपणामुळे राजधानीसाठी तुझी निवड केली होती
राज्याभिषेकाला अठरा पगड जातीचे लोक
एकत्र तू आणले किती उदार झाला होता,
राजांना पहायचं
मन तू त्यांचे जागलो
शेवटचा श्वास सुद्धा राजांनी तुझ्या नजरेसमोर घेतला होता,
किती रडला असशील तू, आपला राजा कधी दिसणार आता
तुझ्या छायेत मला विसावा घ्यायचाय थोडा,
तुला भेट देऊन मुजरा करायचा आहे रायगडा

**विनय संजय रोकडे**
**बी.एस्सी. भाग ३**



# निसर्ग

किती फुलांवर हक्क सांगतात.
त्यांना जन्म देणारी झाडं ?
आणि वाहता वारा वसूल करतो का ?
दर महिन्याचं भाडं?
लिटरभर पाण्याचा काय भाव सांगते नदी?
किती अँडवांस मागतात ढग पाऊस
पाडण्याआधी?
किती हत्ती दात पडल्यावर आपले दात
विकतात?
चोचीत मावेल तेवढंच खावं हे पक्षी कुठे
शिकतात?
प्रकाश दिला म्हणून सूर्य लाईट बिल धाडतो
का?
कधी रविवारी सुट्टी टाकून जगात अंधार पाडतो
का ?
हलका वाघ भारी वाघ
हलका कोल्हा, भारी कोल्हा
उच्चवर्णिय लांडगा दूसरा लांडगा
असं त्याच्यातही असतं का ? नाती ।
एक बी उगवायचे किती चार्ज करते माती?

किती हरीणी स्त्रीलींगी गर्भाचं अबोर्शन
करतात?
आणि
किती ससे शर्यत हरलो म्हणून
गळफास घेवून मरतात ?
अहो अनादी काळापासुन हा निसर्ग आपल्याला
शिकवतोय कसं जगावं
कृतीतून दाखवतो पण आम्हीच
येळे होरपडून खातो निसर्ग
आम्हीच आहो खुळे
कधी कळेल आपल्याला
आपल्यामुळे निसर्ग नाहीं
तर
आपण आहोत निसर्गामुळे

आरती रामचंद्र शिडामे
बी.ए. भाग २









# English Articles

# Astronomy

**Janhavi Chetule**
**B.Sc 1st Year**



A lot of the astronomical Knowledge Goes all the way back to the Vedic literature- To the Samhitas To the Brahmanas and To the commentaries on the Samhitas. The period ranges from 6000 BCE for a direct Rig- vedic quote to 14th century AD for Sayanacharayas commentary.

Post-Vedic period, the big names in Indian astronomy are:

Aryabhata I -5th Century AD
Brahmagupta -7th Century AD
Bhaskara I-7th Century AD
and Bhaskaza II-12th Centuary AD.

In respect of each of these astronomers we know their. time, correct to their dates of birth and place, correct to their villages, because, as good astronomers. Aryabhatta (476-550AD) Aryabhatta was born in 476 AD in Kerala and migrated to kusumpura in the Magadha Empire, not far away from the celebrated Nalanda University. this place is in the present-day Bihar state in Northern India. It is possible that Aryabhata's family had moved to kusumapura from somewhere south because, they have also been referred to as Ash makes - those that had come from the south. Aryabhata had produced two works:

Aryabhatiya
Aryabhata - siddhanta.

This is what Dick Teresi a science historian has to say on Aryabhatiya:

"The Aryabhatiya is a summary of Hindy mathematics up to his time, including astronomy, spherical trigonometry, arithmetic, algebra,and plane Trigonometry. In it, one of Aryabhata's maingoals was to simplify the ever more complex computational Mathematies of Indian astronomy."

# Sunita Williams



**Trupti Pardhi**
**B.Sc 2nd Year**

## SPACE MISSION

National Aeronautics and space Administration (NASA) astronauts sunita williams reached the International space station on June 5,2024 what was meant to be 8-day mission stretched into a 9- months stay due to unexpected technical glitches.During the mission, williams travelled 121.347.491 miles, spent 286 days in space and Completed 4,576 orbits around earth. the mission, crew-9 contributed and scientific research. maintenance activites technology demonstration.What sunita williams did in space!From maintaining and cleaning the massiv football field-sized station to replacing old hardware. Williams played a hands-on-role in keeping the International space station (Iss) running smoothly. She said to have carried out several and contributed significantly to ongoing research. According to NASA, williams and her team logged an impressive 900 hours of mission, they conducted more than 150 experiments. Sunita williams research for future missions Williams contributed to several high-impact research projects, including studies on how microgravity influences fluid systems in space, she also worked developing new reactors for water recovery and fuel cells-technology that could be crucial for future long-duration missions, as on per NASA. one of the most promising initiatives she participated in the BioNutrients project. This research explores how beneficial bacteria can be used to produce fresh nutrients for astronauts, a step that could transform how spacefarrers get essential vitamins and

minerals during long stays away from Earth.After an unexpected journey that lasted over nine months in space. National Aeronautics and space Administration (NASA) astronauts sunita williams returned to earth on march 19,2025. The duo made their way back aboard a space x capsule which gently parachuted into the Gulf of Mexico wrapping up their extended stay at the international space station. The splashdown occurred off the coast of Florida's Tallahassee in the panhandle region.

# Algebra & Arithmetic

**Pranali Wanjari**
**B.Sc 2nd Year**




**Algebra as a distinct branch of Mathematics. Originated in the world since of Brahmagupta in modern times. In the remote past, shulba-sutras contain problems and solution involving quadratic equations of the type ax2 + bx=c.The sutras also contain rules for the construction of a square. The treatment leads to the solution of an indeterminate equation of leads to the equation of second degree x2+y2=z2.They also contain treatment of surds, qualities like √2 etc.. Irrational number like√3 etc. We're also treated.Permutations and combination was a favorite mathematics pursuit of vedic Hindus. The so called pascal triangle first appeared in Europe in the work of Apianus (1527AD). Pingala's chandas -sutra (200 BCE) preceded him by 1300 years, by the name Meri prastara.**

# Water Conservation


**Laxmi Ramteke**
**M.A. 1st Year**




**Freshwater is a limited resources,covering surface. The global demand for water is increasing due to population growth, urbanization, and economic development. Water conservationFixing leaky faucets and toilets can save up to 20 gallons of water per day. Taking a 5 minute shower instead of a 10-minute Shower can save up to 20 gallons of water per day. collecting rainwater in barrels or tanks can Provide water for non potable uses like watering plants. use that washing machines which use less water than top loading machines. Turning off the tap loading machines. Your teeth or washing your hands can save up to 4 gallons of water per day. Water conservation Technologies1.Greywater system : Greywater system collect and treat wastewater from sinks ,showers and washing machine for irrigation and flushing toilets. 2) Rainwater harvesting systems: Rainwater harvesting systems collect and store rainwater for non- potable and uses. 3.Drip irrigation: Drip irrigation water directly to the roots of plants. Reducing evaporation and runoff. Water Conservation Benefit 1) Saves money:- Conservationwater can reduce you money.2) Protects the environment:- Conserving water can help protect aquatic ecosystem and preserve water quality. 3) supports food security:- Conserving water can help ensure. Food security by supporting agriculture and reducing the risk of crop failure . Water conservation statistics1.70% of the World's Freshwater is used for agriculture. 2.20%of the World's Freshwater is used for industry. 3.10% of the world's freshwater domestic for purposes.4.1.8 billion people lack access to safe drinking water.**

# Chemistry

**Rajashri Tembhare**
**B.Sc 2nd Year**




Chemistry is the branch of science which deals with the identification of the substance of which matter is composed, the investigation of their properties and the ways in which they are interact, combined and change and use of these process to form new substances. Everything on earth is made up of chemicals, you, your food and the products use in daily life. Such as soaps, perfumes etc. Life without chemical is impossible. A number of changes that result of chemical reactions like the rain, the change in the colour of leaves, cleaning of any particular material in your house, all involve chemicals. 'Chemistry' is how a formal science has roots in ancient practices. Like alchemy and early civilization use of technologies related to materials and reactons with modern chemistry emerging in the 17th century with figures like Robert Boyle. Applications of chemistry1) we are using chemistry. When we cook, when we wash, when we eat, when we get ready, when we play, when we think. 2) Chemistry is used in developing new medicines and materials to understanding everyday process like cooking and cleaning. 3) Used in Drug development. 4) Used to understand Biological processes. 5) Used in developing vaccines and Antibiotics. Conclusion:- Chemistry is a branch of science that touches many aspects of our lives. Chemistry is also important for the environment. When we are aware of the harmful effects of the gases like $CO_2$ and $CH_4$ as the result of the greenhouse effect. We can easily carve out the solutions for the reduction of its effects on the environment.

# Water Management Importance

**Raj Kalchuri**
**B.A. 1st Year**



" Water crisis : A Reality check and our role in saving it"Water is essential for life, yet we waste it daily. Only 3% of Earth's water is fresh, out of which 2% is locked in glaciers, leaving less than 1% directly available for us. Still many parts of the world face severe shortage. If we don't act now, the future looks dry! The crisis is real. In 2018 , Cape Town (south Africa) faced "Day zero"when water almost ran out, and people were limited to 50 liters per day. In 2019. chennai (India) saw its reservoirs dry up, forcing people to stand in long queues for just a bucket of wate. Jordan, one of the driest countries, survives on only 100 liters per person per day, and experts say it may need to import drinking water in the future.scientists warn that by 2030, global water demand will exceed supply by 40% and by 2040, many countries may run out of fresh water. A NITI Aayog report states that 21 Indian cities, including Delhi and Bangalore, may lose groundwater by 2030. NASA confirms that glaciers - our biggest freshwater source - are melting fast, worsening the crisis.But we can still change the future!Rainwater harvesting, used successfully in many areas, helps store rain for keter use. Drip irrigation saves water in forming, leak repairs. prevent wastage, and wastewater recycling. reduce fresh water usage. Most importantly, every drop saved today secures tomorrow. If cape town and chennai have suffered. who's next? The answer depends.

Save water, Secure life!

# देववाणी संस्कृतम्

# विश्वसंस्कृत - दिवसः

कु.योगेश्री मेश्राम
बी.ए. भाग १




विश्वसंस्कृतदिवसः संस्कृतः विश्वसंस्कृतवासः, रोमनीकृतः विश्वसांस्कृतदिवसः इति नाम्ना अपि प्रसिध्दः, प्राचीन भारतीय भाषा संस्कृतं परितः केन्द्रितः वार्षिकः कार्यक्रम : अस्ति । यस्मिन् भाषायाः विषये व्याख्यानानि समाविष्टानि सन्ति, तस्याः पुनरूत्थानम् परिपालनं च प्रवर्धयितुं उद्दिश्यते । श्रावनपूर्णिमा दिनाङ्के अयं हिन्दु पचाङ्गे श्रावणमासस्य पूर्णिमादिवसः आचर्यते एतत् सामान्यतया ग्रेगोरी कालगणनायाम् अगस्तमासेन सह सङ्गच्छते। अस्य दिवसस्य प्रचारार्थं संस्कृतसंस्था संस्कृत-भारती सम्बध्दा अस्ति ।

श्रावणपूर्णिमा अर्थात् रक्षाबन्धन् ऋषिणां स्मरण-पूजन-उत्सवः तेषां समर्पणार्थं च पूजा - उत्सवः इति मन्यते। वैदिकसाहित्ये श्रावणी इति अस्मिन् दिने गुरुकुलेषु वेदाध्ययनात् पूर्वं यज्ञोपविता पवित्रसूत्रः- धार्यते । एतत् अनुष्ठानं उपनयनं उपकर्म संस्कारं वा कथ्यते । पुरातनं यज्ञोपविता अपि अस्मिन् दिने परिवर्तनं भवति । रक्षासूत्रणि च बध्नन्ति ऋत्विजां गणेभ्यः। ऋषयः संस्कृतसाहित्यस्य मूलस्रोतः इति मन्यते, अतः श्रावणीपूर्णिमा ऋषिपर्व इति विश्वसंस्कृत दिवसः इति आचर्यते । अस्मिन् दिने प्राचीन भारते शैक्षणिक वर्षस्य आरम्भः अभवत् इति कारणतः अयं दिवसः चयनितः । अस्मिन् दिने छात्राः गुरुकुलेषु वेदस्य अध्ययनं आरब्धवन्तः पौषमासस्य पूर्णिमातः श्रावणमासस्य पूर्णिमापर्यन्तम् अन्ये वेदान्तशास्त्रनि ज्ञातुं अध्ययनं स्थगितम् अस्ति। आधुनिक वैदिक विद्यालयेषु एषा परम्परा अद्यापि अखण्डिता अपि। विश्ववैदिकदिवसः जुलैमासस्य ११ दिनाङ्के अस्ति ।

१९६८ तमे वर्षे भारतसर्वकारस्य शिक्षामन्त्रलयेन केन्द्रीय-राज्यस्तरयोः संस्कृतदिवसम् आचरितुं निर्देशाः निर्गताः। ततः परं सम्पूर्णे भारत संस्कृतदिवसः आचर्यते । अस्मिन् अवसरेसंस्कृतकविसम्मेलनं,लेखकगोष्ठी, छात्र भाषणं, छन्द पाठ प्रतियोगिता इत्यादीनि आयोज्यन्ते येन संस्कृतस्य छात्रः, कविः, लेखकाः च समुचितं मंच प्राप्नुवन्ति ।

# ।। विद्यार्थी जीवनम् ।।

कु.अदिती गिऱ्हेपुंजे
बी.ए. भाग २

छात्र जीवनमेव मानवजीवनस्य प्रभातवेला आधारशिला च वर्तते । समस्तजीवनस्य विकासकस्य ह्रासस्य वा कारणम पुनज्जीवनमेवास्ति । वस्तुतः विद्यार्थिजीवनं साधना मयं जीवनम् अध्ययनं परमं तपः उच्चते। छात्र जीवने परिश्रमस्य महती आवयकता वर्तते । यः छात्रः आलस्यं त्यक्त्वा परिश्रमेण विद्याध्ययनं करोति स एव साफल्यं लभते । अतएव छात्रौः प्रातः काले ब्रम्हामुहुर्ते एवं उत्थातव्यम् कस्मैचित् कालाय भ्रमणपि अनिवायम। ततः प्रतिनिवृत्यः स्नानसन्ध्योपासनादिकं विधाय अध्ययनं कर्तव्यम् । तदान्तरं च लघुसात्विकं भोजनं दुग्धं च गृहीत्वा विद्यालयं गन्तव्यम् । तत्र गत्वा गुरुन्नत्वा अध्ययनं कर्तव्यम् । छात्रः असत्यवादनं न कदापि कर्तव्यम् । केनापि कविना विद्यार्थीनाम् लक्षनविषचे उत्कम्- छात्रजीवनं पूर्णतः अनुशासनबद्धं भवति ।विद्यार्थी जीवने एवं समस्तानी मानवोचितगुणानां विकास : भवति । छात्र एवं राष्ट्रस्ययानुपमा निधिरस्ति । अतः छात्रणां शारीरिकं चारित्रिकं च विकासं अत्यन्तानिवार्यम् । विद्यार्थी जीवनमेव सम्पूर्णानामिजीवनस्य आधारशिला । अतः तेषां सम्यक् रक्षणं पोषणम् च कर्तव्यम् ।

प्राचीन काले छात्रः गुरुकुलं गच्छन्ति स्म। तत्रैव ब्रम्हाचर्य पालयन् विद्याप्राप्त कुर्वानी स्म । अधुना शिक्षानीतीः परिवर्तिता । अधुना कपिपमाः छात्रः प्राथमिकिं शिक्षां गृहित्वा उच्चाशिक्षार्थ परदेशगमनं कुर्वनी । विश्वविद्यालयेषु पठन छात्रवासेषु वसन्ति । अधुना विद्यार्थिनां जीवनस्तर उच्चत्तरः अभवत् । विद्यार्थीजीवनं मानवजीवनस्य मुख्य आधारः । विद्यार्थीजीवने यादृशी शिक्षां प्राप्यते यान् संस्कारान् लभते तेषाम् उपयोगः समस्तजीवने भवति । अतः विद्यार्थिनः प्रथमं कर्तव्यं यत् विद्यापठने कदापि आलस्यं न कुर्यु । विद्यार्थीः जीवनं सदा अनुशासनपूर्ण भवेत् । यदि छात्रः अनुशासित भवति तदा तस्मे किमपि दुष्करं न भवति।

छात्रेण सदैव प्रातः सूर्योदयात् पूर्व उत्तिष्ठनीयम। प्राप्तः काले कृतं स्मरण चिरकालं तिष्ठति । छात्रस्य पठने रुचिः स्वाभाविकी भवेत् । यदि प्रसन्नमनसा पठति , तर्हि परीक्षायां श्रेष्ठान अङ्कान् अप्रिति । विद्यार्थीजीवने पठनेन सह क्रीडनमपि आवश्यकम् । शुध्द वातावरणे क्रीडनेन शरीरं स्वस्थं भवति तथा मनः अपि पठने एकाग्र भवति । यदि विद्यार्थी दिनचर्यानुसारं स्वकार्य समये करोति, तर्हि सः जीवने क्याफल्य प्रशिनी। विद्यार्थिन देशस्य भावी नागरिकाः सन्ति। आदर्शः छात्रः देशस्य आदर्शः नागरिकः खलु ।

## महिला सशक्तिकरण

कु.योगेश्री मेश्राम
बी.ए. भाग १

स्त्रियः स्वभावतः चपलाः स्वाभिमानिनः च भवन्ति । जीवनं स्त्रियः गर्भात् आरभ्यते । स्त्री स्वदायित्वं निर्वहति । स्त्रियाः संघर्षस्य अपारशक्तिः अस्ति ।प्राचीनकाले नारीणां स्थितिः उत्तमा आसीत्। नारी देवीरूपा पूजनीया च आसीत् । सर्वे जानन्ति यत् नारी प्रथमे तु कन्यारूपा भवति। अनन्तरं सा भगिनीरूप भार्यारूपा कन्यारूपा मातृरूपा च भवति। यदि कन्यारक्षणं न भविष्यति तर्हि भगिनी भार्या माता वा कुतः भविष्यति ? अतएव कन्यारक्षणं आवश्यकम् अस्ति।

प्राचीनयुगात् अस्माकं समाजे स्त्रीणां विशिष्टं स्थानं वर्तते। यथा ऋग्वैदिककालेषु लोपामुद्रा, घोषा सिकता, मैत्रेयी आपला एवं विश्वासाइति विदूषी स्त्रीणां वर्णनं विद्यते। अस्मासु पौरानिक ग्रंथेषु नार्ये उत्कं च-

यत्र नार्यस्तु पूजयन्ते रमन्ते तत्र देवताः।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्रफल
क्रियाः ।।

ताथापि व्यंगम् इदं दृश्यताम् नारीणां सशक्तिकरणस्य आवश्यकता अनुभूयते । स्त्रीयैव मानववर्गस्य अस्तित्वः भुता वति मन्यते । सरलशब्देषु महिला सशक्तिकरणम् परिभाषितं कर्तु शक्यते । स्वजीवने निर्णय ग्रहणस्य या शक्ति नारीषु वर्तते तस्याः शक्तेः बोधः उपयोश्च एका नारी कुर्यात समाजे तस्याः वास्तविक अधिकारं प्राप्ताय सक्षमनिणार्येव महिला सशक्तिकरणअस्ति । स्त्री स्वपरिवारस्य सदस्यानां पालनं करोति । वर्तमान समये समाजे एका प्रमुखा समस्या अस्ति। सर्वत्र यदा कदा नारीहत्यायाः समाचाराः श्रूयते । क्वचित् भृणहत्या क्वचित् यौतूकहत्या क्वचित अग्निदाहेन क्वचित क्वचित् विषपातेन वा। कन्या भृणहत्या तु राष्ट्रे कलङ् करुपा एव अस्ति । परन्तु इदं तु विचारणीयं यत् सावित्रीबाई फूले, रमाबाई, मदर टेरेसा आदय नार्मः समाजसेवा अकुर्वम्।

लतामंगेशकर, किरण बेदी, पी. वी. सिंधू, सानिया मिर्झा इत्यादयः विभिन्न क्षेत्रेषु प्रशंसनीय कार्यम् अकुर्वन् ।

अधुना कन्या शिक्षायाः महती आवश्यकता अस्ति। राष्ट्रस्य अर्धशक्तिः तु नारीषु एव अस्ति ।सर्वत्र सर्वेषु क्षेत्रेषु नारीशक्तिः अग्रिमा अस्ति । सैन्य क्षेत्रेषु शिक्षा क्षेत्रेषु क्रीडाक्षेत्रेषु राजनीति क्षेत्रेषु सामाजिक सेवाक्षेत्रेषु च यत्र - यत्र पुरुषाः सन्ति तत्र-तत्र नार्यः अपि सन्ति ।

अत एव कन्यानाम् अध्ययन - व्यवस्था अपि सुदृढा कर्तव्या । इदं सर्वेषां कर्तव्यम् अस्ति । अस्मिन् कार्य सर्वकारः अपि तत्परः अस्ति ।सर्वकारस्य उद् घोषम् अस्ति ---

'कन्यां रक्षतु, कन्यां पाठयतु।'

## योगः आध्यात्मिक एवं भौतिक विज्ञान

कु.रिया मोटघरे
बी.ए. भाग १

योगः एकः आध्यात्मिकः भौतिकः च विज्ञान : अस्ति । यस्य उत्पत्तिः प्राचीन भारते अभवत् । योगः अपि वैदिकदर्शनेषु अन्यतमः अस्ति ।

**योग शब्दस्य अर्थ :** योगशब्दः संस्कृतस्य युजशब्दात् निष्पन्नः। पाणिनी व्याकरणे युज समाधौ इति सूत्रम् अस्ति। योगशब्दस्य अर्थः बहुविधः संयोगः समागमः एकीभवः' इति ।

पतञ्जलि तथा अष्टांगयोग

पतञ्जलिः योगं मनसः प्रवृत्तीनां निवृत्तिम् (योगः योगचित्तवृत्तनिरोधः) इति परिभाषयति । तस्य मतेन योगस्य अष्टौ अंगाः सन्तिः अयं अष्टांगयोगः इति कथ्यते ।

१) यम - (अहिंसा, सत्य, असंग, ब्रम्हचर्य तथा संयम)बाह्य अवयव
२)नियम -(स्वाध्याय, सन्तोष, तपस्या, ईश्वरचिंतन) बाह्याङ्ग
३)योगासन बाहय अंग - सुगम एवं स्थिर आसन विधि
४) प्राणायम - बाह्याङ्ग -वायु गति नियमन
५)प्रत्याहार- बाह्य अंग इन्द्रियानिवृत्ति
६)धरण
७)ध्यान -आन्तरिक । मानसिक शरीर निरन्तर चिंतन
८)समाधि-आन्तरिक। मानसिक-तादात्म्य, बाह्यलोक -विस्मृस्ति ।

**योगचित्तवृत्तिनिरोध- अस्य सुत्रस्य अर्थः** योगः स एव मनुष्यस्य शरीरमनसस्य दासत्वात् अनेकजन्म-पर्यन्तं आत्मसाक्षात्कारात् वंचितः भवितुं तारयति । न तु मनसः प्रवृत्तीनां दमनेन । अपितु तान् ज्ञात्वा तेषां उत्पत्तिं न अनुमन्यते।

ध्यानेन आसनेन च शारीरिकं मानसिकं च सिध्दिं प्राप्तुं योगस्य मूलसिध्दान्तः अस्ति। अस्य प्रारम्भिकरूपाः हिन्दुग्रन्थेषु महाभारत, उपनिषद्, पंतजलिस्य-योगसूत्रेषु हठयोग प्रदीपिकासु च दृश्यन्ते।

**योगस्य महत्त्व :** योगः सम्पूर्ण विज्ञानं, सम्पूर्ण जीवनशैली, सम्पूर्ण चिकित्साव्यवस्था, सम्पूर्ण आध्यात्मिकं विज्ञानं च अस्ति । न केवलं व्यक्तिनिर्माणे, उत्थाने च अपितु परिवारस्य, समाजस्य, राष्ट्रस्य, विश्वस्य च सर्वतोमुखविकासे अपि अस्य उपयोगः सिद्धः अस्ति । योगः मनुष्यस्य सकारात्मक चिन्तनस्य विस्तृतमार्गे आनेतुं अभ्युतं विज्ञानम् अस्ति। यत् भारतस्य ऋषिभिः सहस्त्र वर्षपूर्व आविष्कृतम् आसीत्। महर्षि पतंजलि अष्टांगयोग रूपेण अनुशासितवान्, सम्पादितवान्, निष्पादितवान्।

## ज्योतिषशास्त्रम्

कु.साक्षी अतकरी
बी.ए. भाग १

हिन्दुज्योतिषशास्त्र प्राचीनकालात् एव विद्यमानं विज्ञानं ग्रहनक्षत्राणां स्थानेषु आधारितं विज्ञानम् अस्ति । ज्योतिषशब्दस्य उत्पत्तिः संस्कृतस्य ज्योतिशब्दे एव अभवत्।प्रकाशः किमपि प्रकाशं ददाति ज्योतिषशास्त्र एकं विज्ञानं यत् मनुष्यस्य जन्मसमये आकाशे ग्रहस्थानानां, आकाशे काले काले घटमानानां ग्रहस्थानानां च संयुक्त प्रभावानाम् अध्ययनं करोति, मनुष्यस्य जीवने ज्योतिषः भविष्यशब्दात निष्पन्नस्य ज्योतिषशब्दस्य दुर्नाम अस्ति।

ज्योतिष शास्त्रस्य त्रयः भागः

अस्माकं ऋषिभिः ज्योतिषशास्त्रं मुख्यतया त्रयःभागाः विभक्ताः सन्ति।

१. सिध्दान्तः - सिध्दान्त विभागे मुख्यतया ग्रहगणितस्य विषयः अस्ति। सिध्दान्ते ग्रहाणां स्थानानि पंचाग, मासः कालनिर्धारणं च अन्तर्भवति ।

२. संहिता - संहिता खन्डे मुख्यतया नक्षत्रेषु ग्रहणादिषु ग्रहाणां गतिः, एतेषु विषयेषु शुभपरिणामाः, शुभविचाराः इत्यादयः विषयाः अपि अन्तर्भवन्ति ।

३. होरा- होरा खंडे मुख्यतया मनुष्यस्य जन्मसमये ग्रहस्थानानां शुभफलं विचार्यते। एतत् जातकविभागः इत्यपि कुथ्यते।

ज्योतिषशास्त्रस्य इतिहास :

ज्योतिषशास्त्रस्य इतिहासः अतीव पुरातनः अस्ति।अस्य मूलं प्राचीन भारत - मेसोपोटामिया - ग्रीक-सभ्यताभिः सम्बध्दम् अस्ति। वस्तुतः यदा मनुष्यः आकाशे ताराणां ग्रहाणां च गतिं अवलोक्य स्वस्य अस्तित्वे तेषां प्रभावं अनुभवति तदा एवं एतत् विज्ञानं वर्तते। अद्यत्वे ज्योतिषशास्त्र विज्ञानम् इति प्रसिद्धम् अस्ति, यत् अद्यत्वे अस्माकं जीवने महत्वपूर्णा भूमिकां निर्वहति । ज्योतिषशास्त्रं ५००० वर्षाणाम् अधिकं पुरातनं विज्ञानम् अस्तिः ज्योतिषशास्त्रं तस्य उपयोगाःच।

अस्माकं जीवने ज्योतिषशास्त्रस्यमहत्त्वम् ।

अस्माकं धार्मिक सांस्कृतिक परम्परासु ज्योतिष शास्त्रस्य महत्त्वं गभीरं निहितम् अस्ति। इदं न केवलं भविष्यवाणीनां साधनं अपितु आत्मज्ञाने तथा निर्णयेषु तथा च समीचीन मार्गस्य चयनं कर्तुं बहु साहाय्यं कुरोतिः आत्मज्ञानम्: ज्योतिषशास्त्रं आत्मनः ज्ञाने सहायकं भवति । यः स्वशत्कयः कौशलं च अवगच्छति, तस्य जीवनशैली सरलं भवति, तस्य विचाराः गहनाः भवन्ति । कुण्डलीयाःअध्ययनं विश्लेषणं च कृत्वा भवन्तः व्यत्किस्य प्रकृतिःप्रवृत्तिः जीवनहघटनानि च विषये सूचनाः संगृण्हन्ति तथा विश्लेषणस्य आधारेण भविष्यस्य सम्भावनाः व्यंजर्यान्त ।

## सुभाषित संकलन

कु.रिया मोटघरे
बी.ए. भाग २

अर्थनाशं मनस्तापं गृहिणी चरितानि च।
दान मानापमानं च मतिमात्र प्रकाशयेत् ॥
अर्थ :- द्रव्यनाश, मनाला झालेला त्रस, पत्नीचे वर्तन, दान, मान आणि अपमान, या गोष्टी शहाण्या माणसाने उघड करून सांगू नये.

अधमा धनमिच्छति धनं मानं च मध्यमाः।
उत्तमा मानमिच्छति मानो हि महतां धनम् ॥
अर्थः हलक्या दर्जाची माणसे द्रव्याची इच्छा करतात, मध्यम प्रतीचे लोक धन आणि सन्मान या दोन्हीची इच्छा करतात, महान माणसे फक्त सन्मानाची इच्छा करतात ,सन्मान हेच महान माणसाचे धन असते.

अज्ञान तिमिरांधस्य ज्ञानांजन शलाकया।
चक्षुरुन्मिलितं येन तस्मै श्री गुरुवे नमः ॥
अर्थ - अज्ञानाच्या अंधःकाराने आंधळ्या झालेल्या मनुष्याचे नेत्र ज्ञानरूपी अंजनाने खोलणार्या गुरुला माझा नमस्कार.

गुणैः उत्तमतां यान्ति न उच्चौः आसन संस्थितैः।
प्रासादशिखरस्थोऽपि किं काको गरुडायते ॥
अर्थः ज्याप्रमाणे राजमहलाच्या शिखरावर बसल्याने कावळा गरुड बनत नाही त्याप्रमाणे गुणांनीच मनुष्याला मोठेपणा प्राप्त होतो कोणत्याही वरिष्ठ स्थानावर बसल्याने नाही.

अञ्जलिस्थानि पुष्पाणि वासयन्ति करद्वयम्।
अहो सुमनसां वृतिर्वामदक्षिणयोः समा।
अर्थःओंजळीत घेतलेली फुले दोन्ही हातांना सुवास देतात . खरोखर फुलांची आणि सज्जनांची वागणूक उजवा आणि डावा या दोन्ही बाबतीत समानच असते .

किं कुलेन विशालेन विद्याहीनस्य देहिनः।
अकुलीनोऽपि विद्यावान् देवैरपि स पूज्यते ॥
अर्थः विद्याहीन मनुष्य मोठा धरंदाज असला तरी त्याचा काय उपयोग ?उलट एखादा अकुलीन असूनही विद्वान असेल तर तो देवांनाही वंदनीय वाटतो.

# प्राध्यापकांच्या लेखणीतून...

# अभिजात मराठी आणि मराठी

## साहित्य संशोधन

**डॉ.बडू चौधरी**
मराठी विभाग
समर्थ महाविद्यालय, लाखनी

३ ऑक्टोबर २०२४ ला केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला. मराठी भाषा ही प्राचीनातली प्राचीनत्व असल्याचे शिक्कामोर्बत झाले. एवढेच नाही तर अभिजात भाषेचा दर्जा मराठी भाषेला मिळाल्याने मराठी भाषेच्या जतन व सर्वधनाकरीता केंद्र सरकार तर्फे महाराष्ट्र सरकारला अनुदान मिळणार व त्या आधारे महाराष्ट्र सरकार मराठी भाषेच्या विकासासाठी विविध योजना अंमलात आणतील. त्यात भारतातील प्रत्येक विद्यापीठात मराठी भाषा केंद्र बोली भाषेच्या विकासाकरीता स्वतंत्र बोलीभाषा भवन, मराठी साहित्यीकांना पुरस्कार अशा विविधांगी स्वरूपाच्या योजना राबविल्या जातील. त्यात कदाचित मराठी भाषेच्या संशोधन कार्याकरीता ही स्वतंत्र तरतुद केल्या जातील. मराठी साहित्याच्या संशोधनाला या अभिजात मराठीचा कितपत फायदा होतील व त्यासाठी मराठीतील संशोधन व संशोधक खरेच सकस आहेत का याचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

अभिजात मराठी महाराष्ट्रातील मुख्य भाषा, साहित्य प्रस्तावना वाडमय, संशोधन केंद्र सरकारने ऑक्टोबर २०२४ ला मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा दिला आणि मराठी भाषिकांना संधीची पर्वणीच निर्माण झाली असल्याचे सोशल मिडीयावरून बोलेले जावू लागले, यातून मोठ्या प्रमाणात मराठी भाषिकांना रोजगाराच्या संध्या निर्माण होतील असेही भाकित केल्या जावू लागले. त्यात मग वेगवेगळया क्षेत्रात मराठीला महत्व प्राप्त होतील, मराठीचा विकास होतील मराठी भाषिकांना रोजगार दिल्या जातील. अशा एक ना अनेक कल्पना आजमितीला मराठी भाषेच्या संदर्भात बोलल्या जावू लागल्या आणि त्यातीलच महत्वाचा घटक म्हणून मराठीतील संशोधनाला सुध्दा मोठ्या प्रमाणात चालना मिळेल असे भाकीत केल्या जावू लागले. म्हणूनच अभिजात मराठी आणि मराठी संशोधन यांचा ताळमेळ लावणे आजमितीला काळाची गरज बनली असल्याचे दिसते, म्हणूनच प्रस्तुत संशोधनात मराठी संषोधनाची काय स्थिती आहेत याचा उहापोह करणे गरजेचे वाटते.

अभ्यास निवडीमागील उद्देश :

१. अभिजात मराठी व मराठी संशोधन यांचा अनुबंध लावणे.
२. अभिजात मराठीतील संशोधनाची संकल्पना विषद करणे.
३. मराठीतील संशोधनाची वास्तविकता विशद करणे.

अभिजात मराठी आणि मराठी संशोधन या संशोधन लेखनासाठी ग्रंथालयीन, मानसशास्त्रीय, मुल्यात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला जाईल. अभिजात मराठी आणि मराठी संशोधन २०२४ ला भारत सरकारने मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेच्या दर्जा बहाल केला व मराठी भाषेची गेल्या कित्येक वर्षापासून चालू असलेला वनवासाला स्थिरता प्राप्त झाली आणि मराठी भाषेचा मराठी भाषिक गाजावाजा करीत अभिजात मराठीचे स्वप्नभास पहाण्यात व्यस्त झालेले दिसते. या माध्यमातून मराठी भाषिक, अभ्यासक आणि मराठीचे तत्ववेते मराठीच्या उज्वल भविष्याची स्वप्ने पाहू लागले आहेत. त्यामाध्यमातून मराठी भाषिकांना रोजगाराच्या संधी मिळेल ही अपेक्षा बाळगत वेगवेगळया क्षेत्रात मराठीला कशा स्वरूपाच्या सुवर्णसंधी मिळेल याची स्वने पाहू लागली आहेत. यात मग मराठीच्या अभ्यासकांना विविध विद्यापीठात स्वंतत्र दालन उपलब्ध होईल, बोलीभाषेला प्रत्येक जिल्हयात स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध करणे, मराठीतील उत्कृष्ट साहित्यीकांना पुरस्कार देणे, मराठीतील संशोधनाला चालना देणे, मराठीतील भाषिकांना रोजगार उपलब्ध करून देणे यासारख्या स्वप्नवती कल्पना मराठी भाषिक पाहू लागले. यातीलच महत्वाचे म्हणजे मराठी संशोधनाला चालना देणे हा मराठी भाषा टिकविण्याचा महत्वाचा पर्याय म्हणून पहावे लागते.

मराठी संशोधनाचा विचार करता मराठी साहित्याच्या संशोधनाला मोठा इतिहास मराठीत पहायला मिळतो. वि. का. राजवाडे पासून तर डॉ.अक्षयकुमार काळे पर्यंतचा समीक्षकांचा इतिहास मराठीत पहायला मिळतो. ज्या समिक्षकांना महाराष्ट्र हे नामाधिन कसे प्राप्त झाले इतपासून तर मराठीतील आद्यग्रथ कोणता या सारख्या विषयावर आपल्या संशोधनाच्या माध्यमातून विभिन्न मिमांसा करीता मराठीची पाळेमूळे शोधून काढली ऐवढेच नाही तर मराठीतील पहिले वाक्य हे कोणत्या शिलालेखात लिहिले आहेत याचाही शोध लावला. पुढे मराठीची संस्कृती ही महाराष्ट्राच्या बाहेरही कशी पोहचली होती, त्या माध्यमातून मराठीची संस्कृती ही बाहेरच्या राज्यात कशी पोहचली याचाही शोध मराठी संशोधकांनी घेतला. याच माध्यमातून मराठी ही अभिजात ठरली असे मानावे लागते.

पुढील काळात मराठीत चक्रधर, अठरापगड जातीतील संत, संत एकनाथाची भारूडे, संत तुकाराम, पंडीत कवी, शाहीर याचा इतिहास लिहूनच नाही तर त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यकृतीतून समाजाला कशी नविन उर्मी मिळाली हेही संशोधनाअंती सिध्द केले, संशोधनाच्या माध्यमातून त्यांच्या साहित्यातील भाव, त्यानी निर्माण केलेले विविध कला प्रकार याचाही शोध लावला. व त्यांच्या साहित्यातून समाज परिवर्तनाची उर्मी कशा स्वरूपाची होती याचा शोध घेत मराठी साहित्यातील विविध परंपरेचा शोध लावला व पुढील काळातील मराठी समिक्षेला या काळातील समिक्षेला चालना दिली.

पुढे महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशात इंग्रजी राजवटीचे सावट वावरायला लागले. ते गुलामगिरीचे असले तरी आधुनिक तत्वज्ञान वाटणारे सुध्दा होते. हे त्यांच्या कश्तीतून आणि त्यांच्या साहित्य परंपरेतून जाणवते त्यांनी शिक्षणाची दारे भारतात आणली. पुस्तक प्रकाशन सुरू केले. त्या माध्यमातून आपले तत्वज्ञान त्यांनी मराठी भाषांतरीत केले. म्हणूनच या काळाला भाषांतरण युग म्हणून सुध्दा ओळखल्या जाते. या काळातील मराठी संशोधकांनी यांचा फायदा घेत अनेक साहित्यकश्ती मराठीत भाषांतरण करीत मराठी समुदायाला आपल्या गुलामीची जाणिव करून दिले. महात्मा फुले यांच्या सारख्या महात्माने छत्रपती शिवरायाच्या समाधीस्थळाचा शोध लावला. मुलींना शिक्षणाची दारे खुले करून शिक्षणाला महत्वाचे स्थान प्राप्त करून दिले. याचीच परीणिती म्हणून अनेक मराठी संशोधक विविधांगी शोध लावू लागले.

भारतीय स्वातंत्र्याच्या पर्वात मराठीत विविध प्रवाहाची निमिर्ती होवून व त्यावर संशोधकांनी त्या साहित्याचा शोध घेवून विविधांगी समाजपातळीचा शोध घेवून त्यांच्या समस्या जगापुढे मांडल्या एवढेच नाही तर या समाजाला पुढे आणण्यास त्यांचे संशोधन कामात आले. यातून मग दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, नागर साहित्य, भाषांतरीत साहित्य अशा विविधांगी साहित्यप्रवाहाचा शोध लावीत त्यातील साहित्याचे मर्म शोधण्याचे काम तत्कालीन मराठी संशोधकांनी केले. मराठी भाषेला सकस केले. पुढे नवोदत्तरी काळात जागतीकीकरणाची लाट संपुर्ण देशावर आली त्यांचा परिणाम मराठी भाषिकांवर सुध्दा पडला. त्यांचे जगणे महाग झाले अशा या पर्वात आलेल्या साहित्याचा अभ्यास करीत सर्वसामान्यांच्या समस्यांचा शोध मराठी संशोधकांनी घेतले व मराठी भाषा समृध्द केले. अनेक बोलीचा शोध घेत त्या बोलीतील मराठीचा अभिजातपणा विषद केला. मराठी भाषा अभिजात करण्यात मदत केली.

आजमीतीला मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला असला तरी याचा मराठी संशोधनाला कितपत फायदा होईल आणि मराठी संशोधन तेवढेच सक्षम आहेत का याचा प्रामुख्याने विचार होणे गरजेचे ठरते. एकीकडे मराठीची समृध्द असणारी संशोधन परंपरा आणि आजमितीची संशोधन परंपरा यात मोठी तफावत वाढत असल्याचे जाणवते. केवळ उन्च शिक्षण मिळविण्याच्या नावाखाली म्हणजेच आचार्य पदवी मिळविण्या करीता फक्त संशोधन केले जाते, किंवा बढती मिळण्याकरता या संशोधनाचा विचार केला जातो. मग ते संशोधन सकस आहेत का याचा फारसा विचार होताना दिसत नाही. अनेक महाभाग केवळ पैशाच्या जोरावर दुसऱ्यांच्या मदतीने संशोधन करताना दिसतात, त्या संशोधनातला अ ब क ही त्यांना माहित नसते, तरी त्यांचे संशोधन पुर्ण होते. तर दुसरीकडे अनेक रोजगार नसलेले केवळ आपले पोट भरण्यासाठी फलोशिपच्या नावाने आपले संशोधन चालू ठेवित सरकारचे अनुदान उचलण्यापुरतेच त्या संशोधनाचा उपयोग करून घेताना दिसतात. परिणामी त्यांचे संशोधन सकस दर्जाचे होताना दिसत नाही. अशा पार्श्वभुमीवर अभिजात मराठीचा फायदा मराठी संशोधनाला कितपत होईल हे सांगता येत नाही

अभिजात मराठीमुळे अनेक मराठी भाषिकांना रोजगाराच्या संध्या उपलब्ध होतील त्यात मराठी संशोधन क्षेत्रला सुध्दा याचा लाभ होईल. परंतु मराठी संशोधक केवळ आचार्य पदवी मिळविण्यापुरताच किंवा बडती मिळण्यापुरताच किंवा फेलोशिप मिळविण्यापुरताच विचार करतील तर मात्र तो मराठी भाषिकाचा गैरसमज ठरू शकतो. कारण यातुन कोणतेही संशोधन पुढे जावू शकणार नाही. त्यामुळे मराठी संशोधनाची पातळी वाढविणे गरजेचे ठरते. या माध्मयातून अनेक शिलालेखांचा शोध घेत तेथील पर्यटन वाढविणे, मराठीशी संबधीत अनेक साहित्याचा दालने खुले करून ते सर्वसामान्यापर्यंत पोहचविणे त्या माध्यमातून रोजगार कसा वाढेल यावर संशोधकांनी भर देणे गरजेचे ठरेल तरच मराठीतील संशोधनाचा दर्जा वाढण्यास व मराठीची अभिजातता टिकण्यास मदत होईल.

# अभिजात मराठीला भंडारा जिल्हयाचे योगदान

प्रा. अजिंक्य भांडारकर
मराठी विभाग
समर्थ महाविद्यालय, लाखनी

भारतामध्ये विविध भाषिक परंपरा आणि सांस्कृतिक वारसा असलेल्या अनेक भाषांमध्ये मराठीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. भारतीय भाषांची संस्कृती, साहित्य आणि परंपरा प्राचीन काळापासून समृद्ध आहे. या ऐतिहासिक परंपरेचा महत्त्वपूर्ण भाग म्हणून मराठी भाषा, तीचे साहित्य आणि त्याच्या विकासाचा इतिहास अत्यंत गौरवपूर्ण आहे. मराठी भाषेला ३ ऑक्टो २०२४ ला अभिजात भाषेचा दर्जा दिला गेला, या मागे मराठीच्या साहित्यिक आणि ऐतिहासिक वारशाचे मोठे योगदान होते. संस्कृत, प्राकृत, कन्नड, तेलगू आणि मल्याळम यासारख्या इतर भाषांना हा दर्जा दिला आहे.

भारतामध्ये विविध भाषिक परंपरा आणि सांस्कृतिक वारसा असलेल्या अनेक भाषांमध्ये मराठीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. भारतीय भाषांची संस्कृती, साहित्य आणि परंपरा प्राचीन काळापासून समृद्ध आहे. या ऐतिहासिक परंपरेचा महत्त्वपूर्ण भाग म्हणून मराठी भाषा, तिचे साहित्य आणि त्याच्या विकासाचा इतिहास अत्यंत गौरवपूर्ण आहे. मराठी भाषेला २०२४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर, हा संस्कृत, प्राकृत, कन्नड, तेलगू आणि मल्याळम यासारख्या इतर भाषांद्वारे दिला गेलेल्या दर्जाच्या मागे मराठीच्या साहित्यिक आणि ऐतिहासिक वारसाचे मोठे योगदान होते. यामध्ये भंडारा जिल्ह्याचे योगदान अत्यंत विशेष ठरते. भंडारा जिल्ह्यातील आंभोरा, वैनगंगेचे तीर, आणि त्या ठिकाणी घडलेली ऐतिहासिक मटनांची पार्श्वभूमी मराठी भाषेच्या आद्य ग्रंथांच्या लेखनासाठी महत्त्वपूर्ण ठरली. विशेषतः विवेकसिंधू या ग्रंथाचे लेखन आणि त्याच्या निर्माणाची कथेतील स्थानिक महत्त्व, मराठी साहित्याच्या आद्य काव्य साहित्यिक परंपरेचे अवलोकन करण्यासाठी अनिवार्य ठरते.

अभिजात भाषा म्हणजे अशी भाषा जी आपली ऐतिहासिक आणि साहित्यिक परंपरा कायम ठेवत, कलेचा आदर्श म्हणून मानली जाते. यामध्ये त्या भाषेचा पुराणकाळ, साहित्यिक महत्त्व, सांस्कृतिक वारसा, आणि समाजाच्या आयुष्यात भूमिका यांचे मिश्रण असते अभिजात भाषेसाठी अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे त्या भाषेची समृद्ध साहित्यिक परंपरा, त्या भाषेच्या साहित्याच्या विविध प्रकारांचे अस्तित्व, आणि त्या भाषेचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने, मराठी साहित्याची महत्त्वाची परंपरा अधिक महत्त्वपूर्ण ठरली.

**भंडारा जिल्ह्याचे योगदान**

अभिजात मराठीच्या योगदानाच्या भंडारा जिल्ह्याचे योगदान मोठे आहे. कारण मराठीतील आद्यग्रंथ विवेकसिंधू या ग्रंथाचे लिखाण भंडारा जिल्ह्यातील आंभोरा येथे वैनगंगेच्या तीरावर केले. वैनगंगा, कन्हान, आम, मुर्झा, कोलारी या पाच नद्यांच्या संगमावर बसलेले चौतन्यर्श्वर मंदिर हे श्री श्रेत्र आंभोरा येथे आहे. येथील चैतन्यश्वर महादेवाची लिंगपिंड ही स्थापन केलेली नसून ती यज्ञातून स्वयं प्रगट झालेली आहे.

विवेकसिंधु ग्रंथ लेखनाचा काल व स्थल निर्देशक

शिला शके १११० होत्तरु। साधारण नाम संवतसरू।
राजा शारंग चरु। राज्य करी।।
ऐसा समयो सर्वोत्तम। तेथ मुकुंद द्विजोत्तमुः ।
विवेक सिंधु मनोरमु। निर्मिता झाला।
लिहिणार सुरेंद्र भारती। संमत १२४४ प्रती।
विजयादशमी मुहर्ती। सूर्य माध्या नियेता।
वैनगंगेचे तीर। अंबा नगरी असे थोर।
श्री गुरु समोर। ग्रंथ समाप्त जाहला ।।

शके ११२२ ची प्रत विवेक सिंधु उत्तरार्ध घघ अध्यायात लिहून ठेवले आहे. या ग्रंथाचे संपादन श्री रामचंद्र विबुल बोबडे यांनी केले आहे.

भंडारा जिल्ह्याचे योगदान मराठी भाषेच्या इतिहासात अनेक प्रकारे महत्त्वपूर्ण आहे. भंडारा जिल्ह्यातील आंभोरा, वैनगंगेच्या तीरावर असलेली ऐतिहासिक ठिकाणे, त्या ठिकाणी असलेले धार्मिक महत्त्व, आणि या ठिकाणांवर असलेले आध्यात्मिक स्थळ, यांचे मराठी साहित्याच्या विकासाशी सखोल संबंध आहेत. लीळाचरित्र या प्राचीन चरित्रग्रंथात नीळोभट्ट व श्रीचक्रधरस्वामी यांच्या गुरु शिष्य प्रेमाचे दाखले लीळाचरित्रत पदोपदी आढळतात. लीळा चरित्रतील 'भांडारेकारा देहावसान' या लीळेतून श्रीचक्रधरस्वामी आणि नीलोभट्ट भांडारेकर यांचे नाते किती अतूट होते हे दिसून येते.

लीळाचरित्रच्या एकाकातील 'भांडारेकरां भेटी' या लीळेत भंडार्याच्या या शिष्याचा सविस्तर उल्लेख आलेला आहे. श्रीचक्रधरस्वामी भंडारा येथे आले असतांना त्यांची नील्लोभट्ट भांडारेकर यांच्याशी भेट झाली. श्रीचक्रधरस्वामी यांच्या भेटीनंतर नीळोभट्ट भांडारकर हे सदैव श्रीचक्रधरांच्या सोबत राहिले. भंडारा येथून जातांना नीळोभट्ट भांडारेकर पत्नीला उद्देशून म्हणाले एतुले दिस तुम्हांपासि होते: आता जयाचे तयापाठी जात असेरूतुम्ही राहा: असा उल्लेख लीळाचरित्रमध्ये आलेला आहे.

**आंभोरा आणि विवेकसिंधू :**

भंडारा जिल्ह्यातील आंभोरा हे एक धार्मिक ठिकाण आहे. येथेच मराठीच्या आद्य ग्रंथ विवेकसिंधु चे लेखन करण्यात आले. विवेकसिंधू हा ग्रंथ मुकुंदराज महाराज यांनी लिहिला. विवेकसिंधू हा ग्रंथ मराठी भाषेतील पहिला काव्यग्रंथ म्हणून ओळखला जातो, जो तत्त्वज्ञान, नैतिकता, आणि समाजोपयोगी शिकवणी दान करतो. हा ग्रंथ आद्य मराठी साहित्याचा एक भाग म्हणून महत्त्वपूर्ण आहे. वैनगंगेच्या तीरावर असलेल्या आंभोरा स्थानकाचे ऐतिहासिक महत्त्व या काव्यग्रंथाच्या निर्मितीशी निगडित आहे. विवेकसिंधु चे लेखन स्थानिक परंपरेशी जोडले गेले आहे, जिथे चौतन्यश्वर महादेवाची लिंगपिंड स्वयं प्रगट झालेली आहे. त्याच ठिकाणी मुकुंदराज आणि गुरु हरिनाथ यांच्या संवादांनी आणि काव्यनिर्मितीने विवेकसिंधू या ग्रंथाचा जन्म घेतला.

**विवेकसिंधूचा शिलालेख :**

विवेकसिंधू या ग्रंथाच्या लेखनाची तारीख शके १११० आहे. या ग्रंथाचे लेखन एका विशिष्ट धार्मिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीवर झाले, ज्यामुळे त्याचा अधिक ऐतिहासिक संदर्भ महत्त्वपूर्ण ठरतो. विवेकसिंधू एक काव्यात्मक ग्रंथ असून त्यात जीवनाच्या तत्त्वज्ञानावर आणि योग्य व अयोग्य यावरील चर्चा केली आहे. हा ग्रंथ त्या काळातील उच्च तत्त्वज्ञानाच्या आणि आचारधर्माच्या विचारांची पोहोच वाढवण्यास कारणीभूत ठरला. याचा प्रभाव पुढे मराठी साहित्याच्या इतर आधारावर पडला, ज्यामध्ये संत व पंत परंपरेचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. विवेकसिंधू चे प्रभाव इतर काव्यग्रंथांवर पडले, ज्यामुळे मराठी साहित्याचा समृद्ध वारसा घडला. विवेकसिंधू आणि सांस्कृतिक संदर्भ विवेकसिंधू हा ग्रंथ त्यावेळच्या सामाजिक, धार्मिक आणि तात्त्विक परिप्रेक्ष्यातील एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. हा ग्रंथ केवळ काव्यग्रंथ नाही, तर त्यात असलेल्या तत्त्वज्ञानाच्या गाभ्यात मराठी संस्कृतीचे मूलभूत धडे दिले आहेत. मुकुंदराज महाराज यांनी त्यामध्ये सर्वसामान्य माणसाला ज्ञानाची प्राप्ती कशी होईल, समाजातील वाईट गोष्टींबद्दल विचार कसा या ग्रंथाच्या लेखनासाठी विवेकसिंधू स्थानिक धार्मिक घटकांसोबत जोडले गेले आहे. वैनगंगेच्या तीरावर चौतन्यश्वर महादेवाच्या स्वयं प्रगट होण्याच्या कथेने या ग्रंथाला एक अद्वितीय धार्मिक संदर्भ दिला आहे.

वैनगंगेचे तिरी। मनोहर अंब नगरी ।।
तेथे प्रगटले श्री हरी । जगदीश्वर।।
विवेकसिंधू । चैतन्यश्वर ।।

येथेच श्री हरिनाथ शिष्य रामचंद्र उर्फ रघुनाथ यांची जिवंत समाधानी आहे. या समाधी समोर महाराष्ट्रातील मराठीचा आद्यग्रंथ विवेकसिंधू तसेच परमामृत, पवनविजय हे ग्रंथ मराठीचे आद्य कवी मुकुंदराज महाराज यांनी शके १११० मध्ये याच ठिकाणी लिहिले आहे. याच ठिकाणी हरिनाथांनी १२ वर्ष पाशुव्रत करून यज्ञ केला. त्यातून चैतन्यश्वर (महादेव) स्वयं प्रगट झाले.

लीळाचरित्राच्या एकाकातील 'भांडारेकरां भेटी' या लीळेत भंडाऱ्याच्या या शिष्याचा सविस्तर उल्लेख आलेला आहे. श्रीचक्रधरस्वामी भंडारा येथे आले असतांना त्यांची नीळोभट्ट भांडारेकर यांच्याशी भेट झाली. श्रीचक्रधरस्वामी यांच्या भेटीनंतर नीळोभट्ट भांडारेकर हे सदैव श्रीचक्रधरांच्या सोबत राहिले, भंडारा येथून जातांना निळोभट्ट भांडारेकर पत्नीला उद्देशून म्हणाले एतुले दिस तुम्हांपासि होते: आता जयाचे तयापाठी जात असेरूतुम्ही राहा निळोभट्ट व श्रीचक्रधरस्वामी यांच्या गुरु शिष्य प्रेमाचे दाखले लीळाचरित्रात पदोपदी आढळतात. 'भांडारेकारा देहावसान' या लीळेतून श्रीचक्रधर स्वामी आणि निळोभट्ट भांडारेकर यांचे नाते किती अतूट होते हे दिसून येते.

**२०११ मध्ये अभिजात मराठी अहवाल समितीची स्थापना :**

२०११ मध्ये भारत सरकारने अभिजात मराठी भाषेच्या मान्यतेसाठी एक समिती स्थापन केली होती. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या या समितीने मराठी भाषेच्या साहित्यिक परंपरेचे अध्ययन करून अभिजात भाषेच्या दर्जासाठी शिफारस केली. या समितीच्या कार्यामुळे, २०२४ मध्ये मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.

**२०२४ मध्ये मराठी भाषेला अभिजात दर्जा :**

२०२४ मध्ये भारत सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन त्या भाषेच्या ऐतिहासिक महत्त्वाला मान्यता दिली. या निर्णयामु ळे मराठी भाषेचे साहित्य आणि संस्कृती आणखी जागतिक स्तरावर प्रसिद्ध होईल, यामुळे मराठी भाषेचा वारसा आणि परंपरा आणखी प्रगल्भ होईल आणि त्याला नवा आदर्श प्राप्त होईल.

# अभिजात मराठी भाषा संकल्पना

प्रा. मिलिंद कांबळे
मराठी विभाग
समर्थ महाविद्यालय, लाखनी

मराठी भाषेला आता अभिजात दर्जा मिळाला आहे. मराठी जनांसाठी हा आनंदाचा सण आहे. मागील तीन दशकापासुन सरु असलेल्या अभ्यासकांचे, साहित्यिकांचे आणि सर्व मराठी प्रेमीच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. मराठी भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठी भाषा २५० वर्षे जुनी असल्याचे पुरावे शासकीय अहवालात सांगितले आहे. ११ कोटी लोकांची मराठी भाषा जगात ९० व्या क्रमांकाची भाषा आहे. देशातील मराठी भाषा एक महत्त्वाची राष्ट्रीय भाषा आहे. तिच्या ऐतिहासिक प्रवासाचे संदर्भ देत आणि विविध शतकातील विविध साहित्यकांनी दिलेल्या योगदानाच्या विचार करून तिचे अभिजातपण स्वयं सिद्ध आहे जसे देखील शासनाच्या अहवालात म्हटले आहे.

माझा मराठाचि बोलु कौतुकें।
परि अमृतातेंही पैजां जिंके।
ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन ।।

अमृताची जैसी पैज लावली तरी माझ्या माझ्या मराठीची बोली (माझी मराठी) ती पैज जिंकेल कारण अमृता पेक्षाही माझ्या मराठी भाषेत गोडवा आणि माधुर्य अधिक आहे, असे संत ज्ञानेश्वर मराठी भाषेच्या गोडावा गातांना सांगतात, ''माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा'' हिच्या सांगण्याने जगल्या दर्या खोऱ्यातील शिडा, लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरीच धन्य ऐकतो मराठी अशी कविवर्य कुसुमाग्रजांनी तिची म्हणती सांगतात. अशा मायबोली मराठी भाषेच्या अभिमान कवी, लेखक व समीक्षक तसेच सर्व सामान्य माणसाला देखील आहे. मातृभाषा मराठी असल्यामुळे तिचे गोडवे गाणे ही आपले आद्य कर्तव्य आहे. कारण ही आपली मातृभाषा आहे. तिने आम्हास बोलायला शिकविले, बोलते केले आहे.

**मराठी भाषेचा उगम :**

मराठी भाषेला मौलिकता, अखंडता आणि सलगता परपरेने होतीच, तिच्यात कोठलाही कालिक खंड आढळत नाही. मराठी भाषेत लीळाचरित्र आणि ज्ञानेश्वरी यांसारखे अभिजात ग्रंथही आहेत. मराठीत प्रकाशित झालेल्या पुस्तकांची संख्या एक लाखापेक्षा अधिक आहे. त्यांतील कमाल पाच हजार ग्रंथ जागतिक स्तरावर गुणवत्तेने श्रेष्ठ ठरवण्याच्या दर्जाची आहेत. अभिजात म्हणजे श्रेष्ठ, मराठी भाषेचे आधुनिक रुप हे तिच्या अर्वाचीन रुपापेक्षा वेगळे असले नाते स्पष्टपणे अधोरेखित होते. प्राचीन मराठी भाषा आणि तिचे आधुनिक रुप यांची सांगड तिच्या व्याकरणासह सहज घालता येते. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरकालीन (तेरावे शतक) मराठी भाषा आणि आताची मराठी भाषा, शिवकालीन (सतरावे शतक) भाषा आणि एकविसाव्या शतकातील भाषा ही एकच आहे. अठराव्या शतकातील मराठी भाषा आणि आताची मराठी भाषा यांत थोडाफार भाषिक फरक असला तरी ती भाषा एकच आहे आणि फक्त भाषाशास्त्राच्या नियमानुसार कालप्रवाहामुळे तिचे हे बदल आहेत हे सहज स्पष्ट होत होते. मुख्य अडचण होती ती मराठी भाषा ही दीड ते दोन हजार वर्षे जुनी आहे.

मराठी भाषेचा उगम संस्कृत भाषेपासून झाला नसून ती पूर्ववैदिक बोलीमधून तयार झाली असे संशोधन अठराव्या शतकात राजारामशास्त्री भागवत यांनी करून ठेवले आहे. संस्कृत भाषा तयार होण्याआधी वैदिक भाषा अस्तित्वात होती. त्या सूत्रने मराठी भाषेचे वय दोन हजार पेक्षा जास्त ठरते. दुसऱ्या शतकातील वररुचीचे व्याकरण या ग्रंथात मराठी व्याकरणाचे नियम सांगितले आहेत. त्याचा अर्थ दुसऱ्या शतकात मराठी भाषा अस्तित्वात होती, अडीच हजार वर्षापूर्वीच्या विनयपिटक या पाली भाषेतील धर्मग्रंथात महारठ्ठ असा उल्लेख आढळतो, हे भाषेच्या अस्तित्वाचे प्रमाण आहे. श्रीलंकेतील सिंहली भाषेतील दीपवंश ग्रंथात महारत्ठ, महाराष्ट्र असे शब्द आढळतात, त्या अर्थी हा प्रदेश आणि ही भाषा त्या काळी अस्तित्वात असणारच, यावरून मराठी भाषेची प्राचीनता किमान दीड-दोन हजार वर्षे जुनी असावी.

मराठीचा भाषिक प्रवास प्राचीन महारठ्ठी भाषा, मरहट्टी, महाराष्ट्री, प्राकृत, अपभ्रंश मराठी, आजची मराठी असा झाला आहे. या भाषा वेगवेगळ्या नसून ती रुपे मराठी या एकाच भाषेची आहेत, असे ल. रा. पांगारकर यांनी सोदाहरण दाखवून दिले आहे. लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू हे मराठीतील आद्य ग्रंथ नव्हेत, तर ते मराठी प्रगल्भ व श्रीमंत झाल्यानंतरचे श्रेष्ठ ग्रंथ आहेत. ते ग्रंथ आठशे वर्षापूर्वी ज्या मराठी भाषेत लिहिले गेले ती त्याच्या आधी किमान नौदाशे वर्षे समृद्ध भाषा होती याचे शिलालेख, ताम्रपट, पोथ्या आणि हस्तलिखित ग्रंथ असे पुरावे उपलब्ध झाले आहेत. मराठीत उपलब्ध असलेला आणि दोन हजार वर्षे

जुना असलेला ग्रंथ म्हणजे गाथासप्तशती अथवा गाथा सत्तसई हा आहे. तो ग्रंथ दुसऱ्या शतकातील सतरावा सातवाहन राजा व कवी हाल याने लिहिला आहे.

अभिजात भाषा ही एक अशी भाषा आहे की जी दीर्घकाळ टिकून आहे. जिने आपल्या भाषिक क्षेत्रात असो की साहित्य सांस्कृतिक आणि वैचारिक तात्विक दृष्ट्या योगदान दिली आहे. मराठी भाषेच्या ऐतिहासिक व साहित्यिक वारसा मोठा आहे. तिच्या गौरवाच्या अभ्यास व्यापक दृष्टिकोनातून केला जात आहे. अभिजात भाषेची महत्त्व केवळ या भाषेपुरतेच महत्त्वाचे नाही तर तिची कीर्ती जगभरात पसरलेली आहे. कोणत्याही भाषेला अभिजात भाषा म्हणून मान्यता मिळण्यासाठी तिचे ऐतिहासिक महत्त्व पूर्ण नव्हे तर तिच्या साहित्यिक सांस्कृतिक आणि सामाजिक प्रभावामुळे तिला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त होते. अभिजात भाषा केवळ एक साधन नसून ती त्या समुदायाच्या जडणघडणीची व एकंदर विकासाची आधारशिला ती त्या समुदायास आधार देण्याचे आधारस्तंभ सारखी उभी असते. म्हणून अभिजात भाषा म्हणून तिचे महत्त्व अन्यन्य साधारण आहे.

भाषेला अभिजात दर्जा म्हणजे काय? तर भाषा अधिक समृद्ध अधिक प्रभावी होणे आणि ती परिवर्तनशील बनने हे आहे. अभिजात दर्जा मिळल्याने भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारकडून भरीव अनुदान दिले जाते. मराठी भाषेची अभिजात पण टिकविण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक होते. शिक्षण, साहित्य तंत्रज्ञान, संस्कृती आणि शासन या सर्व क्षेत्रांमध्ये मराठी भाषेला महत्त्व आहे. लोकांच्या मनात आदर आणि प्रेम निर्माण होईल, असे विविध उपक्रम उच्च पातळीवर राबविणे आवश्यक आहे व राबविले पाहिजे. मराठी भाषाही केवळ संवादासाठी व संप्रेषणासाठी भाषा नसून ती सांस्कृतिक आणि बौध्दिक वारसा जोपासणारी भाषा आहे, हे लक्षणीय आहे. भाषासंवर्धन ही निरंतन चालणारी प्रक्रिया असून शासन आणि जनता या दोहोंचाही समन्वयपूर्ण सहभाग आवश्यक असतो. अर्थात, भाषेचा 'विकास' म्हणजे नक्की काय या विषयीची आपली धारणा पक्की असायला हवी. 'भाषेचा विकास ही संकल्पना मनोभाषाविज्ञानात भाषा संपादन किंवा भाषा आत्मसात करण्याची प्रक्रिया यामधून येते, तर समाजभाषा विज्ञानात विशिष्ट भाषेनी वापरसापेक्ष वाढ किंवा प्रगती व तिचे समाजातील स्थान यामधून प्रचलित आहे. त्यासाठी भाषावैज्ञानिकांनी भाषेच्या विकासाचे काही निकष, मापदंड सांगितलेले आहेत. विशेष म्हणजे, मराठी भाषेच्या विकासासंदर्भात ज्या साहित्यव्यवहाराचा आपल्याकडे पदोपदी उल्लेख होतो त्याचा या मापदंडांत अजिबात समावेश नाही.

डॉ. रंगनाथ पठारे यांच्या उपसमतीच्या १९ बैठका झाल्या, सप्टेंबर २०१८ साली राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्याकडे पुन्हा तो अहवाल सादर केला गेला व पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्रिमंडळ याच्या पुढाकाराने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय घेतला गेला.अभिजात दर्जामुळे मराठीच्या बोलीचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळेल आणि साहित्य संग्रह करण्यास चालना मिळेल. भारतातील ५० विद्यापीठात मराठी भाषा शिकविण्याची सुविधा उपलब्ध होईल, तसेच राज्यातील बारा हजार ग्रंथालयात मराठी भाषेची ग्रंथालय ससक्त होण्यास मदत होईल. अभिजात मराठी भाषेतील अभ्यासक विद्वानांना दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार दिले जातील. ते आता मराठी भाषेत काम करणाऱ्या व्यक्तींना मिळणार आहेत. मराठी भाषा विकासासाठी काही संस्था उभारल्या जातील. तसेच मराठी भाषेच्या विकासाच्या विविध प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी अधिक तरतुदी केल्या जाईल. प्रत्येक भाषेसाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी कोटी रुपये अनुदान दिले होते.

मराठी भाषेची विद्यापीठ सुरू करून या ठिकाणी भाषाविषयक संशोधनावर सर्वाधिक भर दिले जाईल. तसेच मराठी भाषेची व्याकरण, त्यामधील नवे प्रवाह आणि संपूर्ण नव्या जगाची भाषा या दृष्टिकोनातून भाषेच्या विकास कसा करता येईल, याविषयीचा आराखडा तयार केला जाईल. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने आपल्या वेबसाईटवर अभिजात दर्जा मिळवण्याचे भाषा संवर्धनासाठी काय फायदे होतील हे सांगितले. त्यात मराठी बोलीचा अभ्यास संशोधन साहित्य संग्रह करणे भारतातील सर्व ५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकविण्याची सोय करणे.

**अभिजात भाषेचे भविष्य:**

भाषा केवळ अभिजात ठरवल्याने अमर होत नाही, मराठी भाषेला सगळयांनी मिळून जगवावे लागणार आहे. केवळ प्राथमिक शाळांत नाही तर पदवीपर्यंत मराठीची सक्ती असली तरच मराठी जगणार आहे. म्हणजे शिक्षणाचे माध्यम मराठी हवे. इंग्रजी भाषा उच्च शिक्षणासाठी शिकण्यास परवानगी ठीक आहे, परंतु आपली विचार करण्याची भाषा मराठीच असायला हवी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा नसल्या तरच हे साध्य होणार आहे. अर्थात मराठी भाषेतून शिकूनही नोकऱ्या, व्यवसाय उपलब्ध होऊ लागले तरच ते शक्य आहे. त्यासाठी मराठी ही बोली, व्यवहारभाषेसह वाणिज्य, शास्त्र, तंत्रज्ञान, विज्ञान अशी सर्वांगीण ज्ञानभाषा होण्यास हवी. महाराष्ट्रात आपापसात संवादाची भाषा ही मराठीच असली पाहिजे, ती बहुतांश हिंदी होऊन गेली आहे. स्वतः मराठी माणूस परप्रांतीयांसोबत हिंदी बोलण्यास सुरुवात

# वाढते परीक्षा शुल्क सरकारी उत्पन्नाचे साधन

प्रा.युवराज जांभुळकर
अर्थशास्त्र विभाग
समर्थ महाविद्यालय, लाखनी

भारत हा जगामध्ये तरुणांच्या देश म्हणून ओळखला जातो. येत्या काळामध्ये भारत हा म्हाताऱ्या माणसांचा देश म्हणून ही ओळखला जाईल आणि भारत हा चीन व जपान सारख्या प्रगत समजल्या जाणाऱ्या देशांच्या पंक्तीमध्ये जाऊन बसले. सध्या चीन आणि जपान या देशांमध्ये म्हाताऱ्या लोकांची समस्या जाणवत आहे. सर्वसाधारण वयाची ६५ वर्ष पूर्ण करणारे लोक हे म्हातारे म्हणून गनले जातात. सध्या जपानमध्ये एकूण लोकसंख्येच्या २९.४ टक्के लोकसंख्या ही म्हातारी आहे. चीन मध्ये ती १५.४ टक्के एवढी आहे. तर आपल्या देशामध्ये म्हणजेच भारतात ती ७.३ टक्के एवढी आहे. सहाजिकच येणाऱ्या काळामध्ये भारतातील म्हाताऱ्या लोकांची संख्या ही जापान आणि चीन यांच्या जवळ जाईल. आज वयाची ६५ वर्ष पूर्ण करणाऱ्या लोकांची समस्या जी या प्रगत देशांना जाणवत आहे. तीच समस्या भारतामध्ये येत्या काळात निर्माण होईल.अनेकांना असं वाटू शकते की म्हातारी लोक ही समस्या कसे काय राहू शकतात. सामाजिक दृष्टिकोनातून म्हातारे लोक ही समस्या नसेल ही कदाचित,परंतु आर्थिक दृष्टिकोनातून ती समस्याच आहे असे म्हणावे लागेल. कारण म्हातारे लोक उत्पन्न कमवू शकत नाही. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागत नाही. त्यांच्या आरोग्याच्या समस्या असतात. त्यांना आपल्या आरोग्यावर उत्पन्न नसताना खर्च करावा लागतो. याचा शासकीय आरोग्य व्यवस्थेवर ताण पडतो. त्यांची देखरेख करताना एक व्यक्ती सतत त्यांच्याजवळ असावा लागतो. तो व्यक्ती त्या म्हाताऱ्या व्यक्तीच्या सेवेत असल्यामुळे त्याचे ही उत्पन्न जवळपास शून्य असते. त्यामुळे या सर्वाचा प्रत्यक्ष परिणाम अर्थव्यवस्थेवर पडतो. मग ती अर्थव्यवस्था कुठल्याही देशाची असो. आज जापान आणि चीन या देशांनी आपल्या देशातील युवकांच्या भरोशावर तंत्ज्ञानाची क्रांती केली.

याच युवकांच्या भरोशावर जापान आज २०५० मध्ये जीवन जगत आहे आणि चीन या दिशेने वाटचाल करत आहे. असे म्हटले जाते. परंतु भारतामध्ये चित्र अगदी उलट आहे. आज देशातील युवक नशेच्या आहारी गेलेला आहे. काही दररोज मिळणाऱ्या दोन जी.बी.मोबाईल डेटाच्या आहारी गेलेले आहे. उरलेले युवक देश विकासासाठी, देश हितासाठी लढताना दिसतात. मोठे अधिकारी होण्याचे स्वप्न ते पाहत आहेत आणि त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न ही करीत आहेत. मात्र वाढलेली परीक्षा फी आणि त्यांना मिळणारे परीक्षा केंद्र यामुळे अनेक युवकांचे कंबरडे मोडलेले आहे.

भारतातील युवक कसा-बसा परीक्षेचा फॉर्म भरतो, परीक्षा केंद्रावर जातो. परंतु परीक्षेच्या आधी किंवा परीक्षा झाल्यानंतर परीक्षेमध्ये घोळ होतो आणि परीक्षा रद्द होते. त्या युवकांची मोठी - मोठी स्वप्न धुळीला मिळतात. हे भारतातील युवकांच्या आयुष्यातील भयावह वास्तव आहे. युवकांच्या ज्ञानाचा फायदा देशासाठी करून जापान आज २०२५ मध्ये २०५० मध्ये मिळणाऱ्या सुविधांचा लाभ घेत आहे. चीन या युवकांच्या भरोशावर २०२५ मध्ये २०५० सारखं कसं जगता येईल हे स्वप्न पाहत आहे. त्याच वेळी भारतातील तरुण पिढी ही परीक्षा- परीक्षा खेळत आहे.

प्रत्येक वेळी परीक्षा फॉर्म भरते आहे. हजार- हजार रुपये यासाठी खर्च करीत आहे. मात्र ना व्यवस्थित परीक्षा पूर्ण होत आणि ना ही त्यांना परीक्षा रद्द झाल्यानंतर परीक्षेसाठी भरलेले पैसे परत मिळत. हे सर्व पैसे शासनाच्या तिजोरीमध्ये जातात. परीक्षा रद्द झाल्यामुळे कुठल्याही पदाची भरती होत नाही. त्यामुळे त्या पदासाठी पगारावर होणारा खर्च ही शासनाचा वाचत आहे. युवा पिढी परीक्षेच्या या अनियमिततेमुळे भरकटत चाललेली आहे. परीक्षेचा फॉर्म भरताना मिळणारा पैसा हा अर्थसंकल्पामध्ये तरतूद नसलेला महत्त्वाचा उत्पन्नाचा स्त्रेत शासनासाठी बनत आहे. देशातील प्रत्येक राज्य आपल्या आर्थिक परिस्थितीची विस्कटलेली घडी परीक्षा फी च्या माध्यमातून व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा स्थितीमध्ये युवकांचा असलेला देश जर युवकांची कार्यक्षमता देश विकासासाठी लावू शकत नसेल तर, देश बावीसव्या शतकापर्यंत ही महासत्ता बनू शकणार नाही. देश विकासासाठी गरज आहे ती या युवकांच्या कार्यक्षमतेचा पुरेपूर वापर करून देशाचा विकास करण्याची, देश महासत्ता बनवण्याची.



# Work-Life Balance and Its Effect on Employee Productivity in Human Resource Management

**Prof. R. P. Kotangale**
**Head, Dept. of English**
**Samarth Mahavidyalaya, Lakhani.**

Work-life balance (WLB) has become a central focus in contemporary Human Resource Management (HRM) due to the rising pressures associated with modern work environments, globalization, technological advancement, and the evolving expectations of employees. The pursuit of balance between personal life and professional commitments has increasingly influenced employee productivity, organizational culture, engagement, and long-term performance outcomes. This chapter explores the theoretical foundations of work-life balance, its determinants, and its implications for employee productivity. Drawing upon empirical studies, the chapter examines how HRM policies such as flexible scheduling, remote work arrangements, wellness programs, family-friendly benefits, job autonomy, and supportive leadership contribute to achieving work-life balance and enhancing productivity. It further discusses challenges faced by organizations, including burnout, presenteeism, digital overload, and cultural resistance. The chapter concludes by highlighting best practices and strategic HRM interventions that can strengthen work-life integration, improve employee well-being, and sustain organizational productivity. Recommendations for future research and practical implications for HR professionals are also provided.

## Chapter: Work-Life Balance and Its Effect on Employee Productivity in HRM

The dynamics of modern work have undergone substantial changes over the past decades, driven by technological developments, globalization, competitive pressures, and changing workforce demographics. As a result, the boundary between work and personal life has become increasingly blurred. Employees are often expected to be constantly available, respond quickly to emerging issues, and manage wide-ranging job demands. Consequently, maintaining a healthy work-life balance has emerged as a critical concern for organizations and individuals alike.

Human Resource Management (HRM) plays a vital role in creating policies and workplace cultures that support work-life balance. HRM professionals design interventions that help employees manage competing life domains while ensuring organizational productivity remains high. With researchers and practitioners acknowledging that employee well-being is linked to improved performance, work-life balance has shifted from a "soft" HR issue to a central strategic concern.

This chapter explores the relationship between work-life balance and employee productivity, examining theoretical frameworks, HRM practices, and real-world applications. It highlights the relevance of work-life balance in contemporary workplaces and provides evidence on how supportive HR policies enhance employee motivation, satisfaction, engagement, and output.

### Conceptualizing Work-Life Balance

#### 1) Definition of Work-Life Balance

Work-life balance has been defined in numerous ways, with most definitions emphasizing equilibrium or harmony between work-related responsibilities and personal life demands. Greenhaus and Allen (2011) describe work-life balance as the "extent to which an individual is equally engaged in and equally satisfied with work and family roles." Other scholars define it as a state where individuals can effectively manage work obligations without compromising health, relationships, or personal fulfillment.

Regardless of wording, the core principle remains the same: achieving an optimal and sustainable balance between work and non-work roles that supports well-being and performance.

#### 2) Theoretical Frameworks

Several theories have shaped understanding of work-life balance:

**Role Theory**

Role Theory posits that individuals occupy multiple roles, such as employee, parent, and community member. Conflict occurs when these roles place incompatible demands on time or energy.

**Spill over Theory**

This theory asserts that experiences, emotions, or stressors in one domain (work or life) spill over into the other. Positive spillover enhances well-being; negative spillover reduces productivity and satisfaction.

**Boundary Theory**

Boundary Theory explores how individuals create and manage physical, emotional, and psychological boundaries between work and personal life. Some prefer clear separation (segmenters), while others integrate roles (integrators).



# Big Bang Theory of Economic Development

**Prof. Kaivalya. R. Gabhane**
Dept. of Economics
Samarth Mahavidyalaya, Lakhani.

The Big Bang Theory of Economic Development describes a strategy in which a country tries to achieve rapid economic transformation by introducing major reforms all at once rather than slowly over many years. The idea is inspired by the scientific concept of the "Big Bang," which explains how the universe expanded rapidly after a sudden event. In economics, the theory suggests that a similar sudden and large-scale change in policies and institutions can help a country move quickly toward economic growth and modernization.

In many developing or transition economies, different sectors of the economy are closely connected. Industry depends on infrastructure such as roads, electricity, and communication. Businesses need financial institutions to provide loans and investment. Trade policies influence production, employment, and international competitiveness. Because these sectors are interrelated, changes in one sector alone may not produce significant results. For example, developing industries without improving infrastructure or financial systems may limit growth. The Big Bang approach argues that coordinated reforms across multiple sectors at the same time can create a powerful momentum for development.


According to this theory, gradual reforms may sometimes fail because they leave the economy stuck between two systems. When reforms are slow, old institutions may continue to dominate, creating inefficiencies and resistance to change. Businesses and investors may hesitate because the future direction of the economy remains uncertain. In contrast, a sudden and comprehensive reform strategy can signal a clear commitment to change. This strong signal can increase investor confidence, encourage entrepreneurship, and stimulate economic activity.

The Big Bang approach became especially popular during the late twentieth century when many countries shifted from centrally planned economies to market-oriented systems. Governments in several regions introduced rapid reforms such as privatizing state-owned enterprises, liberalizing prices, reducing trade barriers, and encouraging private investment. The goal was to replace rigid government-controlled economic structures with more flexible and competitive market systems in a short period of time.

One of the main advantages of the Big Bang strategy is speed. When reforms are implemented simultaneously, different sectors of the economy can begin supporting each other. For example, financial reforms can provide credit to industries, infrastructure development can improve production and transportation, and trade liberalization can open new markets for goods and services. Together, these changes can accelerate economic growth and increase productivity.

Another advantage is that rapid reforms may reduce political resistance. When changes happen gradually, groups that benefit from the old system may organize opposition and slow down reforms. A sudden shift can limit this resistance because the transformation occurs quickly, leaving fewer opportunities to block policy changes. In this way, the Big Bang approach can sometimes overcome structural barriers that prevent economic progress.

However, the Big Bang strategy is not without risks. Rapid economic transformation can create short-term difficulties for society. For instance, privatization and restructuring of industries may lead to job losses in the short run. Price liberalization can cause temporary inflation as markets adjust to new conditions. Social inequality may also increase if some groups benefit more quickly from the reforms while others struggle to adapt. Another challenge is institutional capacity. For the Big Bang approach to succeed, a country must have strong institutions, effective governance, and a clear regulatory framework. Without these foundations, rapid reforms may create instability rather than growth. Weak financial systems, poor legal enforcement, or corruption can reduce the effectiveness of economic reforms and harm public trust. Because of these risks, economists often emphasize that the Big Bang approach must be carefully designed and supported by social policies. Governments may need to introduce safety nets, employment programs, and education initiatives to help people adjust to economic changes. In this way, the benefits of rapid reforms can be shared more widely across society. In conclusion, the Big Bang Theory of Economic Development highlights the potential benefits of introducing large and coordinated economic reforms at the same time. By transforming multiple sectors simultaneously, a country can create strong momentum for growth and modernization. However, this approach also requires careful planning, strong institutions, and supportive social policies to manage the short-term challenges that may arise. When implemented effectively, the Big Bang strategy can play an important role in accelerating economic development and helping economies transition toward more dynamic and competitive systems.



# विभागांचे अहवाल

# मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशनाचा अहवाल

**प्रा.डॉ.बंडू चौधरी**
मराठी विभाग प्रमुख
समर्थ महाविद्यालय, लाखनी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन भंडारा जिल्ह्यातील लाखनी येथील समर्थ महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. मराठी भाषा, साहित्य आणि संशोधनाच्या विविध अंगांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या अधिवेशनाला दोन्ही विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अधिवेशनाचे उद्घाटन उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. नम्रता वागडे, अधिवेशनाध्यक्ष म्हणून इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वरचे प्राचार्य डॉ. अजय चिकाटे, पूर्वाध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे, मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. हिराजी बनपुरकर, सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे, समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे तसेच मराठी विभाग प्रमुख डॉ. बंडू चौधरी मंचावर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी मराठी भाषा आणि साहित्याच्या जतन व संवर्धनासाठी प्राध्यापकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद केले. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतर मराठी भाषिकांची जबाबदारी अधिक वाढली असून संशोधन, अध्यापन आणि नव्या पिढीला भाषेची जाणीव करून देणे हे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. भाषा ही मानवाला जीवन जगण्याची दिशा देणारी शक्ती असल्याचेही त्यांनी यावेळी प्रतिपादन केले. उद्घाटक डॉ. संतोष चव्हाण यांनी आपल्या भाषणात नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर मराठी विषयात संशोधनाच्या नव्या संधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले. अधिवेशनातील विविध शैक्षणिक सत्रांमधून मराठी भाषा आणि साहित्याच्या अभ्यासाला नवे आयाम मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.





या प्रसंगी झाडीबोली साहित्याचे अभ्यासक डॉ. हरिश्चंद्र बोरकर व डॉ. राजन जयस्वाल (नागभिड) तसेच पूर्व अधिवेशनाच्या आयोजनासाठी डॉ. मनीषा नागपुरे यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच मराठी प्राध्यापक परिषदेच्या विविध अधिवेशनांचे पूर्वाध्यक्ष आणि सेवानिवृत्त प्राध्यापकांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये डॉ. सत्यवान मेश्राम, डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे, डॉ. श्याम मोहरकर, डॉ. श्रीकांत नाकाडे, डॉ. शरयू तायडे या पूर्वाध्यक्षांचा तसेच डॉ. विद्याधर बनसोड आणि डॉ. केवळराम देशपांडे या सेवानिवृत्त प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान आचार्य पदवी प्राप्त प्राध्यापक तसेच विविध विशेष सन्मान प्राप्त प्राध्यापकांचाही सत्कार करण्यात आला. अधिवेशनात विविध शैक्षणिक व साहित्यिक विषयांवर चर्चासत्र आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. संजयकुमार निंबेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. अजिंक्य भांडारकर यांनी केले. अधिवेशनाला डॉ. सत्यवान मेश्राम, डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ. शरयू तायडे, डॉ. जयश्री शास्त्री, डॉ. विजय रैवतकर, डॉ. रमेश धोटे, डॉ. सुधीर मोरे, डॉ. यशवंत घुमे, डॉ. सुधाकर भुयार, डॉ. स्वप्नील चव्हाण, डॉ. जयश्री सातोकर, डॉ. महेश जोगी, डॉ. प्रमोद लेंडे, डॉ. रामलाल चौधरी, डॉ. अरविंद कटरे, डॉ. रोशन भोवते, डॉ. चंद्रशेखर कोटांगले, डॉ. जगदीश भैसारे यांसह दोन्ही विद्यापीठांशी संलग्न सुमारे २०० हून अधिक महाविद्यालयांतील मराठी प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. या अधिवेशनाच्या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य आणि संशोधनाच्या क्षेत्रात नवीन विचारांची देवाणघेवाण होऊन प्राध्यापकांमध्ये बौद्धिक संवादाची समृद्ध परंपरा अधिक दृढ झाली.

## English Department

**Prof.Rambhau Kotangale**
HOD
English Department



Department of English was very active throughout the session. Apart from teaching the syllabus, the department activity participated in many events. The members of the department participated in Dictionary Competition, translation work, ICT teaching-learning and the work for NAAC Committee. Students were helped to have easy access to the dictionaries and the use of library very effectively.Audio-visual aids were used in the classes for teaching the poems of renowned poets available on internet. Online classes were engaged to teach writing effectively to the students of Graduation.

English Department organised workshop on "How to make Sentences and Paragraphs in this year for all graduation student most of the students and professor attended the program. Professor Prashant jambhulkar, HOD Manohar Bhai Patel College sakoli had given impressive speech on it. in NEP students experienced new knowledge, new study material, new experiments and increased their quality of learning.




## मराठी विभाग



**प्रा.डॉ.बंडू चौधरी**
मराठी विभाग प्रमुख
समर्थ महाविद्यालय, लाखनी

समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे स्थापना वर्षापासूनच मराठी विभाग कार्यरत असून महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेत या विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. मराठी विभागांतर्गत बी.ए., बी.कॉम., बी. एस्सी. तसेच एम.ए. (मराठी) या अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना अध्यापन केले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विभागामार्फत वर्षभर विविध शैक्षणिक, साहित्यिक व विद्यार्थीभिमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी विभाग व अर्चना वार्षिकांक विभागाच्या संयुक्त विद्यमाने सत्र २०२३ व २४ च्या अर्चना वार्षिकांकाचे प्रकाशन महाविद्यालयातील भगिनी निवेदिता सभागृहात आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगंबर कापसे तसेच मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे यांच्या हस्ते वार्षिकांकाचे प्रकाशन करण्यात आले.

दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा जाहीर केल्याच्या पार्श्वभूमीवर "अभिजात मराठी भाषा अभिनंदन सोहळा" मराठी विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी डॉ. प्रकाश मालगावे, अंगेश बेहलपाडे, राजेश बांते व श्रावण कापगते यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाविद्यालयाच्या इतिहासात दुसऱ्यांदा मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन आयोजित करण्याचा मान समर्थ महाविद्यालयाला मिळाला. हे अधिवेशन १७ व १८ जानेवारी २०२५ रोजी दोन दिवस संपन्न झाले. या अधिवेशनाला मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथील कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद येथील विभागप्रमुख डॉ. नम्रता बागडे, अधिवेशनाध्यक्ष डॉ. अजय चिकाटे, पूर्वाध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे, मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोळ, तसेच डॉ. हिराजी बनपूरकर, डॉ. राजेंद्र वाटाणे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगंबर कापसे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मराठी विभागामार्फत विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने जिल्हास्तरीय काव्यवाचन स्पर्धा व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यासोबतच विद्यार्थ्यांच्या साहित्यिक प्रतिभेला वाव मिळावा यासाठी दरवर्षीप्रमाणे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी मराठी भाषा अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली.

दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिन (कुसुमाग्रज जयंती) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने मराठी प्राध्यापक परिषदेच्या "अभिजात मराठी विशेषांकाचे" प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला विदर्भ महाविद्यालय, लाखनी येथील विभागप्रमुख डॉ. नीलिमा कापसे तसेच विदर्भ साहित्य संघ शाखा, लाखनी येथील अध्यक्ष ह रा मोहतुरे, कार्यवाह डॉ. मुक्ता आगाशे, डॉ अल्का सोरदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे संचालन प्रा अजिंक्य भांडारकर आणि आभार प्रा मिलिंद कांबळे यांनी मानले.

## संस्कृत विभाग

**प्रा.रुपाली खेडीकर**
संस्कृत विभाग



सत्र २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात संस्कृत विभागाव्दारे अनेक शैक्षणिक उपक्रम राबविल्या गेले. दि. १/०८/२०२४ रोज गुरुवारला प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा. वर्णेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. वरणेकरांच्या ग्रंथसंपदांची माहिती व त्यांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा हा ही जयंती साजरी करण्यामागचा उद्देश होता.

दि.२९ ऑगस्ट २०२४ रोज शुक्रवारला संस्कृत दीनाचे औचित्य साधून 'संस्कृत भाषेचे मानवी जीवनातील महत्व 'या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली . संस्कृत साहित्यातून मानवी जीवनमूल्यांची व संस्कारांची उधळण मानवी जीवनावर होते म्हणून संस्कृत साहित्याचा अभ्यास निरंतर करावा हा ही स्पर्धा घेण्यामागचा उद्देश होता. दि. २०/०८/२०२४ रोज शुक्रवारला ' संस्कृत दिन' साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी महाविद्यालयाचे ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. डॉ. धनंजय गभणे उपस्थित होते. कार्यक्रमाप्रसंगी प्रा.डॉ. गभणे यांनी विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेचे महत्व, संस्कृत ग्रंथसंपदा व तीचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाप्रसंगीच निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या कु.प्रज्ञा दिघोरे, व्दितीय क्रमांक कु.साक्षी अतकारी, तृतीय क्रमांक गरदीपसिंग गिल हया विद्यार्थ्याचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

दि. २२/१०/२०२४ रोज मंगळवारला पोहरा या गावातील योग प्रशिक्षक डॉ. नरेशजी चारमोडे यांच्या गंगोत्री पिरॅमीडला शैक्षणिक क्षेत्रभेट देण्यात आली. बी.ए.भाग १ च्या संस्कृत विषय असणाऱ्या विदयार्थ्यांना VSC अंतर्गत योगा हा विषय असल्यामुळे ही शैक्षणिक भेट घडवून आणण्यात आली. या भेटी अंतर्गत डॉ.चारमोडे यांनी विद्यार्थ्यांना आष्टांगयोग व प्राणायम याविषयी माहिती व त्याचे महत्त्व सांगितले. दि. २८/१०/२०२४ रोज सोमवारला संस्कृत सुभाषित पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. सुनंदा रामेटके यांनी केले. यात प्रथम क्र. कु.प्रज्ञा दिघोरे, द्वितीय क्र.कु.शिवानी पचारे व तृतीय क्र. कु. रिया मोटघरे या विद्यार्थिनींचा आला.

स्नेहमेळाव्याच्या अनुषंगाने दि. २०/०१/२०२५ रोज सोमवारला संस्कृत शब्दकोष स्पर्धा व संस्कृत शुभेच्छा पत्रक स्पर्धा घेण्यात आल्या. संस्कृत शब्दकोष स्पर्धेचं परीक्षण डॉ. सुनंदा रामटेके यांनी केले. यात प्रथम क्रमांक कु.कुनिका रहांगडाले व व्दितीय क्र. कु.स्नेहा बोधनकर यांना देण्यात आला. संस्कृत शुभेच्छा पत्रक स्पर्धेच परीक्षण डॉ.स्मिता गजभिये यांनी केला. या स्पर्धेत प्रथम क्र.कु.गायत्री पडोळे द्वितीय क्र. कु.सानिया मेश्राम ह्या विद्यार्थिनींना देण्यात आला. या स्पर्धेत बी.ए. ,बी.कॉम, बी.एस्सी. च्या विद्यार्थ्यानी सहभाग घेतला होता. मार्च २०२५ च्या ४, ६, १८ व २० या तारखेला संस्कृत संभाषण वर्ग घेण्यात आले. यात विद्यार्थ्याचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेतही संभाषण साधता यावे व बोलता यावे हा या वर्ग घेण्यामागचा हेतू होता. दि. ७/०४/२०२५ ला VSC या विषयांतर्गत ज्योतिशास्त्रवर मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला ज्योतिषशास्त्री विनोद थोटे उपस्थित होते. ज्योतिषशास्त्रची प्रारंभीक माहिती विद्यार्थ्यांना व्हावी हा या कार्यक्रमाचा हेतू होता. महाविद्यालयाच्या दैनंदिन प्रार्थनेच्या वेळी संस्कृत विभागाव्दारे दररोज एक सुभाषित व एक मनाचे श्लोक विद्यार्थ्यांना सांगण्यात येते . विद्यार्थ्यावर उत्तम संस्कार व्हावे व ज्ञानवृध्दी व्हावी हा या मागचा मुख्य हेतु आहे.

# गृहअर्थशास्त्र विभाग


प्रा.डॉ.स्मिता गजभिये

प्रा.प्रतिभा वंजारी

गृहअर्थशास्त्र विभाग




गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे दिनांक २९/७/२०२४ रोज सोमवारला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली गृहअर्थशास्त्र विभागात 'स्तनपान करणाऱ्या माता व बालकांकरिता पोषक आहाराचे महत्त्व 'या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. १ ते ७ ऑगस्ट' पोषण आहार सप्ताह 'निमित्त दिनांक १/८/ २०२४ रोज गुरुवारला अंगणवाडी केंद्र क्रमांक १ पालांदूर/चौ. येथे अंगणवाडी सेविका ललिता देशमुख यांच्या उपस्थितीत माता व बालकांना पोषक आहार व उपयोगी साहित्याचे वितरण गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींद्वारे करण्यात आले.

गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे बी.ए प्रथम वर्ष, प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यिनींनी दिनांक ५/८/२०२४ किचन गार्डन अंतर्गत विविध रोपांची लागवड या उपक्रमात सहभाग घेऊन उपक्रमशील किचन गार्डन (परसबागेची) निर्मिती केली

बी.ए. प्रथम वर्ष गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींकरिता दिनांक १९ व २० ऑगस्ट २०२४ ला दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन गृहअर्थशास्त्र विभागात करण्यात आले. व्यावसायिक दृष्टिकोन लक्षात घेऊन कापडांपासून विविध प्रकारची फुले तयार करणे, विविध पद्धतीने फ्लॉवर पॉट डेकोरेट करणे याचे प्रशिक्षण गृहअर्थशास्त्र विभागाच्या डॉ.स्मिता गजभिये व प्रा. प्रतिभा वंजारी यांनी यांनी दिले.

गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे श्रद्धेय शिक्षण महर्षी स्व. बापूसाहेब लाखनीकर यांच्या अर्धाकृती पुतळयाच्या अनावरण सोहळयानिमित्त भव्य संस्कार भारती रांगोळी स्पर्धा व फुलाचा गालिचा स्पर्धा दिनांक २१/८/२०२४ रोज बुधवारला आयोजित करण्यात आले. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान विभागामधून एकूण २८ विद्यार्थिनिंचा सहभाग होता. दि. ९/९/२०२४ रोज सोमवारला गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे १ ते ७ सप्टेंबर राष्ट्रीय पोषण सप्ताह विविध स्पर्धेच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. तसेच सर्वासाठी पौष्टिक आहार या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे होते. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आल्हाद भांडारकर, प्रा.अजिंक्य भांडारकर तसेच निर्धनराव पाटील वाघाये महाविद्यालय सानगडी येथील गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अर्चना फेंडरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

दि. १८/९/२०२४ रोजी बुधवारला बी.ए प्रथम वर्ष नवीन प्रवेशित विद्यार्थिनींना ग्रंथालयाविषयी माहिती व्हावी या अनुषंगाने ग्रंथालय भेटीचे आयोजन गृहअर्थशास्त्र विभागाच्या डॉ.स्मिता गजभिये, प्रा. प्रतिभा वंजारी यांनी विद्यार्थी समवेत ग्रंथालयाला भेट दिली. ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ.धनंजय गभने यांनी विद्यार्थिनींना विविध ग्रंथांविषयी, व ग्रंथालयाविषयी सखोल मार्गदर्शन केले.

गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे आयसीटी कक्षात किचन गार्डन (परसबाग) कार्यशाळा २५ ते २६ सप्टेंबर २०२४ ला दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे, ग्रंथालय विभागाचे डॉ.धनंजय गभने यांनी मार्गदर्शन केले.

समर्थ महाविद्यालय लाखनी 'शिका आणि कमवा' उपक्रमा अंतर्गत गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे दिनांक ३०/९/२०२४ रोज सोमवारला 'फुड स्टॉल' चे आयोजन प्रा.प्रतिभा वंजारी यांनी केले यामध्ये विद्यार्थिनींनी विविध प्रकारचे पौष्टिक पदार्थ प्रदर्शनीत ठेवले. स्टॉलचे परीक्षण इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सुनिल देशमुख यांनी केले.

एम. ए .प्रथम वर्ष गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनीनी 'वस्त्र शास्त्र' या विषयाअंतर्गत दि.४/१०/२०२४ रोज शुक्रवारला 'पंकज कपडा मॉल' लाखनीला भेट दिली. विविध वस्त्रांविषयी माहिती उद्योजक पंकज गुरुनानी यांनी विद्यार्थिनींना दिली.

# इतिहास विभाग




**डॉ.दिगांबर कापसे**
इतिहास विभाग प्रमुख



समर्थ महाविद्यालयात उपलब्ध विषयांपैकी इतिहास हा विषय विद्यार्थ्यांच्या आवडीचा विषय आहे. ह्या विषयांमधून राजकीय, सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय, सांस्कृतिक व धार्मिक बाजूंचा अभ्यास असतो. २०२४-२५ या सत्रामध्ये विभागांतर्गत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी, अनेक उपक्रमाचे आयोजन केलेले होते. ६ डिसेंबर २०२४ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन इतिहास विभागातर्फे करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य कापसे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.वंजारी, प्रा. संगीता हाडगे यांच्या उपस्थितीतून कार्यक्रम पार पडला.

यात इतिहास विभागातर्फे ३० जानेवारी २०२५ रोजी राष्ट्र की प्राणशक्ती वंदे मातरम दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून मेघा नांदेडकर (आकाशवाणी निवेदिका नागपूर आणि कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून चित्र वंगलवार आणि रोजा कापगते यांच्या प्रामुख्याने हा सोहळा महाविद्यालयाच्या भगिनींनी सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता.

१९ फेब्रुवारी २०२५ रोजी समर्थ महाविद्यालय मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने कार्यक्रम साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमा अनुसंघाने ' आपले वक्ते आपले विद्यार्थी' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, इतिहास विभागाच्या वतीने निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा,परिसंवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष डॉ. दिगांबर कापसे यांनी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित विविध बाबींवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ.संगीता हाडगे, डॉ.धनंजय गिरेपुंजे प्रा. अशोक गायधनी प्रा.मनीषा मदनकर कार्यक्रमाला उपस्थित होते. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांची माहिती व्हावी आणि विद्यार्थ्यांना ऐतिहासिक जाणीव जागृती व्हावी आणि इतिहास विभागाची गोडी लागावी या हेतूने २०५ वर्ष मिसेस वॉटसन यांच्या जुना स्मारकाला लाखनी मध्ये अभ्यास दौरा दि. ०२-०३ २०२५ रोजी करण्यात आला. यावेळी इतिहास विभागातील सर्वच विद्यार्थी उपस्थित होते ह्या अभ्यास दौऱ्यामध्ये प्राचार्य कापसे सरांनी ह्या स्मारकाविषयी विद्यार्थ्यांना माहिती प्रदान केले या अभ्यास दौऱ्यामध्ये प्रा. धनंजय गभणे, प्रा. लालचंद मेश्राम, प्रा. सुरेश बन्सपाल, प्रा. रूपाली खेडीकर इत्यादी प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

# भूगोल विभाग


**प्रा.स्वाती नवले**
भूगोल विभाग


सत्र २०२४ २५ या शैक्षणिक सत्रत भूगोल विभागातर्फे अनेक उपक्रम राबविण्यात आले. १७ सप्टेंबर २०२४ रोज मंगळवार ला जागतिक ओझोन दिन कार्यक्रम घेण्यात आला. जागतिक ओझोन दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना ओझोन थर जतन करणे आणि हवामान बदल कमी करण्याच्या दुहेरी फायद्यांबद्दल शिक्षित करणे ओझोनविषयी जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. १५ जानेवारी २०२५ ला महाविद्यालयात भूगोल दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे सर यांच्या अध्यक्षतेखाली आणि वाणिज्य विभागातील प्रा. डॉ. संगीता हाडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम साजरा करण्यात आला. भूगोल दिनानिमित्त 'राष्ट्रीय शाश्वत विकास' या विषयावर महाविद्यालयात निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला ३३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला भूगोल दिनाच्या कार्यक्रमाला गृहअर्थशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. स्मिता गजभिये कु. वंजारी विज्ञान शाखेतील वनस्पती शास्त्र विषयाच्या प्रमुख प्रा.मनिषा मदनकर संगीत विभागाच्या प्रा. राखी मथुरे, संस्कृत विभागाच्या प्रा.रुपाली खेडीकर, समाजशास्त्र विषयाचे प्रा. बाळकृष्ण रामटेके यांचे निबंध स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परीक्षण म्हणून मोलाचे सहकार्य लाभले. २२ जानेवारी २०२५ स्नेहसंमेलन मेळावा अंतर्गत बौद्धिक स्पर्धेत भूगोल विभागातर्फे नकाशा वाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. नकाशा वाचन स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. ३ मार्च २०२५ ला सोमवार रोजी समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राज्यशास्त्र विभाग आणि भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान गौरव महोत्सव अंतर्गत 'भारतीय राज्यघटनेची ओळख' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग होता. निबंध स्पर्धा घेत असताना राज्यशास्त्र विभागाचे प्रा.लालचंद मेश्राम, अर्थशास्त्र विभागाचे प्रा. युवराज जांभुळकर आणि संगीत विभागाच्या राखी मथुरे यांचे सहकार्य लाभले.

# अर्थशास्त्र विभाग

प्रा.युवराज जांभुळकर
प्रा.कैवल्य गभणे
अर्थशास्त्र विभाग

सत्र २०२४-२५ हा महाविद्यालायचा हीरक महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात आला. या महाविद्यालायच्या हीरक महोत्सवी वर्षा निमित्त अर्थशास्त्र विभागामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट असलेली बँकिंग व्यवस्था प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना समजून घेता यावी यासाठी दिनांक १८ ऑक्टोबर २०२४ ला 'बँक ऑफ महाराष्ट्र' ला भेट दिली. यावेळी अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी बँकेचे अकाउंट उघडण्यापासून तर ग्राहकांना उपलब्ध असलेल्या बँकांच्या योजना या विषयी माहिती मिळवली. बँकेमध्ये विद्यार्थ्यांना बँकेचे व्यवस्थापक श्री. धनराज खवास यांनी बँक खाते उघडण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे याविषयी माहिती दिली. ई- केवायसी चे महत्व यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या बँक भेटीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांचे मार्गदर्शन लाभले.

भारताचे १३ वे पंतप्रधान व माजी अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन २६ डिसेंबर २०२४ ला झाले. डॉ. सिंग यांच्या श्रद्धांजलीचा कार्यक्रम अर्थशास्त्र विभागाद्वारे आयोजित करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कापसे ,राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. लालचंद मेश्राम , मराठी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. बंडू चौधरी, प्रा. अजिंक्य भांडारकर, प्रा. कैवल्य गभणे व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

देशातील प्रत्येक लोकांसाठी महत्वाचा असलेला विषय म्हणजे देशाचा अर्थसंकल्प, हा अर्थ संकल्प १ फेब्रु. २०२५ ला संसदेत सादर करण्यात आला. याचे थेट प्रक्षेपण विद्यार्थ्याना आय. सी. टी. रूम मध्ये दाखविण्यात आल. हा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसाला समजावा या साठी दि. ६ फेब्रु. २०२५ ला अर्थशास्त्र विभाग व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'अर्थसंकल्पावर आधारित जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. डी. कापसे उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून वाणिज्य विभागाचे प्राध्यापक डॉ. सु. ना. बन्सपाल , संगीता हाडगे , वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनंदा देशपांडे , अर्थशास्त्र विभागाचे प्रा. कैवल्य गभणे ई. उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये स्वतंत्र चर्चासत्र ठेवण्यात आले. या चर्चासत्रमध्ये प्राध्यापकाना निर्माण झालेल्या प्रश्नाचे समाधान कारक उत्तर प्रमुख वक्ते यांनी दिले. या कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक युवराज जांभूळकर



अर्थशास्त्र विभागाद्वारे १ एप्रिल २०२५ ला 'आर.बी. आय.' स्थापना दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कापसे उपस्थित होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून रिझर्व बँक ऑफ इंडियाची आवश्यकता व रिझर्व बँक ऑफ इंडियाचे ऐतिहासिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. लालचंद मेश्राम, डॉ. बंडू चौधरी, प्रा. बाळकृष्ण रामटेके उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.युवराज जांभूळकर यांनी केले. तर आभार प्रा.कैवल्य गभने यांनी मानले.

अमेरिकेने संपूर्ण जगावर टेरिफ लावला. त्यामुळे जगावर एक नवीन संकट उभा राहिला. जागतिक सेअर बाजार कोसळले. जागतिक मंदीची चर्चा सुरू झाली. या येऊ घातलेल्या संकटावर चर्चा होणे अपेक्षित होते आणि म्हणून अर्थशास्त्र विभाग व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ एप्रिल २०२५ ला 'टेरिफ टेन्शन ओन वर्ल्ड इकॉनोमी' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी डी कापसे उपस्थित होते. तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सुनंदा देशपांडे (वाणिज्य विभाग प्रमुख) डॉ.सु.ना.बन्सपाल, डॉ. संगीता हाडगे, प्रा.बा.का. रामटेके, प्रा.कैवल्य गभणे उपस्थित होते. या वेळी उपस्थित वक्त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मनीषा मदनकर यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा.युवराज जांभूळकर यांनी केला तर आभार प्रा.एकता जाधव यांनी मानले.

## राज्यशास्त्र विभाग



**प्रा.लालचंद मेश्राम**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

राज्यशास्त्र विभागातर्फे दि.२४/०८/२०२४ ला कायदेशीर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून जिल्हा न्यायाधीश-१ व सत्र न्यायाधीश श्री.मनीष गणोरकर उपस्थित होते. वाईट प्रवृत्तीचे लोक त्यांच्यापासून विशिष्ट प्रकारे अंतर ठेवून आपण वावरणे आवश्यक आहे. समाजात वावरत असताना सर्वच माणसे चांगली असतात असे नाही. यासाठी प्रत्येकाने काय द्याचे पालन करणे आवश्यक आहे. दुष्प्रवृत्ती पासून स्वरक्षण करणे ही काळाची गरज झालेली आहे, असे प्रतिपादन जिल्हा न्यायाधीश-१ व सत्र न्यायाधीश मनिष गणोरकर यांनी केले. या कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय युवा दिन या विषयावर मार्गदर्शक म्हणून मुख्य विधी संरक्षण अधिवक्ता ॲड भारत गभणे, स्त्रीभृणहत्या व पीसीपी ॲड. डी. टी. या विषयावर ॲड.प्रभात कुमार मिश्रा महाराष्ट्र रॅगिंग करण्यास मनाई अधिनियम १९९९ या विषयावर ॲड. प्रमोद आठवले मोटार वाहन अधिनियम २०१९ या विषयावर श्री सुधीर मडामे, विधी सेवा प्राधिकरणबाबत विजू गवारे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेला यशस्वी करण्यासाठी डॉ. धनंजय गभणे, डॉ. बंडू चौधरी, डॉ. सुनंदा रामटेके, प्रा. बाळू रामटेके, प्रा. रामभाऊ कोटांगले, डॉ. सुरेश बंसपाल, डॉ. संदीपकुमार सरेय्या, डॉ. संगीता अरमरकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. युवराज जांभुळकर यांनी केले. प्रास्ताविक राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी चे अध्यक्ष श्री. आल्हादजी भांडारकर यांनी केले. तर आभार प्रा. लालचंद मेश्राम, राज्यशास्त्र विभाग प्रमुख यांनी मानले.

राज्यशास्त्र विभाग विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन राज्यशास्त्र विभागाचा उपक्रम समर्थ महाविद्यालयात दिनांक १२/०१/२०२२ ला राष्ट्रीय युवा दिनानिमित्त राज्यशास्त्र विभागातर्फे विदर्भस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेचा विषय एक देश एक निवडणूक-योग्य की अयोग्य असा होता. विदर्भातील अनेक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या वक्तृत्व कौशल्याची चुणूक दाखवली.

## समाजशास्त्र विभाग

**प्रा.बाळकृष्ण रामटेके**
समाजशास्त्र विभाग

राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी द्वारा संचालित समर्थ महाविद्यालयातील प्राध्यापकांनी दिवाळीच्या पावन पर्वावर वृद्धाश्रमातील वृद्धांना फराळ तसेच मिठाईचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण समाजापुढे सादर केले. महाविद्यालयातील प्रा.डॉ.धनंजय गिऱ्हेपुजे, प्रा.लालचंद मेश्राम, प्रा.बाळकृष्ण रामटेके तसेच मंगेश शिवरकर यांनी लाखनीपासून सात किलोमीटर दूर असलेल्या मानव कल्याण वृद्धाश्रम रेंगेपार कोठा येथे जाऊन तेथील निवासी वृद्ध पुरुष आणि स्त्रियांना शाब्दिक दिलासा देत, धीर देत त्यांच्या भावनांना समजून घेत त्यांच्याशी चर्चा केली यावेळी वृद्धाश्रमाचे संचालक गुलाबजी लांजेवार रवी लांजेवार उपस्थित होते. वृद्धाश्रमातील १५ वृद्धांना यावेळी फराळ तसेच मिठाईचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जोपासत या उपक्रमाला येथील वृद्धांनी मनोमन आभार व्यक्त केले .या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ.धनंजय गिऱ्हेपुजे यांनी केले.

## संगीत विभाग

**प्रा.राखी मथुरे**
संगीत विभाग



सत्र २०२४-२५ मध्ये संगीत विभाग प्रार्थनेमध्ये अग्रेसर होता. संगीत विभागाच्या विद्यार्थिनींनी महाविद्यालयाची प्रार्थना दररोज समोर उभे राहून हार्मोनियम तबल्यासोबत साथ दिली. दि १७ एप्रिल २०२४ संगीत विभागातर्फे गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली गुरुपौर्णिमा निमित्त गुरुवर आधारित गीत गायन करून सर्व ज्येष्ठ, कनिष्ठ गुरूंच,मानसन्मान करून संगीत विभागाच्या विद्यार्थिनींनी गुरू गीत सादर केले. २१ जून २०२४ विश्व संगीत दिवस व योग दिवस निमित्य गीत गायन व नृत्य सादरीकरण करण्यात आले. २८ सप्टेंबर २०२४ लता मंगेशकर जन्म दिवसानिमित्त लतादीदींचे गीत सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थिनींनी लतादीदींची गीत सादर केले. दि २३ जानेवारी २०२५ पंडित विष्णू नारायण भातखंडे व पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या स्मृती प्रीत्यर्थ, संगीत विभागाद्वारे पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. दिनांक ३ मार्च २०२५ संगीत विभागाद्वारे घेण्यात आले.

# वाणिज्य विभाग

**प्रा.डॉ.सुनंदा देशपांडे**
वाणिज्य विभाग प्रमुख



शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या सत्रात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दि. २१ ऑगस्टला 'उद्यमिता दिवस' साजरा केला जातो. या दिवसाच्या निमित्ताने 'उद्योगकता विकास' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत वाणिज्याच्या १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत प्रथम क्र. कु. सना अनिस शेख, दुसरा क्र. कु.सोनाली संजय खेडीकर आणि तिसरा क्र. कु. पुजा राजू कानेकर यांनी मिळविला. दि. ९/१०/२०२४ ला बी.कॉम. १ च्या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्थापन या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रात १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.


दि. १ ऑक्टो. २०२४ ला NEP या विषयावर बी.कॉम १ च्या विद्यार्थ्यांसाठी ''कार्यशाळा'' आयोजीत करण्यात आली. NEP विषयी तसेच त्यांचे अभ्यासक्रमाचे विषय, परीक्षा पध्दती याविषयी सपुर्ण माहिती देण्यात आली. दि. २८/१०/२०२४ ला. बी.कॉम १ च्या विद्यार्थ्यांनी आयसीटी च्या खोलीत संगणक या विषयावर पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन सादर केले. दि.२१/९/२०२४ ला विद्यार्थ्यांशी संवाद या कार्यक्रमाअंतर्गत देहबोली या विषयावर संवाद साधण्यात आला. इमोजीचे चित्र दाखवून विद्यार्थ्यांना चेहऱ्यावर भाव ओळखायला सांगण्यात आले. दि. ९/१०/२०२४ ला मानव संसाधन विकास' या विषयावर 'गटचर्चा' घेण्यात आली. दि. ७/१०/२०२४ ला 'मुद्रीक धोरण या विषयावर डॉ. बन्सपाल यांनी कार्यशाळेचे बी.कॉम. १ च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजन करून मार्गदर्शन केले. नोव्हेंबर २०२४ ला बी.कॉम १ च्या विद्यार्थ्यांनी परिसरातील विविध समस्या लक्षात घेऊन तिसऱ्या सत्रासाठी आवश्यक असलेल्या संशोधन प्रकल्पासाठी संशोधन करून प्रकल्प तयार करून सादर केले. दि. ८/१०/२०२४ ला बी.कॉम.१,२,३ च्या विद्यार्थ्यांसाठी समाधान विवरण या विषयावर गटचर्चा आणि वित्तीय लेखांकन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करून डॉ. सुरेश बन्सपाल सरांनी मार्गदर्शन केले.

दि. २ ऑक्टोबर २०२४ ला महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने ''स्वच्छता हीच सेवा'' या अभियाना अंतर्गत लाखनी परिसरातील ग्रामपंचायत या ठिकाणी जाऊन स्वच्छता अभियानात सहभाग घेण्यात आला.

दि. ६/०१/२०२५ ते १०/०१/२०२५ ला राष्ट्रीय सेवायोजना शिबीरातील कार्यक्रमात सहभाग घेण्यात आला. स्नेहमेळावा २०२५ च्या निमीत्ताने बौध्दिक विभागाअंतर्गत स्वयंस्फूर्त, स्मरणशक्ती, कथाकथन, प्रश्नमंजुषा, नकाशा वाचन, मनाचे श्लोक पाठांतरण, शुध्दलेखन, वादविवाद, वक्तृत्व, संस्कृत शब्दकोष, संस्कृत शुभेच्छापत्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच 'खजिन्यांचा शोध' या नविन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सर्व स्पर्धांना विद्यार्थ्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग घेतला.

दि. ०६/०२/२०२५ ला वाणिज्य विभाग आणि अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ''अर्थसंकल्प-२०२५'' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेती शेतकऱ्यांसाठी असलेल्या योजनेवर डॉ. सुनंदा रामटेके, उत्पन्नावर आकारण्यात येणारी करप्रणाली या विषयावर डॉ. सुरेश बन्सपाल आणि महिलांसाठी असणाऱ्या योजनांवर डॉ. संगिता हाडगे, तसेच प्रा.कैवल्य गभणे यांनी शेअर मार्केट या विषयावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे सर होते. दि.२५/०२/२०२५ ला बी.कॉम च्या विद्यार्थ्यांसाठी ''वाणिज्याचा परिचय'' या विषयावर कार्यशाळेचे आयोजनात डॉ.सुरेश बन्सपाल यांनी मार्गदर्शन केले. दि.२१/०२/२०२५ ला बी.कॉम ३ च्या विद्यार्थ्यांसाठी अभिप्रेरणा या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करून डॉ. सुरेश बन्सपाल यांनी संबंधित विषयावर मार्गदर्शन केले.

**Dr.Bhashkar Parwate**
**HOD**
**Science Department**



I am delighted to present the Annual Report of the Science Faculty, which includes the Departments of Zoology, Botany, Chemistry, Microbiology, Biotechnology, Biochemistry, Physics, and Mathematics for the academic year 2024–2025. It was a notable and productive year for the Science Faculty, marked by academic progress, research initiatives, and a wide range of student-centric activities. During this academic year, the Science Faculty continued to work toward the achievement of the high-level goals set out in the Statement of Strategy 2024–2025. The faculty also made consistent efforts to provide inclusive educational opportunities for students with special needs. The implementation of the NEP 2020 curriculum was carried out effectively with the support and dedication of all staff members. On behalf of myself and my colleagues, I express sincere appreciation to all the faculty members for their continuous efforts and commitment toward achieving our academic goals during the implementation of the NEP curriculum. The departments actively engaged in various academic, co-curricular, and extension activities throughout the session. ICT facilities were increasingly used in teaching, which enhanced ICT-based learning and improved the overall teaching-learning process. Modern teaching methods such as PowerPoint presentations, online video lectures, and other digital tools were used along with the conventional chalk-and-talk method to ensure better understanding of the subjects. During this academic session, some faculty members registered for research work in their respective subjects, which is a significant achievement for the Science Faculty. Additionally, Miss M. D. Madankar from the Department of Botany and Miss P. A. Nawkhare from the Department of Chemistry successfully qualified the MH-SET Examination in July 2025.

The Life Science Organization and various departments organized several academic and extracurricular activities during the year. An educational visit was organized to the Government Fish Seed Production Hatchery at Shionibandh to understand the process of fish seed production as part of the academic syllabus. A Student Placement Program was organized by the institute on 11 May 2024. Student seminars and academic activities were conducted by different departments on the occasion of Teachers' Day on 5 September 2024. On the occasion of Gandhi Jayanti, students participated in the Gram Swachhata Abhiyan in nearby villages on 1 October. Chemistry students also visited the Plastic Recycling Plant at Rajegaon (MIDC) under the guidance of Miss Pooja A. Nawkhare and Miss Aastha C. Chetule. Science students organized Freshers' and Farewell programs to welcome new students and bid farewell to outgoing students. The college also participated in the Eichhornia weed control program at Oxygen Park, Lakhani. Students from the Departments of Zoology, Chemistry, and Botany attended a State-level Workshop on Vermiculture and Beekeeping organized by M. B. Patel College, Sakoli on 5 October 2024. On the occasion of National Science Day, the faculty organized a guest lecture on Medicinal Plants and Lac Culture delivered by Dr. P. B. Meshram from TFRI, Jabalpur (M.P.), along with several departmental activities. An Induction Program was also organized for B.Sc. First Year students to introduce them to the NEP 2020 syllabus.



प्रा. डॉ. संगीता पंकज हाडगे
सांस्कृतिक विभाग प्रमुख

समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने शैक्षणिक सत्र २०२४-२५ दरम्यान विविध राष्ट्रीय, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जाणीव, राष्ट्रीय मूल्ये, व्यक्तिमत्त्व विकास व सामाजिक बांधिलकी यांची जपणूक करण्यास मोठी मदत झाली. दि. २० जुलै २०२४ रोजी 'गुरुपौर्णिमा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉ. स्वाती मुंडले उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात गुरुपौर्णिमा हा भारतीय संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा उत्सव असून या उत्सवापासून आपल्या सणउत्सवांची सुरुवात होते, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांनी गुरुचे महत्त्व स्पष्ट करताना गुरु माणसाला अहंकारापासून दूर ठेवतो आणि योग्य मार्ग दाखवतो, असे विचार व्यक्त केले. दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आपले विद्यार्थी - आपले वक्ते या उपक्रमांतर्गत मोनाली पडोळे, धनश्री लिचडे, संध्या देशमुख, सुमित शेलारे, गरदीप सिंग गिल, सुशांत मेश्राम, सेजल मेश्राम, अंजली कावळे, राजश्री टेंभरे व विनय रोकडे या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांनी विद्यार्थ्यांना "तुम्ही तुमच्या जीवनाचे शिल्पकार आहात" असा प्रेरणादायी संदेश दिला.

दि. २१ ऑगस्ट २०२४ रोजी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी बापूसाहेब लाखनीकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला धर्मभास्कर परमपूज्य सद्गुरुदास महाराज (उपाख्य शिवचरित्रकार विजयराव देशमुख), मारोतीजी जवंजार, संस्था अध्यक्ष आल्हादजी भांडारकर, डॉ. उदय राजहंस, डॉ. अर्चना रणदिवे, शिवलालजी ऱ्हांगडाले, श्रीमती गीताताई लाखनीकर, उमरावजी बावनकुळे, देवाजी पडोळे आदी मान्यवर उपस्थित होते. क्षेत्रात प्रगती साधावी व समाजात आपले स्थान अधिक बळकट करावे, असा संदेश देण्यात आला. सद्गुरुदास महाराजांनी आपल्या भाषणात बापूसाहेब लाखनीकर हे ज्वलंत ध्येयवादी व्यक्तिमत्त्व होते व सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन केले.

दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिगंबर कापसे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. धनंजय गभणे, प्रा. संगीता हाडगे व प्रा. धनंजय गिरेपुंजे उपस्थित होते. 'आपले विद्यार्थी-आपले वक्ते' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनावर विचार मांडले. या प्रसंगी सर्व शिक्षकांचा श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

दि. १२ सप्टेंबर २०२४ रोजी दिग्विजय दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिगंबर कापसे होते. मंचावर प्रा.डॉ.सुरेश बनसपाल, डॉ.बंडू चौधरी, डॉ.भास्कर पर्वते, प्रा.धनंजय गिऱ्हेपुंजे उपस्थित होते. 'आपले विद्यार्थी-आपले वक्ते' याउपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर विचार मांडले.

दि.२८ सप्टेंबर २०२४ रोजी समर्थ महाविद्यालय लाखनी व योग विद्याधाम शाखा, भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी आरोग्य व योगाभ्यास कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. नरेंद्र व्यवहारे (बालरोगतज्ञ, भंडारा), सौ.जयश्री फटे (लाखनी ग्रामीण रुग्णालय), योगशिक्षक महेश जोशी व डॉ. धनंजय गभणे उपस्थित होते. या कार्यशाळेत योगाचे महत्त्व, सूर्यनमस्कार व इतर योगप्रकारांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेवा व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंती निमित्त 'स्वच्छता ही सेवा' अभियान राबविण्यात आले. लाखनी तालुक्यातील २५ गावांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. त्याच दिवशी महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्त 'अर्चना' वार्षिकांकाचा ५७ वा अंक प्रकाशित करण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे, ॲड. मनीष कापगते व संस्था अध्यक्ष श्री आल्हाद भांडारकर उपस्थित होते.

## ग्रंथालय विभाग



**प्रा.डॉ.धनंजय गभणे**
ग्रंथपाल व समन्वयक
(महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष)

होईल गावाची उन्नती ।
ज्ञान विज्ञानाची प्रगती ।
ऐसीच हवी ग्रंथ संपत्ती ।
गावोगावी ।।
–राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

वरील ओळीत राष्ट्रसंतांनी सांगितल्याप्रमाणे ग्रंथाशिवाय गावाची, देशाची प्रगती साधता येणार नाही म्हणून उत्तम ग्रंथाचा संग्रह करणे व त्यांचे वाचन करणे मानवाच्या कल्याणकरीता आवश्यक आहे. संत पुरुषांच्या वचनाप्रमाणे रोज काहीतरी वाचावे त्यातून उत्तम वेचावे व ते इतरांनाही सांगावे आणि समाजाला ज्ञानी करावे. नेमक्या याच उद्देश पूर्तीसाठी आमचे ग्रंथालय झटत असते. महाविद्यालयाच्या जन्मापासूनच आमचे ग्रंथालय अस्तित्वात आले. दिवसागणिक प्रगती पथावर असलेले आमचे ग्रंथालय वाचकांच्या सेवेत तत्पर आहे. आज तारखेस ग्रंथालयात ५३००० चे वर ग्रंथसाठा असून त्यात नवनवीन ग्रंथांची भर पडत असते. एकूण १५ वर्तमानपत्रे (मराठी, हिंदी व इंग्रजी मिळून) १० साप्ताहिके, ४० विविध विषयांशी संबंधीत अभ्यासपूरक नियतकालिके तसेच स्पर्धा परीक्षांशी संबंधित ग्रंथ यांचाही अंतर्भाव आहे. ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत असून त्यात विद्यार्थ्यासाठी व प्राध्यापकांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष असून दिव्यांग विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था आहे. तसेच स्पर्धा परीक्षा अभ्यास कक्ष असून ग्रंथालयाचे ग्रंथागार प्रशस्त आहे. ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले असून अद्यावत सेवा त्या अंतर्गत वाचकांना पुरविल्या जातात. ग्रंथालय विभागातर्फे समर्थ स्टडी सर्कल हा उपक्रम अव्याहत सुरु आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांची तयारी, मुलाखतीची तयारी, गट चर्चा, व्यक्तिमत्त्व विकास यावर मार्गदर्शन करण्यात येते.

यावर्षी लाखनी पोलीस स्टेशन तर्फे महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला विविध स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त १५० हुन अधिक रु.५२००० किमतीची पुस्तके भेट देण्यात आली व विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र अभ्यासिकेचे उदघाटन करण्यात आले. सदर ग्रंथाचा उपयोग विद्यार्थी दररोज घेत आहेत.

## राष्ट्रीय सेवा योजना

**प्रा.डॉ.धनंजय गिऱ्हेपुंजे**
विभाग प्रमुख
राष्ट्रीय सेवा योजना




समर्थ महाविद्यालय, लाखनी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्षात विविध सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, सेवा वृत्ती आणि राष्ट्रप्रेमाची भावना विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

वर्षभर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध नियमित कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये शिक्षक दिन, आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन, संविधान दिन, जागतिक एड्स दिन, राष्ट्रीय मतदार दिन, पर्यावरणपूरक होळी संदेश, जागतिक महिला दिन, जागतिक जलदिवस जनजागृती रॅली, स्वातंर्त्यदिनानिमित्त रॅली, योगदिवस कार्यक्रम व जनजागरण रॅली, शिवजयंती महोत्सव, मतदान जनजागृती रॅली, महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान तसेच गावशिवारामध्ये वृक्षारोपण चळवळ अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच मोफत नेत्र तपासणी शिबीर व रक्तदान शिबीरांमध्ये स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. "शासन आपल्या दारी" या उपक्रमांतर्गत समाजकल्याण विभाग भंडारा आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी विविध राज्य व विद्यापीठ स्तरावरील उपक्रमांमध्येही सहभाग नोंदविला. भारत सरकारच्या नेहरू युवा केंद्र संघटन आणि राष्ट्रीय सेवा योजना नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "विकसित भारत युथ पार्लमेंट" या कार्यक्रमात महाविद्यालयातील धनश्री विनोद पत्रे, श्रेया राजु काडगाये, विशाखा भुसारी व विनय रोकडे या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ स्तरावर सहभाग घेतला. One Nation One Election या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण केले. यामध्ये धनश्री पत्रे हिची मुंबई येथे पुढील स्तरासाठी निवड झाली, ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे.



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या वतीने आयोजित "आव्हान २०२४" आपत्ती व्यवस्थापन शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थीनी विशाखा भुसारी हिने सहभाग घेतला. दि. ७ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत आयोजित या शिबिरात विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयात रक्तदान व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मुक्ताताई आगाशे यांनी रक्तदान व नेत्रदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे, हरिभाऊ मोहतुरे, डॉ.अल्काताई सोरदे, डॉ.निलीमा कापसे आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच लाखनी तालुक्यातील खैरी येथील स्व. गोपिकाबाई निखाडे यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या निधनानंतर अवयवदानाचा आदर्श निर्णय घेतल्याबद्दल ८ मार्च २०२५ रोजी महिला दिनाच्या निमित्ताने त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे, जि.प. सदस्या डॉ. मनिषाताई निबार्ते, सरपंच सौ. ललिता कोरे, पोलीस पाटील प्रफुल्ल चौधरी व गावकरी उपस्थित होते.

वरील सर्व उपक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे, प्राध्यापक वृंद व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. कार्यक्रमांचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. डॉ. धनंजय गिऱ्हेपुंजे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहप्रमुख प्रा. डॉ. बंडू चौधरी यांनी मानले.

## राष्ट्रीय छात्रसेना विभाग

**कॅप्टन बाळकृष्ण कारु रामटेके**
राष्ट्रीय छात्रसेना विभाग प्रमुख

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात एन.सी.सी. विभागात एकूण ५२ कॅरेट्सने भाग घेतला. त्यापैकी प्रथम वर्षाकरिता २४ विद्यार्थी, बी. सर्टिफिकेट करिता १८ विद्यार्थी तर सी. सर्टिफिकेट करिता १० विद्यार्थी आहेत. १५ ऑगस्ट २०२४ ला एन.सी.सी. कॅडेट्सने ध्वजाला सलामी दिली. एन.सी.सी. विभागाद्वारे जागतिक योग दिन, दि. २ ऑक्टोंबर २०२४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त नगरपंचायत लाखनी येथे स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. एड्स जनजागरण अभियान, स्वच्छता पखवाडा, मुलींच्या सुरक्षिततेसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन, एनसीसी विभागाद्वारे फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. अनाथालय वृद्धाश्रम रेंगेपार कोठा येथे भेटी देऊन तिथे फराळ वाटपाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. २६ जानेवारी २०२५ रोजी तहसील कार्यालय लाखनी तर्फे आयोजित देशभक्तीवर आधारित कार्यक्रम सोलो डान्स एनसीसी विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले होते. महाविद्यालयाच्या एन.सी.सी. पथकाने समर्थ परेड ग्राउंडवर उत्कृष्ट पथ संचलन केले होते . मतदार जनजागृती अभियान, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, आंतरराष्ट्रीय युवा दिन, दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी गराडा केसल वाडा., माडगी ठेकेपार खुर्शीपार मार्गे रावणवाडी या गावात सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखविली, एनसीसी विभागाद्वारे जागतिक जल दिन, नो व्हेईकल डे, इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये पूजा ताराचंद नान्हे, वैभव विलास हबरे, तुषार राजेश गिऱ्हेपुंजे, रोहित देशमुख, अमन लक्ष्मण बावनकुळे या एनसीसी कॅडेटचे भारतीय सैन्य दल व पोलीस दलाकरिता निवड झाली आहे. अनिकेत गिऱ्हेपुंजे, तन्मय हुमणे, वंश बावणे, समीर भुरे, रितिक निर्वाण, रोहित मते या एनसीसी आर्मी अटॅचमेंट कॅम्प कामठी करिता निवड झालेली आहे. गौरव संजय कमाने या एनसीसी विद्यार्थ्याची पूर्व गणतंत्र शिबिराकरिता निवड झाली होती. दि. १० सप्टेंबर ते १७ सप्टेंबर २०२४ रोजी एनसीसी डायरेक्ट केरला आणि लक्षद्वीपद्वारे आयोजित ऑल इंडिया ट्रेकिंग एक्सपिडीशन केरला ट्रेक -१ जे एन व्ही कुलामाऊ येथे नोबेल योगेंद्र या एनसीसी कॅडेट ची निवड झाली होती. एनसीसीच्या माध्यमातून देशभक्ती तसेच शिस्तीचे धडे दिले जातात. नित्य वर्षभराच्या वाटचालीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांनी मार्गदर्शन लाभले.

# महिला तक्रार निवारण समिती

डॉ. संगीता पंकज हाडगे
संयोजिका
महिला तक्रार निवारण समिती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी समारोह आणि समर्थ महाविद्यालयाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये महिला तक्रार निवारण समितीअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महिला व बालविकास विभाग, लाखनी आणि समर्थ महाविद्यालय, लाखनी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी 'राजमाता जिजाबाई युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण' हा त्रिदिवसीय कार्यक्रम दि. १ ऑगस्ट २०२४ ते ३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे होते. प्रमुख वक्ते म्हणून लाखनी पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक श्री. आशिष चिलंगे उपस्थित होते. तसेच श्री. विजय नंदागवळी (महिला व बालविकास संरक्षण अधिकारी, भंडारा) आणि श्री. अमित गजभिये (महिला व बाल कल्याण अधिकारी, लाखनी) यांची विशेष उपस्थिती लाभली. या प्रसंगी अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांनी सांगितले की, आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत आहेत. तरीही अनेकदा त्यांना पुरुषप्रधान व्यवस्थेला सामोरे जावे लागते. त्यामुळे मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. उपनिरीक्षक श्री. आशिष चिलंगे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या काळात प्रत्येक युवतीने कोणत्याही परिस्थितीत स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सज्ज असले पाहिजे. अशा प्रशिक्षणामुळे आत्मविश्वास वाढतो आणि समाजविघातक प्रवृत्तींना न घाबरता सक्षमपणे सामोरे जाण्याची ताकद मिळते.

दि. २६ सप्टेंबर २०२४ रोजी विद्यार्थिनींसाठी 'सुरक्षित स्पर्श, असुरक्षित स्पर्श व सत्यनिष्ठा' या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यासाठी लाखनी येथील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मीरा आगलावे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थिनींना सुरक्षित व असुरक्षित स्पर्श कसा ओळखावा, अशा परिस्थितीत कसे सजग राहावे, तसेच अज्ञानामुळे होणाऱ्या धोक्यांपासून कसे वाचावे याबाबत मातृभाषेतून सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाला कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील जवळपास ३०० विद्यार्थिनी तसेच महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका उपस्थित होत्या.

महिला व बालविकास विभाग, लाखनी आणि समर्थ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार 'महिला पखवडा' (२५ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर २०२४) निमित्त लैंगिक शोषण व लिंगभेदाविरुद्ध जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे होते. प्रमुख वक्त्या म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक सौ. भाग्यश्री शशांक कुलकर्णी (भरोसा सेल, भंडारा) उपस्थित होत्या. तसेच विदर्भ साहित्य संघ शाखा लाखनीच्या सचिव डॉ. मुक्ता आगाशे आणि श्री. हरिभाऊ मोहतुरे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी 'कायदे निर्मितीत स्त्रियांचे योगदान' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. जवळपास ३० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. त्यामध्ये प्रथम : कु.हिमांशी क्षीरसागर, द्वितीय : नितीन ढेंगे, तृतीय : कु.श्रेया काडगाये यांनी अनुक्रमे पारितोषिके मिळवली. विशेष अतिथी म्हणून डॉ. मुक्ता आगाशे यांनी विद्यार्थिनींना अभ्यासात प्रगती करून समाजात, पालकांमध्ये आणि महाविद्यालयात मानाचे स्थान मिळवावे असा सल्ला दिला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांनी सांगितले की, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही स्त्रियांवरील अत्याचारांचे प्रमाण कमी झालेले नाही. हुंडाबळी, घरगुती हिंसाचार, बलात्कार आणि लैंगिक शोषण यांसारख्या घटना आजही समाजात घडताना दिसतात. स्त्री-पुरुष समानता प्रत्यक्षात आणण्यासाठी समाजाने अधिक जागरूक होणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमाला जवळपास २०० विद्यार्थिनींनी उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. रूपाली खेडीकर, प्रास्ताविक डॉ. संगीता हाडगे यांनी केले, तर प्रा. अजिंक्य भांडारकर यांनी आभार प्रदर्शन केले.



# करिअर गाईडन्स सेल व करिअर कट्टा'

**प्रा.डॉ.संदीपकुमार सरैय्या**
विभाग प्रमुख
समर्थ महाविद्यालय, लाखनी

विद्यार्थ्यांच्या करिअर विकासाच्या दृष्टीने महाविद्यालयात करिअर गाईडन्स सेल स्थापन करण्यात आलेला आहे. या सेलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध रोजगाराच्या संधी, स्पर्धा परीक्षा तसेच व्यक्तिमत्व विकासाबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

या अनुषंगाने यावर्षी टी.सी.एस. (टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस अंतर्गत आयोजित रोजगार मेळाव्यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. तसेच राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळावा, नागपूर येथे दिनांक '९ व १० डिसेंबर २०२४' रोजी आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास उपस्थित राहण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले.

तसेच दिनांक '१२, १३ व १६ ऑक्टोबर २०२४' रोजी भंडारा येथे टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस यांच्या वतीने आयोजित रोजगारविषयक कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे यासाठी त्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यात आले. याशिवाय दिनांक '१९ ऑक्टोबर २०२४' रोजी लाखनी येथील स्वप्नदीप मंगल कार्यालय येथे आयोजित प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राच्या उद्‌घाटन कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी देखील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शासनामार्फत विविध विभागांमध्ये निघालेल्या भरतीविषयक जाहिरातींबाबत वेळोवेळी माहिती देण्यात आली. यासाठी वेगवेगळया व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून तसेच महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर जाहिराती लावून विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्यात आली.

याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांशी संवाद या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापकांनी स्पर्धा परीक्षांच्या अनुषंगाने कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विविध विषयांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय करिअर गाईडन्स सेलला व्यक्तिगतरीत्या भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन

करिअर कट्टा
युवकांच्या
सर्वांगीण विकासासाठी

तसेच महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारा 'करिअर कट्टा' हा उपक्रम महाविद्यालयात प्रभावीपणे राबविण्यात आला. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक रामभाऊ कोटांगले महाविद्यालयीन समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा या उपक्रमाबद्दल तसेच त्याअंतर्गत चालणाऱ्या IAS आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला या कार्यक्रमांची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना करिअर कट्टा पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी प्रेरित केले.

याशिवाय महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. संदीपकुमार सरैया हे भंडारा जिल्ह्याचे करिअर कट्टा जिल्हा समन्वयक म्हणून शैक्षणिक सत्र २०२२ व २३ पासून कार्यरत आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन करिअर कट्टातर्फे त्यांना उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालयीन समन्वयक म्हणून पारितोषिक प्रदान करण्यात आले आहे.



## स्वयं विभाग अहवाल

प्रा.डॉ.संदीपकुमार सरैय्या
स्वयं मेंटर
समर्थ महाविद्यालय, लाखनी

स्वयं मनुष्यबळ विकास मंत्रलयाचे एक ऑनलाइन प्लॅटफॉर्म आहे. ज्याद्वारे भारतातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन कार्यक्रम व कोर्स दिले जातात. हे ९ जुलै २०१७ रोजी लॉंच केले गेले. स्वयंम हे एक व्यासपीठ आहे जे इयत्ता ९ वी ते पोस्ट ग्रॅज्युएशन पर्यंतचे सर्व अभ्यासक्रम कोणालाही, कोणत्याही ठिकाणी, कधीही उपलब्ध करून देते. भारत सरकारचे स्वयंम उपक्रम आम्ही महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांना उपलब्ध करून देत असतो. वेळोवेळी विद्यार्थी आणि प्राध्यापकांना स्वयंम बद्दलची माहिती स्वयं मेंटरद्वारे दिली जाते. या द्वारे अनेक विद्यार्थी आणि प्राध्यापक आपली गुणवत्ता वाढविण्यासाठी नेहमी प्रयत्न करीत असतात.

### स्पर्धा परीक्षा

महाविद्यालयात अत्यंत गुणवत्तापूर्ण वाचनालयाची सोय असून महाविद्यालयाच्या हीरक महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री लोहित मतांनी यांनी स्पर्धा परीक्षेसाठी भरीव ग्रंथांचे दान केले आणि विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा वाचन कक्षाचे उद्‌घाटन त्यांनी केले.

### अभ्यासिका

समर्थ महाविद्यालय आणि लाखनी पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेची स्थापना करण्यात आली. या अनुषंगाने स्पर्धा परीक्षा तयारी करणारे विद्यार्थी या अभ्यासिकेचा फायदा घेत असतात.

**E-Learning Portal**

FREE ONLINE EDUCATION
swayam
शिक्षित भारत, उन्नत भारत

## प्रार्थना योग आणि ध्यान साधना विभाग

प्रा.डॉ.संदीपकुमार सरैय्या
विभाग प्रमुख

सत्र २००६-०७ पासून प्रार्थना विभागाची स्थापना करण्यात आली. या अनुषंगाने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात १० जुलै पासून ३० एप्रिलपर्यंत नित्य नियमाने नमो मातृभूमे ही प्रार्थना, जन-गण-मन हे राष्ट्रगीत, हम करे राष्ट्र आराधना हे महाविद्यालयीन गीत, मनाचे श्लोक, संस्कृत मधील सुभाषितांचे पठण विद्यार्थ्यांकडून केले जाते. या सोबतच प्रार्थनेच्या नंतर दैनंदिन दिनविशेष प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे विद्यार्थ्यांना उद्‌घोषित करीत असतात. सत्र २०२४-२५ हे वर्ष राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर शतकोत्तर वर्ष आणि समर्थ महाविद्यालय लाखनीचे हीरक महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. प्रार्थना विभागाअंतर्गत कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना गणवेश लागू केलेला असून विद्यार्थी गणवेशात प्रार्थनेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे याकरिता सर्व प्राध्यापक सतत प्रयत्नशील असतात.


दर शनिवारला प्रार्थनेसोबतच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व आणि सर्वांगीण विकास घडून यावा या अनुषंगाने जीवनमूल्यांवर आधारित महाविद्यालयातील प्राध्यापक मार्गदर्शन करीत असून प्राणायाम वर्ग सुद्धा यावेळी राबविला जातो, त्यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढण्यामध्ये मदत होत, असा उपक्रम राबवणारे भंडारा गोंदिया जिल्ह्यातील आपले महाविद्यालय हे एकमेव महाविद्यालय आहे, त्याच्या मला सार्थ अभिमान आहे.



## रक्तदान आणि मरणोत्तर नेत्रदान जनजागृती अभियान

समर्थ महाविद्यालय लाखनी येथे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, सांस्कृतिक विभाग आणि आजीवन प्रौढ शिक्षण विभागाच्या पुढाकाराने रक्तदान आणि मरणोत्तर नेत्रदान जनजागृती कार्यक्रम दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात आला.

या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी समाजात जाऊन कार्य करण्याकरीता प्रोत्साहित करण्याकरीता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे, तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मुक्तताई आगाशे, विदर्भ साहित्य संघ लाखनीचे अध्यक्ष हरिभाऊ मोहतुरे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अल्काताई सोरदे, विदर्भ महाविद्यालय लाखनीच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. निलीमा कापसे इत्यादी उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनातून डॉ.मुक्ताताई आगाशे यांनी रक्तदानाचे महत्व विशद करुन रक्तदात्यांना प्रोत्साहित केले. भारतात रक्ताची मागणी आणि पुरवठा यामध्ये मोठी तफावत आहे त्याकरीता रक्तदान शिबीरांची आवश्यकता आहे. तसेच रक्तदानाप्रमाणेच मरणोत्तर नेत्रदान करणे सुध्दा महत्वाचे कार्य आहे. यातून अंध व्यक्तिला दृष्टी मिळू शकेल असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी रक्तदान आणि मरणोत्तर नेत्रदान याविषयी लोकांमध्ये जाऊन माहिती द्यावी असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो विभागप्रमुख डॉ. धनंजय गिऱ्हेपूंजे यांनी केले तर आभार प्रदर्शन एनसीसी विभागाचे कॅप्टन बाळकृष्ण रामटेके यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधु भगिनी आणि कर्मचारी वृंद उपस्थित होते.




## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक अभ्यास केंद्र समर्थ महाविद्यालय, लाखनी

**प्रा.अजिंक्य भांडारकर**
केंद्र संयोजक
समर्थ महाविद्यालय, लाखनी

'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीद घेऊन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आपल्या स्थापनेपासून उच्च शिक्षणाच्या समाजातील सर्व घटकांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्र शासनाद्वारे १९८९ मध्ये स्थापन झालेल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक विद्यापीठ 'सर्वांसाठी शिक्षण या ध्येयाने शैक्षणिक चळवळ उभी राहावी या उद्देशातून गरजू जिज्ञासू आणि कोणत्याही कारणाने शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची सोय किंवा अपुरे राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची संधी या विद्यापीठात मार्फत उपलब्ध करुन दिलेली आहे. काम करता करता शिक्षण आणि शिक्षण घेता घेता अर्जिन ही संकल्पना गृहीत धरूनच विद्यापीठातील शिक्षणक्रम तयार करण्यात आले आहे.

शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये अभ्यास केंद्रात बी. ए. ,बी.कॉम., एम.ए. (मराठी, अर्थशास्त्र, इंग्रजी आणि इतिहास), बी.एस्सी. (सी. बी. झेड, पी.सी. एम.) या विषयात पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेण्याची सोय आपल्या अभ्यास केंद्रात आहे. बी.ए. ४४७, बी.कॉम. ३६८ आणि एम. ए. (मराठी, अर्थशास्त्र, इंग्रजी आणि इतिहास) १३६ असे ९६९ व बी एस सी ३५ विद्यार्थी प्रवेशित होते. यासोबत १६ समंत्रक अध्ययन कार्य पार पाडीत होते. या शैक्षणिक वर्षात अभ्यास केंद्राद्वारे वृक्षारोपण, यशवंतराव चव्हाण जयंती कार्यक्रम आणि वर्षभर विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या सतत वाढत आहे हीच आमच्या अभ्यासकेंद्राची जमेची बाजू आहे.



## क्रीडा विभाग

**डॉ.धनंजय गिऱ्हेपुंजे**
शारीरिक शिक्षण संचालक
शारीरिक शिक्षण विभाग

शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये शारीरिक शिक्षण विभागातील विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान कामगिरी पार पाडली. रा.तु.म.नागपूर विद्यापीठ आंतरमहाविद्यालय मैदानी स्पर्धेत महाविद्यालयाला अनेक पदक प्राप्त झाली. ज्यामध्ये एम. ए. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी कु. स्वाती उईके (सुवर्ण पदक) प्राप्त केले. विद्यापीठ आणि आंतरविद्यापीठ स्तरावर महाविद्यालयाचे नाव लौकीक केले. खेळाडूंचे प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे आणि महाविद्यालयीन सर्व घटकांनी अभिनंदन केले. रा. तु. म. नागपूर विद्यापीठ आंतर महाविद्यालय मुलींच्या कबड्डी स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाने भंडारा जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. शारीरिक शिक्षण विभागाच्या सहकार्याने पतंजली योग समिती द्वारे नित्यनियमीत योग वर्ग सुरु आहे. ७०-८० योगसाधक या ठिकाणी उपस्थित असतात.






## शिक्षकेतर कर्मचारी विभाग

**डॉ.शामराव पंचवटे**
शिक्षकेतर कर्मचारी

समर्थ महाविद्यालय, लाखनी येथील कार्यालयीन प्रशासन हे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तत्पर व जबाबदारीपूर्ण कार्यावर अवलंबून आहे. महाविद्यालयातील विविध प्रशासकीय, तांत्रिक व सेवा संबंधित कामे शिक्षकेतर कर्मचारी निष्ठेने व कार्यक्षमतेने पार पाडत असतात. महाविद्यालयातील कार्यालयीन प्रशासनामध्ये मंगेश शिवरकर, शामराव पंचवटे, प्रणय भांडारकर, दिनेश सलामे, विनोदकुमार रामटेके आणि श्रीमती मालन सरोते हे शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत.

याशिवाय महाविद्यालयाच्या दैनंदिन कामकाजात सहाय्य करण्यासाठी मोहन कावळे, रितेश झलके, जगदीश मोटघरे, टेकचंद खवसकर, चेतन भांडारकर, केशव लाडे, प्रकाश मसराम आणि मनीषा अतकरी हे रोजनदारी कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच महाविद्यालयाच्या सुरक्षेची जबाबदारी निलेश निखाडे हे सुरक्षारक्षक म्हणून सांभाळत आहेत. महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्रशासन, कागदपत्रांची पूर्तता, विद्यार्थी संबंधित कामे तसेच परिसराची स्वच्छता व देखभाल ही सर्व कामे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने सुरळीतपणे पार पडतात.

शिक्षकेतर कर्मचारी आपल्या कार्यामध्ये अधिक कार्यक्षम व अद्ययावत राहावेत यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा व अधिवेशनांमध्ये नियमितपणे सहभागी होत असतात. अशाच उपक्रमांच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन व समूह विद्यापीठे शिक्षकेतर कर्मचारी संघटना, पुणे यांच्या वतीने राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशन व नवीन शैक्षणिक धोरणविषयक कार्यशाळेचे आयोजन दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट, पुणे येथे करण्यात आले होते.

या अधिवेशनामध्ये समर्थ महाविद्यालय, लाखनी येथून शामराव पंचवटे व विनोदकुमार रामटेके यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. या अधिवेशनामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कार्यपद्धती, शैक्षणिक व्यवस्थापन आणि नवीन शैक्षणिक धोरणाबाबत आवश्यक माहिती मिळाली. याचा उपयोग महाविद्यालयातील कार्यालयीन कार्य अधिक परिणामकारकपणे पार पाडण्यासाठी होणार आहे. अशा प्रकारे समर्थ महाविद्यालय, लाखनी येथील शिक्षकेतर कर्मचारी विभाग महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने योगदान देत असून महाविद्यालयाचे प्रशासन सुरळीत व प्रभावीपणे चालविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.


























लोकशाही वार्ता
भाषा मानवाला जीवन जगायला शिकवते

सह्याद्रीचा सरपंचदार

देशोन्नती
स्वच्छ भारत अभियान अंतर्गत समर्थ महाविद्यालय लाखनीद्वारे सायकल रॅली

पुण्य नगरी
विद्यार्थिनींची महिला उद्योजकता केंद्राला भेट

समर्थची मोनिका गायधने बी. कॉम. परीक्षेत प्रथम

नवभारत

तरुण भारत
मोनिका गायधने सुवर्ण पुरस्काराने सन्मानित

लोकमत
अधिवेशनाची जय्यत तयारी

तांदुळनगरी

नवराष्ट्र
भाषा मानवाला जीवन जगायला शिकवते

फेब्रुवारी २०२५
समर्थ महाविद्यालय लाखनी येथे दमास मराठी विशेषांकाचे प्रकाशन

तरुण भारत
छत्रपती शिवाजी महाराज आधुनिक लोकशाहीचे जनक

पुण्य नगरी
लाखनीत कंपोस्ट खतनिर्मिती जागरूकता कार्यक्रम

नवराष्ट्र

जगायला शिकवते

मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन आजपासून

Bhandara / Gondia Edition
Feb 28, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

नवभारत
भाषा सिखाती है जीने की कला

आधुनिक लोकशाही व्यवस्थेचे आद्य जनक छत्रपती शिवाजी महाराज

प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे: समर्थ महाविद्यालयात शिवजयंती महोत्सव विविध उपक्रमांनी साजरा

तरुण भारत
मानसिक गुलामगिरीतून बाहेर निघा

आपला

समर्थ महाविद्यालयाचा हीरक महोत्सवी स्नेहमेळावा